# १

# इतिहास : अर्थ व स्वरूप, व्याख्या व व्याप्ती

**घटक रचना**

१.० उद्दिष्टे
१.१ प्रस्तावना
१.२ इतिहासाचा अर्थ व व्याखया
१.३ इतिहासाची व्याप्ति
१.४ सारांश
१.५ प्रश्न
१.६ अतिरिक्त वाचन

## १.० उद्दिष्टे :

**हे युनिट पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी पुढील बाबतीत सक्षम होऊ शकेल :**

१. इतिहासाचा अर्थ आणि व्याख्या समजणे.

२. इतिहासाच्या व्याप्तीचे मूल्यमापन करणे.

## १.१ प्रस्तावना :

इतिहास हा एक गतिमान व बहुआयामी विषय आहे. त्याला सर्व विषयांची जननी म्हणून गणले जाते. इतिहासाचे ठिकाण, वेळ आणि विषयानुसार प्रकार आहेत. पूर्व-ऐतिहासिक, प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक हे 'काळा' च्या आधारे इतिहासाचे प्रकार आहेत. आर्थिक, लष्करी, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादी 'विषया' नुसार इतिहासाचे प्रकार आहेत. स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय हे 'ठिकाणा' च्या आधारे इतिहासाचे प्रकार आहेत. आंतरराष्ट्रीय इतिहासात अशा घटनांच्या अभ्यासावर जोर देण्यात आला की घडलेल्या घटनांनी जगाच्या संपूर्ण मानवी समुदायावर त्याचा परिणाम केला. उदा. फ्रेंच राज्यक्रांती, पहिले महायुध्द, दुसरे महायुध्द. त्यानंतर देशांवर त्यांचा प्रभाव पाडणाऱ्या घटना व घडामोडींचा राष्ट्रीय इतिहासात अभ्यास केला जातो. उदा. भारतीय संदर्भात, १८५७ चा राष्ट्रीय उठाव, असहकार आंदोलन. प्रादेशिक इतिहास एखाद्या विशिष्ट प्रदेशात किंवा राज्यापुरते मर्यादित असून त्या अंतर्गत घडणाऱ्या घडामोडी आणि घटना यांच्या एतिहासिक प्रभावावर लक्ष केंद्रित करते. उदा. मराठ्यांचा इतिहास. स्थानिक इतिहासात अशा इतिहासाचा समावेश आहे ज्यामध्ये महत्त्वपूर्ण स्थानिक घटना आणि स्थानिक समुदायावर प्रभाव टाकणारी घटना मर्यादित असते . आधुनिक काळात स्थानिक इतिहासाच्या संशोधनावर विशेष भर दिला जात आहे. स्थानिक इतिहासामध्ये गतिमान सामाजिक, राजकीय, आर्थिक बदलांची प्रतिबिंब पुन्हा तयार केली जात आहे. पारंपारिक दृष्टीने इतिहास म्हणजे भूतकाळातील घटना आणि पूर्वीच्या जीवनाची त्याचच्या योग्यते व अयोग्यातेसह ओळख होय.

इतिहास म्हटल्यानंतर आपल्या डोळ्यासमोर भूतकाळ येतो. आणि भूतकाळ म्हणजे भूतकाळात घडलेल्या गोष्टी किंवा होऊन गेलेल्या गोष्टी किंवा जो काळ आता केवळ आठवणीत शिल्लक राहिला आहे असा काळ. इतिहासात भूतकाळातील घडलेल्या घटना किंवा त्याचा पुरावा किंवा निवेदन हे आपल्याला बघावयास मिळते. माणसाला पूर्वी काय घडले असावे याची फार मोठी उत्सुकता असते. त्याचबरोबर पुढे काय घडणार आहे याची जिज्ञासा असते. ' इतिहास ' या शब्दाचा अर्थ हा विविध प्रकारे वापरला जातो. एक अर्थ म्हणजे पूर्वी घडून गेलेल्या घटनांची जंत्री किंवा घडून गेलेल्या घटना. मात्र नंतरच्या काळात इतिहासाचा अर्थ म्हणजे पूर्वी घडून गेलेल्या घटनांची चौकशी करणे व त्याबद्दल काही विधान करणे. थोडक्यात इतिहास म्हणजे मानवाच्या जीवनात ज्या भूतकाळात होऊन गेलेल्या गोष्टी आहेत, घडामोडी आहेत त्यांचा प्रामुख्याने अभ्यास होय. इति + हा + आस = म्हणजे असे घडले हा त्याचा शब्दशः अर्थ होय. इतिहासात मानवी व्यवहार याचा विचार प्रथम येतो व तो विचार एक संघ आणि एकजिनसी असा केला जातो. केवळ वृत्तांत मांडणे म्हणजे इतिहास आहे असे समजणे बरोबर नाही. त्यातील म्हणजे वृत्तांत मांडण्यातील कला, सौंदर्य आणि सजीवता हेच खऱ्या अर्थाने इतिहासाचे खरे स्वरूप आहे. इतिहास हा संजीवक हवा. त्यात त्रयस्थपणा येता कामा नये. मानवी प्रगतीचा, त्याच्या मनातील स्पंदनाचा त्याच्या मनात निर्माण झालेल्या विविध विचारांचा, आचाराचा, एक जिवंत तात्त्विक झरा ज्यास नैसर्गिक प्रवाह आहे असा विषय व त्याचे अध्ययन म्हणजे इतिहास होय.

इतिहासाची संकल्पना प्रामुख्याने तीन गोष्टींवर साकारलेली आहे.

(१) भूतकाळातील परिस्थिती व त्या काळात मानवाने केलेली प्रगती.

(२) त्याने भूतकाळात केलेल्या प्रगतीबद्दलची नोंद असणाऱ्या व पुरावा म्हणून असणाऱ्या गोष्टी.

(३) मानवी प्रगतीची नोंद करणारी पध्दती व ती नोंद करण्यासाठी वापरलेले तंत्रज्ञान.

इतिहासाची संकल्पना ही मूळची ग्रीक लोकांची, लॅटिनमध्ये इतिहासाला"हिस्टोरिया"म्हणतात तर फ्रेंच भाषेत त्याला"हिस्टोरी"तर इंग्लिशमध्ये"हिस्ट्री"असे म्हणतात. वरील सर्व शब्दांचा खरा अर्थ चौकशी करणे किंवा चौकशी करण्याचा उद्देश, चौकशी करून मिळालेले ज्ञान अथवा माहिती संकलित करून सादर करणे असा होत नाही. पण मात्र भूतकाळात घडून गेलेल्या गोष्टीचा विचार करणे म्हणजे इतिहास किंवा भूतकाळातील यथार्थता (Actuality) म्हणजे इतिहास होय.

या घटकामध्ये आपण इतिहासाचा अर्थ व इतिहासाची व्याप्ती यावर चर्चा करू या.

## १.२ इतिहासाचा अर्थ आणि व्याख्या:

इतिहासाबद्दल अनेक प्रकारच्या व्याख्या अनेक नामवंत लेखकांनी मांडल्या आहेत. प्रत्येक व्याख्येत एक वेगळ्या प्रकारची छटा वा माहिती इतिहासाच्या संदर्भात आपल्याला मिळते आणि इतिहासाचे स्वरूप त्याची व्याप्ती किती मोठी आहे याचे ज्ञान आपल्याला मिळते. आता आपण काही महत्त्वाच्या व्याख्यांचा आढावा घेऊ.

**हिरोडोटस** या ग्रीक इतिहासकाराच्या मते,**"भूतकालीन मनोरंजक व संस्मरणीय घटनांचा शोध म्हणजे इतिहास होय."(History means inquiry into the interesting and memorable past events.)** या व्याख्येनुसार हिरोडोटसने मनोरंजकता व संस्मरणीयता हे इतिहासाचे प्रमुख निकष मानले आहेत. पण मनोरंजक घटना या संस्मरणीय असतात किंवा संस्मरणीय घटना या मनोरंजक असतातच असे नाही. या व्याख्येनुसार इतिहासातील संस्मरणीय घटनांची निवड करण्याची जबाबदारी हिरोडोटस इतिहासकारावर टाकतो.

सुप्रसिध्द इंग्रज विचारवंत **फ्रान्सिस बेकन** यांच्या मते**"मानवाला शहाणी बनविणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास होय."("History is a discipline that makes men wise")** याचा अर्थ इतिहासाचे अध्ययन केल्यामुळे माणसाला शहाणपण प्राप्त होते.अवतीभोवती पूर्वी काय घडले होते त्याची माहिती मिळते.शहाणपण मिळविण्यासाठी इतिहासाचे अध्ययन आवश्यक आहे असाच त्याचा अर्थ आहे.

**हॅप्पोल्ड** च्या मते, **"इतिहास हा अनुभवाचा नंदादीप आहे."(History is the lamp of experience.)** भूतकाळातील अनुभवाच्या प्रकाशात भविष्याची वाटचाल करावी म्हणजे त्याला योग्य अशी दिशा मिळू शकेल असे हप्पोल्डला सुचवायचे होते.

तर **हेन्री जॉन्सन** यांच्या मते**"इतिहास म्हणजे जे घडले, जसे घडले, ते जसेच्या तसे सांगणे"**या व्याख्येचा अर्थ असा की भूतकाळात घडलेल्या सर्व घटना जशाच्या तशा मांडणे, सांगणे व त्याबद्दल माहिती देणे म्हणजे इतिहास होय. ज्या घटना मानवी मनावर, समूहावर, त्यांच्या वर्तनावर खोल असा ठसा उमटवितात अशा घटना म्हणजे इतिहास होय.

**प्रा.फिंडले** यांच्या मते**"इतिहास म्हणजे अनेक घटनांची सुसंगती लावून त्याचा परस्पर संबंध प्रस्थापित करणारी विद्याशाखा होय."(History is a sequence of events traced in their relations.)** प्रा. फिंडले यांची व्याख्या इतिहासात घटनांना वैशिष्ट्यपूर्ण स्थान देते असे दिसते. केवळ घटनांचा अभ्यास नसून त्या भूतकाळात घडलेल्या सर्व घटनांचा परस्पराशी संबंध प्रस्थापित करून यथार्थ माहिती देणारा विषय अथवा विद्याशाखा म्हणजे इतिहास होय. घटना आणि त्यांचा परस्परांशी संबंध सुसंगती ही महत्त्वाची आहे असे फिंडले सुचवितात.

**प्रा. मेटलँड :** यांच्या मते**"इतिहास म्हणजे मानवाने जे केले किंवा ज्याचा उच्चार केला व सगळ्यापेक्षा सुध्दा त्यांनी ज्याचा विचार केला त्याला इतिहास असे म्हणतात."(What men have done and said, above all what they have thought that is history.)**या व्याख्येत मेटलँड यांनी इतिहासामध्ये एक निश्चित प्रकारची वैचारिक प्रक्रिया आहे असे मांडले. म्हणजे मानव काही विचार मांडू शकतो, त्याच्या मनातील विचारांचे प्रतिबिंब आपल्याला इतिहासात दिसते. म्हणजे इतिहास केवळ घटना ज्या भूतकाळात होऊन गेल्यात त्याच सांगत नाही तर त्या घटनातून एक नवी वैचारिक प्रक्रिया देखील मांडू शकतो असे सांगितले.

**प्रा. रेनियर :"इतिहास म्हणजे समाजामध्ये राहणाऱ्या लोकांची हकीकत होय."(History is a story of men living in societies.)**या व्याख्येत इतिहासाचा वेगळा पैलू पहावयास मिळतो तो म्हणजे इतिहास हा प्रामुख्याने भूतकाळातील समाजाचा,

समाजातील माणसांचा त्यांच्या कृत्यांचा, त्यांच्या प्रगतीचा, सामुदायिक कार्याचा आढावा ज्यात घेतलेला आहे त्याचा इतिहास होय.प्रा. रेनियर यांची व्याख्या सामाजिक इतिहासाची कवाडे खोलणारी आहे म्हणून ती महत्त्वाची आहे.

**प्रा.लेकी : "इतिहास म्हणजे नैतिक कल्पनांचा संग्रह व स्पष्टीकरण होय. "(History is the record and explanation of moral values.)** प्रा. लेकी यांची ही व्याख्या जास्त तत्वचिंतक वाटते. या व्याख्यामध्ये इतिहासाला तत्वज्ञानाचा मुलामा दिलेला दिसतो. अर्थात वेगळ्या अर्थाने इतिहासाच्या अभ्यासातून एक वेगळे तत्वज्ञान प्रतीत होत असते. पण केवळ नैतिक कल्पना म्हणजे इतिहास नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

**एडमंड बर्क :** १८ व्या शतकातील फार मोठे विचारवंत होऊन गेले. त्यांच्या दृष्टीने**"इतिहास म्हणजे दूरदर्शीपणाचा मार्गदर्शक होय; तत्वांचा मार्गदर्शक नव्हे. "(History is a preceptor of prudence and not of principles.)** ही व्याख्या इतिहासाची व्याप्ती मोठी आहे असे तर सांगतेच पण त्याबरोबर इतिहासात प्रामुख्याने सातत्याने घडणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक बदलांचा इतिहासाशी त्याचा संबंध असतो. हा घडत असणारा प्रवाही बदल कोणत्याही तत्वाच्या चौकटीत त्याला बसविता येत नाही. मात्र इतिहासात घडणाऱ्या घटनांमुळे व त्याच्या अध्ययनामुळे भावी काळात काय घडू शकेल याचा अंदाज व्यक्त करता येतो व मानवाला एक दूरदर्शीपणाची जाणीव होऊ शकते.असा या व्याख्येचा अर्थ आहे..

**जर्मन विचारवंत हर्डरच्या** मते, **"इतिहास म्हणजे घटनांची साखळी होय. "(History is the chain of events.)** हर्डरच्या मते कोणतीही ऐतिहासिक घटना ही एकाकीपणे तपासून पाहता येत नाही तर त्या घटनेमागे घटनांची एक साखळी असते. उदाहरणार्थ पहिले महायुद्ध हे आर्चड्यूक फर्डिनांड या ऑस्ट्रियन राजपुत्राच्या खुनाने सुरू झाले असे नव्हे तर ते अनेक कारणांपैकी एक कारण आहे. हिटलरच्या पोलंडवरील आक्रमणाने ने दुसरे महायुद्ध सुरू झाले असे नव्हे तर ते अनेक कारणांपैकी एक कारण आहे.

**कार्लाईल** यांच्या मते **"इतिहास म्हणजे श्रेष्ठ व्यक्तीची चरित्रे व त्यांनी बजावलेली कामगिरी होय."(History is nothing but the biographies of great men.)** ही व्याख्या मर्यादित स्वरूपाची असली तरी ती पूर्णपणे अर्थहीन अथवा चुकीची आहे असे म्हणता येत नाही. कार्लाईलला असे म्हणावयाचे होते की, काही श्रेष्ठ व्यक्ती आपल्या कर्तृत्वाच्या, विचारांच्या सामर्थ्यावर संपूर्ण राष्ट्रांची, समाजाची दिशा बदलतात. एखाद्या थोर व्यक्तीचे चरित्र हे त्या देशाचा त्या काळातील इतिहास असतो. एखाद्या व्यक्तीची त्या काळातील घडामोडींवर एवढी छाप पडलेली असते की, त्या व्यक्तीचे चरित्र म्हणजेच त्या काळातील इतिहास असतो. वस्तुत : प्रत्येक ऐतिहासिक व्यक्ती तत्कालीन विशिष्ट सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीचे फळ असते. त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात त्यावेळची स्वीकृत मूल्ये व आदर्श यांचा फार मोठा वाटा असतो. कर्तबगार व्यक्ती ही त्या त्या काळातील इतिहासाच्या केंद्रस्थानी असते. कार्लाइल म्हणतो, "What History requires is geniuses and not masses."उदा. मराठ्यांच्या इतिहासातून शिवाजी महाराजांना वगळले तर मराठ्यांच्या इतिहासात काय उरते ? मौर्यांच्या इतिहासातून चंद्रगुप्त मौर्य व अशोक यांना वजा केले तर काय उरते ? १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीनंतरचा इतिहास हा नेपोलियन बोनापार्टच्या नावाभोवती केंद्रित झाला

होता. स्वतंत्रोत्तर भारताचा राजकीय इतिहास (१९६६-१९८४) हा पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या नावाभोवती केंद्रित झालेला आहे. इटाली व जर्मनीच्या एकीकरणाचा इतिहास एकीकरणाच्या चळवळीतील प्रमुख नेत्यांच्या कार्यांशी एकरूप झाला आहे. स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास हा गांधीजींचे चरित्र व त्यांचे कार्य याभोवती केंद्रित झालेला आहे. थोर व्यक्तीच्या चरित्राशिवाय प्रत्येक देशाच्या इतिहासाचा अभ्यास होणे कठीण आहे. या एकूण पार्श्वभूमीवर कार्लाइलची इतिहासाचा संबंधी व्यथा काही अंशी का होइना बरोबर आहे असे म्हणता येईल.

**प्रा. इल्टन :** यांच्या दृष्टीने "**इतिहास म्हणजे मानवी जीवनात भूतकाळात घडलेल्या सर्व घटना त्याच्यातून उदयास आलेले विचार, सुख, दुःख, भोग, चांगल्या /वाईट गोष्टी वर्तमान काळात देखील आपला ठसा उमटवून जातात व ज्याच्यामुळे पुढे मानवाची भौतिक प्रगती सामाजिक बदल याबद्दल आपल्याला काही अटकळ बांधता येते.**"ही व्याख्या जास्त प्रमाणात इतिहासाबद्दल माहिती देते. इतिहासात मानवाच्या झालेल्या प्रगतीचा, विकासाचा विचार तर केला आहेच पण त्याचबरोबर मानवाला भोगावयास मिळालेले सुख दुःख, बऱ्या / वाईट गोष्टी यांचा देखील विचार असून वर्तमानात व भविष्यात घडलेल्या गोष्टींचा सखोल असा परिणाम घडलेला दिसतो. या व्याख्येने इतिहासाचा प्रवास हा भूतकाळ - वर्तमानकाळ - भविष्यकाळ या तिन्हीशी असून त्यांचे एकमेकांशी आंतरिक नाते आहे हे सिध्द केले आहे.

**सर चार्लस प्रिथ :"इतिहास म्हणजे गतकाळातील मानवी समाजाच्या बदलाचा आढावा आहे. यात त्या काळातील समाजात कसकसा बदल होत गेला, त्यावेळी समाजात कोणत्या निराळ्या संकल्पनांचा उदय झाला, त्यावेळची भौतिक परिस्थिती कशी होती आणि अनेक अडचणींवर मात करून मानवाने प्रगती कशी घडवून आणली त्याचा आढावा म्हणजे इतिहास होय."**या व्याख्याने मानवी समूह -मानवी समाज - समाजात कालपरत्वे झालेले उदय, तत्कालीन भौतिक परिस्थिती आणि मानवाला प्रगती घडवून आणत असतांना झालेला त्रास / अडचणी यावर त्याने केलेली मात या सर्व गोष्टी येतात. या व्याख्येचा साधा सरळ रोख मानवाच्या भौतिकप्रगतीचा आढावा व त्यातून उदयास आलेला नवा विचारप्रवाह म्हणजे इतिहास असा आहे. अनेक अर्थाने इतिहासाची योग्य मीमांसा त्यात आपल्याला आढळते.

**लॉर्ड ॲक्टन** :"**मानवाची मुक्तिगाथा म्हणजे इतिहास"**अशी अत्यंत सुटसुटीत व्याख्या केलेली आहे. ही व्याख्या मानवाने निसर्गाशी मैत्री करून आपले केलेले भले असा अर्थ त्याचा होतोच पण त्याचबरोबर मानवाने अनेक अडीअडचणींवर केलेली मात त्याचा आढावा म्हणजे इतिहास.असा देखील त्याचा अर्थ आहे.

**प्रा. ए.एल.रोस :"इतिहास म्हणजे भूगोल व प्राकृतिक स्थिती ह्यातून जडणघडण होत गेलेले मानवी जीवन व समाज जीवन यांचे आलेखन**"या व्याख्येचा अर्थ मानवी जीवनाच्या प्रगतीचा आढावा. जी प्रगती प्रामुख्याने त्या त्या प्रदेशाच्या भौगोलिक स्थितीवर अवलंबून आहे. म्हणजे भौगोलिक प्राकृतिक परिस्थिती ही इतिहासाला पूरक असते हे अगदी योग्य असेच आहे.

**प्रा. इ.एच.कार :** सुप्रसिध्द आधुनिक इतिहासकार म्हणून इ.एच.कार यांनी इतिहासाची व्याख्या करतांना**"इतिहास म्हणजे वर्तमानकाळ व भूतकाळ या मधील कधीही न**

**संपणारा संवाद होय."असे म्हटले आहे. (History is an unending dialogue between the past and the present.)** या व्याख्येत एक गोष्ट स्पष्ट होते की भूतकाळ आणि वर्तमानकाळ ही एकमेकाशी अगदी जोडले गेले आहेत. त्यांच्यातील संबंध हे कधीही संपणारे नाही. वर्तमानकाळात निर्माण झालेल्या समस्यांचे मूळ हे प्रायः भूतकाळात बघावयास मिळते. भूतकाळात घडलेली गोष्ट ही वर्तमान काळात वेगळ्या रूपात पुन्हा अनुभवता येते. या सर्व घटकांच्या मूळाशी मानवी वर्तन आहे.

इंग्रज व विद्वान **प्रोफेसर जॉन सीली** म्हणतो**, "इतिहास म्हणजे गतकाळातील राजकारण व वर्तमान काळातील राजकारण म्हणजे भावी इतिहास होय."(History is past politics and present politics is future history.)** प्रोफेसर सीलीच्या मते इतिहासाचा मुख्य उद्देश राजकारणातील मार्गदर्शक हाच आहे. प्रोफेसर सीलीच्या मते इतिहासामध्ये राजकारणाशिवाय दुसरे काहीही नाही. मात्र हा दृष्टिकोन फारच संकुचित वाटतो.

**प्रा.नेव्हिन्स :** या अमेरिकन इतिहासकाराच्या मते**"इतिहास म्हणजे भूतकाळाला वर्तमानकाळाशी जोडणारा पूल आहे व तो भविष्यकाळाचा मार्गदर्शक आहे." (History is actually a bridge connecting the past with the present and pointing the road to the future.)** नेव्हिस च्या मते,"इतिहास म्हणजे मानवाच्या हातातील कंदील आहे व तो मानवाच्या प्रत्येक पावलावर प्रकाश टाकत असतो आणि भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील अंधार भरून काढण्याचे काम करतो व या प्रकाशाच्या आधारावर मानवाला भविष्यकाळाची चाहूल घेता येते."या व्याख्येचा अर्थ असा निघतो की इतिहास हा भूतकाळ व वर्तमानकाळ या दोन्ही काळांशी संबंधित आहे. त्यामुळे दोन्ही काळात घडलेल्या घटनांमुळे मानवाला योग्य असे मार्गदर्शन सातत्याने पुढील भविष्यात मिळते. पूर्वी झालेल्या वर्तमानकाळात होत असलेल्या चुकांची पुनरावृत्ती भावीकाळात टाळता येते.

**कार्ल मार्क्स :** १ ९ व्या शतकातील क्रांतीकारी, श्रेष्ठ जर्मन तत्वज्ञ याने इतिहासाचा सखोल असा अभ्यास करून आपले क्रांतीकारी तत्वज्ञान जगासमोर मांडले व साम्यवादाचा उदय जगात झाला. त्याच्यामते**"इतिहास म्हणजे वर्गकलहाचा इतिहास होय"**कालानुसार वर्गाची नावे बदलतील कलहाचे स्वरूप मात्र कायम आहे. ते आहेरे आणि नाहीरे (Haves and Have nots) असाच तो संघर्ष कायम इतिहासात बघावयास मिळतो. इतिहासातील सातत्याने दिसणाऱ्या संघर्षाचा धागा कार्लमार्क्सने नेमका धरून हा संघर्ष श्रीमंत आणि गरीब, जमीनदार आणि भूदास, सरंजामदार आणि तळागाळातील सामान्यजन यांच्या संघर्षाचा इतिहास कार्ल मार्क्सला अभिप्रेत आहे. कार्लमार्क्सची इतिहासाची व्याख्या ही विशिष्ट आसाभोवतीच फिरते आहे. संघर्षाव्यतिरिक्त इतिहासात बाकी काही नाही असे म्हणणे योग्य ठरणार नाही. संघर्ष हाच केवळ इतिहासाचा पाया आहे असे म्हणणे आततायीपणाचे आहे. संघर्ष सर्व ठिकाणी आहे पण तो फारच मोलाचा आहे असे मानून त्याला अवाजवी महत्त्व देणे तेवढे बरोबर नाही.

**टॉइन्बी :** सुप्रसिध्द इंग्रज इतिहासकार अरनॉल्ड टॉइन्बी याने जगातील सर्व संस्कृत्यांचा अभ्यास करून इतिहासाची व्याख्या अशी केली आहे की**"मानवी संस्कृतीचा उदय व -हास म्हणजे इतिहास." (All history is nothing but the rise and fall of**

**human civilization.)** इतिहास म्हणजे दुसरे काही नसून संस्कृतीचा उदय व त्यांचा कालानुरूप होणारा -हास ह्याचा एक भला मोठा पट इतिहास निर्माण करते. म्हणजे इतिहासात संस्कृती असणे आवश्यक आहे. संस्कृतीच्या उदय व -हासाशिवाय इतर काहीही इतिहासात आढळत नाही. टॉइन्बी याने सारे आयुष्य संस्कृतीच्या अभ्यासासाठी व्यतीत केल्याने इतिहासाची व्याख्या म्हणजे संस्कृतीचा अभ्यास / शोध / निरीक्षण / प्रगती यांच्याशीच संबंधित असणार हे अगदी उघड आहे. टॉइन्बी याने मात्र संस्कृतीचा उदय - विकास - -हास यावर भर देऊन इतिहासाची व्याख्या जास्त समर्थक, विशाल अशी केली आहे. यात शंका नाही. तत्त्वज्ञान इत्यादी चे त्यांचे चिंतन होते.

**पंडित नेहरूंनी** इतिहासाची व्याख्या पुढील शब्दात केली आहे ते म्हणतात,**"मनुष्याने निरनिराळ्या युगात निसर्ग व पंचमहाभूते, वन्यपशू व अरण्य आणि शेवटी ज्या सजातियानी त्याला पददलित ठेवण्याचा व आपल्या स्वार्थासाठी त्याचे शोषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे, या सर्वांच्या विरुद्ध त्याने केलेल्या संघर्षाची कहाणी म्हणजे इतिहास होय."**

**वि. का. राजवाडे** यांनी इतिहासाची अत्यंत सोपी व्याख्या केली आहे. ते म्हणतात,**"समाजाच्या चरित्रातील गतगोष्टीची जी हकीगत तो इतिहास होय. इतिहास म्हणजे राष्ट्राचे सर्व तऱ्हेचे गतकालीन चरित्र होय."**

**डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन** यांच्या मते, **"History is the memory of the nation, History is the memory of the races."**

**धनंजय कीर** यांच्या मते,**"इतिहास हे मानवी समाजाचे एक अखंड, अभंग, नि अविभाज्य असे छायाचित्र होय."**

**सदाशिव आठवले,** इतिहासाचे तत्त्वज्ञान या ग्रंथात म्हणतात,**"इतिहासाचा दुसरा कोणताही अर्थ लागो न लागो इतिहास म्हणजे बदल, इतिहास म्हणजे स्थित्यंतर होय."**

**रियासतकार गो. स. सरदेसाई** यांनी**"इतिहास म्हणजे मानवी प्रगतीचा आढावा"**असे म्हटले आहे.

**धर्मानंद कोसंबी** यांच्या मते, **"इतिहास म्हणजे साधन व उत्पादन यांच्या संबंधातील एक अनुक्रमावर आधारित अशी घटना होय."**

वरील व्याख्या पाहिल्या असता आपल्या लक्षात येते की इतिहास म्हणजे इतिहासकाराच्या नजरेसमोर घटना येतात. या घटनांचा नुसता एक ढीग म्हणजे इतिहास नव्हे तर विविध घटनांमध्ये एक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. त्या घटनांचा अन्वयार्थ लावीत असता कोणत्या ना कोणत्या तत्त्वज्ञानाचा आधार घेतला जातो. इतिहासकार, इतिहासामध्ये मानवी समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण घटना, त्यामागील तत्त्व, विचार, व्यक्तीची वृत्ती यांचा विचार करतो. समाजाला समजेल, रुचेल, पचेल अशा शब्दांत आपले संशोधन मांडत असतो.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

प्र. १. इतिहासाच्या विविध व्याख्या लिहा.

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------

## १.३ इतिहासाची व्याप्ती (Scope of History)

आतापर्यंत आपण इतिहास म्हणजे काय याची माहिती घेतली. आता आपल्याला इतिहासाची व्याप्ती पाहावयाची आहे. इतिहासाची व्याप्ती ठरवीत असताना पहिल्यांदाच एक समस्या निर्माण होते की, इतिहासाचा अभ्यास कोणत्या कारणासाठी महत्त्वाचा ठरतो. इतिहासाचा वर्ण्य विषय भूतकाळाशी संबंधित आहे. असा भूतकाळ संदर्भ साधनांमधूनच दिसून येतो. कागदपत्राशिवाय इतिहास लिहिता येत नाही. म्हणूनच **लॅंजिलास व सिनबॉस** म्हणतात, "No documents no History"' इतिहासाच्या टीकाकारांच्या मते, ' Dead - Past ' पेक्षा Living Present हे जास्त महत्त्वाचे आहे. परंतु आज जे सद्य : स्थितीत (Living Present) असते तेच काही काळाने मृतप्राय (Dead Past) होते. म्हणून कोणत्याही घटनेमध्ये असा कालानुक्रमे फरक करता येणार नाही. आपल्याला भेडसावणाऱ्या अनेक प्रसंगांचे मूळ गतकाळामध्ये असते. म्हणून गतकाळाच्या, माहितीशिवाय वर्तमानकाळातील त्या समस्येवरील उपाय आपल्याला शोधून काढणे शक्य नाही.

इतिहास या विषयाची व्याप्ती ही विविध कालानुरूप सातत्याने बदलती राहिली आहे. आधुनिक कालखंडात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, मानसशास्त्रीय अशा असंख्य सामाजिक शास्त्रांचा जन्म झाला. प्रत्येक सामाजिकशास्त्र आपली महत्वाची भूमिका आपआपल्या चौकटीप्रमाणे पार पाडत आहे आणि आपला विषय हा इतर विषयांप्रमाणेच महत्वाचा आहे असे सातत्याने सांगत आहे. इतिहास या विषयाच्या संदर्भात अशी गोष्ट घडली आहे की त्याची व्याप्ती फार मोठया प्रमाणात असून त्याचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. त्याची शिकवण सर्वच दृष्टीने जीवनाला उपयुक्त आहे. कारण मानवी जीवनात घडून गेलेल्या गोष्टी व त्याचे होणारे परिणाम हे फार मोठे आहेत. इतिहासाचे अध्ययनाने भविष्यकाळात निर्णय घेतांना नेहमीच उपयुक्त ठरले आहे हे आपल्याला नाकारता येणार नाही. **प्रा. इलटन** यांच्या दृष्टीने"सर्व काही इतिहासाचे उत्तम लिखाण हे एका अर्थाने जागतिक इतिहासाचाच भाग आहे. कारण एका छोट्या देशाच्या इतिहासाचा विचार करतांना जगाचा विचार टाळता येत नाही."इतिहासाची व्याप्ती वाढत जाण्याची खरी कारणे खालीलप्रमाणे आहेत.

(१) आज देखील अतिप्राचीन जुन्या संस्कृतीचा शोध लागत आहे. जुने अतिप्राचीन असे शिलालेख, भूर्जपत्रे, प्राचीन काळातील भांडी, विविध वस्तू उत्खननाद्वारे मिळत आहे. त्यामुळे प्राचीन कालखंडाच्या ज्ञानात / माहितीत भर पडत आहे. जुने सिद्धांत मागे पडून नवे सिद्धांत नव्याने मांडले जात आहे.

(२) नवीन भौगोलिक शोधांमुळे अतिप्राचीन संस्कृतीच्या शोधाबरोबरच नवी मानवाची वंशावळ नव्याने पुढे येत आहे. मानववंशशास्त्रात नव्या माहितीची भर पडून नवे सिद्धांत मांडले जात आहे ते इतिहासाच्या अध्ययनाला पूरक ठरत आहे.

(३) काळाच्या ओघात इतिहासाची व्याप्ती वाढली असून हकीकत सांगणे, ही हकीकत कशी घडली ते सांगणे शिवाय हकीकतीचे बौद्धिक दृष्ट्या विश्लेषण करणे व त्याच्यावर आधारित भविष्यकाळासाठी काही अनुमान तयार करणे, असे खरे आता इतिहासाचे स्वरूप बनत चालले आहे. म्हणून त्याची व्याप्ती वाढीस लागली आहे. या पूर्वी इतिहास हा केवळ राजकीय - राजघराण्यांचा राजाच्या कुटुंबापुरता मर्यादित होता. युद्ध, तह, विजय, पराजय यांच्याशी निगडित होता. आता तसे स्वरूप इतिहासाचे नव्या युगात राहिले नाही. माणसाच्या सर्व सामाजिक गोष्टींचा त्याच्या कृत्यांचा, चालीरीतीचा, परंपरांचा, भाषेचा, विचारांचा, वर्तनाचा विचार इतिहासात साकल्याने केला जात आहे. किंबहुना माणसाचे दैनंदिन जीवन हा भाग देखील इतिहासाचा विषय बनला आहे.

अगदी पूर्वी इतिहास हा विषय वाङमयाचा किंवा राजकारणाचा - राज्यशास्त्राचा एक भाग म्हणून त्याकडे पाहिले जात होते. आज इतिहास हा स्वायत्त विषय मानला जात आहे. त्यामध्ये मानवी समूहाचा अभ्यास, त्याचा कलाविकास, नैतिक कल्पना, धार्मिक कल्पना, विविध परंपरा यांचा झालेला विकास, व्यापार, अर्थशास्त्रीय व्यवहार, नाणी इ. चा देखील विचार आता इतिहासामध्ये केला जात आहे. इतिहासाची साधने गोळा करून त्याचा अन्वयार्थ लावून ऐतिहासिक घडामोडी मागे असणारी प्रेरणा स्पष्ट करणे ही इतिहासाची व्याप्ती बनलेली आहे.

अगदी अलिकडच्या काळात इतिहास या विषयांतर्गत सामाजिक बदल social change, आर्थिक घडामोडी Economic Activities, तळागाळातील जनसामान्यांचा इतिहास या विविध विषयांबरोबर तत्वज्ञान या विषयात होणारे बदल हा देखील अभ्यासाचा विषय बनला आहे. त्याचबरोबर कामगार चळवळ, वर्गकलह, शेती, उद्योगधंदे त्याचा विकास यासारखे विषय देखील आता इतिहासाच्या अध्ययनाचा भाग बनले आहेत.

**प्रो. गुस्टावसन (Gustavson)** आपल्या **' A Preface to History '** या ग्रंथात म्हणतात की, एखादा मनोवैज्ञानिकसुद्धा औषध सुचविण्यापूर्वी रुग्णाच्या गतकालाकडे जातो, ज्यावेळी त्याला रुग्णाची समस्या सोडवावयाची असते, तेव्हा त्याला निदान करण्यासाठी रुग्णाची व्यक्तिगत माहिती असणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व म्हणजे तिच्या अनुभवांची गोळाबेरीज, त्याचप्रमाणे एखादे राष्ट्र किंवा संस्था यांचे दृश्य स्वरूप त्यांच्या पार्श्वभूमीवर प्रकाश टाकते.

इतिहासाच्या अभ्यासाने माणसाची अनुभवकक्षा वाढते. अनेक घटनांतील परस्परसंबंध त्याला समजून येतात. **प्रो. एल्टन** (Alton) आपल्या **' The Practice of History '** या

ग्रंथात म्हणतात,"इतिहासाच्या ज्ञानाने वर्तमानकाळाच्या अनुभूतीला भक्कमपणा येतो व भविष्यकाळासाठी काही मार्गदर्शन होऊ शकते. ("Historical knowledge gives solidity to the understanding of the present and may suggest guiding lines for the future.")

इतिहासाच्या अभ्यासाने माणसाला आपला बुद्धिवादी दृष्टिकोण (Rational Attitude) व तर्कबुद्धी (Reasoning) वाढविता येते. **प्रो. आर्. जी. कॉलिंगवूड (R.G.Collingwood)"**यांनी **' Idea of History '** या ग्रंथात"इतिहासाला खूप महत्त्व आहे. त्याची शिकवण मानवी जीवनाला उपयुक्त आहे. कारण सध्याच्या मानवी जीवनातील गतगोष्टी व त्याचे होणारे परिणाम यामुळे त्यातील नाद हा पूर्वीप्रमाणेच बदलण्याची शक्यता आहे. महत्त्वपूर्ण घटना लक्षात ठेवल्याने भविष्यकाळात निर्णय घेण्याच्या दृष्टीने त्या उपयुक्त ठरतात. असे हे निर्णय दृश्य स्वरूपात दाखविता येत नाहीत. परंतु काय होऊ शकेल व सध्याच्या सुसंगत कालक्रमणेमध्ये कोणता धोका होऊ शकेल याचे दिग्दर्शन करता येईल. ("History has a value, its teachings are useful for human life ; simply because the rhythem of its change is likely to repeat itself, similar antecendents leading to similar consequents, the history of notable events is worth remembering in order to serve as a basis for prognostic judgements, not demonstrable but probable laying down not what will happen, but what is likely to happen, indicating the points of danger in rhythems now going on".)

**प्रो. लेकी (Lecky)** ने इतिहासाची व्याप्ती सांगताना म्हटले आहे की, "जी व्यक्ती गतकाळातील घटनांचे वैशिष्ट्य जाणण्यात निष्णात आहे, ती व्यक्ती स्वत : च्या समकालीन घटनांचे मूल्यमापन करण्यात फारशी चूक करणार नाही."("He who has learnt to understand the true character and tendency of many succeeding years is not likely to go very far wrong in estimating his own.")

**प्रो. बॉडीन (Bodin)** ने इतिहासाची व्याप्ती ठरवीत असताना तीन महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे :

१. ज्या शाश्वत तत्त्वावर मानवी स्वभावाची बैठक आधारित आहे त्या तत्त्वाची ओळख इतिहासामुळे आपल्याला होते. उदा. मानवी स्वभावातील राग, लोभ, मोह, क्रौर्य, हिंसा, महत्त्वाकांक्षा या गुणांची ओळख आपल्याला इतिहासामधून होते. मोगल इतिहासामध्ये जागोजागी क्रौर्य आपल्याला दिसते. उदा. मोगल राज्यकर्ते शिक्षेचा भाग म्हणून आपल्या विरोधकांची डोळे काढीत असत. आपल्या विरोधकांचा नायनाट करण्याची प्रवृत्ती मोगलांमध्ये किंबहुना अनेक राज्य कर्त्यांमध्ये आपणास दिसते.

२. ऐतिहासिक घटनांच्या अभ्यासावरून एका ठराविक मर्यादेपर्यंत भावी घटना वर्तविता येतात. या व्याप्तीचे स्वरूप असे की, प्रत्येक राष्ट्राची, समाजाची विशिष्ट जडणघडण असते. एकदा या जडणघडणीचा अभ्यास केला म्हणजे त्या समाजासंबंधी, राष्ट्रासंबंधी आपल्याला भवितव्यता काही प्रमाणात वर्तविता येईल. इतिहासाच्या अभ्यासाने ज्याप्रमाणे भवितव्यता वर्तविणे काही प्रमाणात शक्य आहे,

त्याचप्रमाणे वर्तमानकाळाचा अभ्यास करून आपल्याला ऐतिहासिक घटनांच्या आधारे भूतकाळाचे चित्र उभे करणे शक्य आहे.

३. मानवी इतिहासाच्या अभ्यासाद्वारे शाश्वत जीवनाची मूल्ये जाणता येतात. मानवी जीवनाची शाश्वत मूल्ये म्हणजे प्रेम, दया, शांती, माणुसकी, मानवतावाद इ. प्राचीन भारताच्या अभ्यासापासून या गुणांचा परिपोष झालेला आपल्याला दिसतो. आधुनिक जगामध्ये याच मूलभूत सत्याच्या मागे सर्व जग धावते आहे असे आपल्याला दिसते.

इतिहासाचे क्षेत्र दिवसेंदिवस व्यापक होत आहे. पूर्वी इतिहास फक्त राजे, राण्या, लढाया, तह याच्यापुरताच मर्यादित होता आता त्याची व्याप्ती खूप बदलली आहे. पूर्वी सामान्य माणसाला इतिहासामध्ये कोणतेही स्थान नव्हते आज तोच सामान्य मनुष्य इतिहासाचा 'कणा ' बनला आहे. तळागाळातील लोकांचा इतिहास (Subaltern History) हा इतिहासाचा महत्त्वाचा भाग बनला आहे. पूर्वी स्त्रियांसंबंधीचा दृष्टिकोण अतिशय संकुचित होता, आज स्त्रीवादी दृष्टिकोण (Feminist Attitude) हा इतिहासलेखनाचा, संशोधनाचा महत्त्वाचा विषय मानला जातो.

**प्रो. बी. शेख अली** यांनी इतिहासाच्या व्याप्तीचे वर्णन करीत असताना पुढील मुद्यांची चर्चा केली आहे.

(१) जे घडले त्याचे वर्णन करणे.

(२) जे घडले त्याचे मूल्यमापन करणे.

या दोन तत्त्वामध्येच वेगळ्या स्तरांवर आपल्याला इतिहासाची व्याप्ती स्पष्ट करता येईल. इतिहासांची व्याप्ती मानवी जीवनाशी निगडित असते. मानवी जीवन अनेक अंगांनी बहरत असते. त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक धार्मिक बाबींचा संबंध येत असतो. समाजजीवनातील रूढी, परंपरा मनोरंजनाचे विविध प्रकार या सर्वांचा समावेश इतिहासामध्ये होत असतो. इतिहास हा एक स्वयंभू विषय आहे, ही बाब विद्वानांनी मान्य केलेली आहे. त्यामुळे इतर कोणत्याही विषयाच्या अधिपत्याखाली न राहता विविध कला, नीतिमूल्ये सर्वांचा व्यापक अर्थाने इतिहासामध्ये समावेश होत असतो.

इतिहासाला दोन प्रकारची कार्ये करावी लागतात.

(१) संदर्भसाधने गोळा करणे व

(२) मिळालेल्या इतिहासाच्या साधनांचे मूल्यमापन करणे.

या दोन प्रक्रिया मूलभूत शास्त्रीय प्रक्रिया आहेत. त्यामुळे स्वाभाविकच इतर शास्त्राप्रमाणेच वस्तुनिष्ठता (Objectivity) व शास्त्रीय दृष्टिकोण (Scientific attitude) अवलंबावा लागतो. परंतु इतिहासाचा गाभा मानवी मनातील भावभावनाशी असतो. त्यामुळे शास्त्रामधील वस्तुनिष्ठता प्रत्यक्षात येऊ शकत नाही. ही इतिहासामधील उणीव आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. इतिहासाचा संबंध मानवी जीवनाशी असतो आणि मानवी जीवन परिपूर्ण करण्यासाठी साहित्याचा आधार घ्यावा लागतो. **सर जदुनाथ सरकार**

यांच्या मते, ' इतिहास आणि साहित्य ' यांना विभागणारी रेषा अतिशय पुसट आहे. या विधानाचा अर्थ असा की, इतिहासाची व्याप्ती ही साहित्याप्रमाणेच अतिशय व्यापक आहे.

**प्रो. जी. एम. ट्रिव्हलीन** यांनी इतिहासाची ' त्रिविध ' व्याप्ती सांगितलेली आहे. ती व्याप्ती अशी-

(१) शास्त्रीय (२) काल्पनिक व (३) साहित्यिक

या त्रिविध व्याप्तीचा विचार केला असता आपल्या असे लक्षात येते की, आधुनिक काळात शास्त्रीय दृष्टिकोणामुळे ज्या काही संशोधनाच्या विविध शाखा निर्माण झाल्या त्यांचा समावेश होतो यालाच आपण शास्त्रांचा इतिहास (History of Sciences) म्हणतो. उदा. मानवाने चंद्रावर ठेवलेले पाऊल किंवा भारतीय अंतरिक्ष महिला कल्पना चावला हिच्या बाबतीत घडलेली घटना किंवा मंगळ ग्रहाचे पृथ्वीजवळ येणे ही शास्त्रीय घटना ही सुद्धा इतिहासाची व्याप्ती आहे.

काल्पनिक बाबींचा विचार केला असता बऱ्याच वेळा घडलेल्या घटनांच्या आधारे वर्तमान किंवा भविष्यकाळामध्ये काय घडू शकेल यासंबंधी विचार करणे हीसुद्धा इतिहासाची व्याप्तीच आहे. उदा. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेतील World Centre वर झालेला दहशतवादी हल्ला यावरून कल्पनेच्या आधारावरून भावी काळात कोणत्या घटना घडू शकतील याचा अंदाज येऊ शकतो.

साहित्यामध्ये तर आपल्याला इतिहासाचे पदोपदी दर्शन होत असते. मग ती शेक्सपिअरची ऐतिहासिक नाटके असोत, वसंत कानेटकरांनी लिहिलेली ' विषवृक्षाच्या छायेत ' ' हिमालयाच्या सावलीत ' किंवा ' रायगडाला जेव्हा जाग येते ' अशी नाटके असोत. न्या. रानडे यांचे लेख असोत अथवा म. फुल्यांनी लिहिलेल्या ' शेतकऱ्यांचा आसूड ' यासारखे साहित्य असो.

थोडक्यात, इतिहासाची व्याप्ती ही मानवाच्या उत्क्रांतीशी संबंधित आहे. इतिहासामध्ये मानवाने विविध क्षेत्रांत केलेली प्रगती व तिचा आलेख येणे आवश्यक असते. इतिहासाच्या वाचनामध्ये व्यक्ती आपले प्रतिबिंब शोधण्याचा प्रयत्न करीत असते व अशा त-हेचे प्रतिबिंब ज्या वेळी इतिहासामध्ये दिसेल त्या वेळीच खऱ्या अर्थाने इतिहासलेखन झाले असे म्हणता येईल. अनादि कालापासून सामान्य माणूस परिस्थितीचे भक्ष्यच बनत गेला आहे. त्याचे हुबेहूब वर्णन इतिहासामध्ये आले पाहिजे.

इतिहासाच्या व्याप्तीमध्ये आर्थिक घडामोडी व समाजशास्त्रीय बदल यामुळे वाढ होत आहे. मार्क्सवादी तत्त्वज्ञानाने अंतर्विरोधाची (Dialects) कल्पना मांडली. व्यक्ती किंवा समाज यांची प्रगती होण्यासाठी अंतर्विरोधाची कल्पना मांडली. विरोध- विकास हे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे मानतात. सोशल डार्विनिझमची संकल्पना समाजाला लावण्यात येते. ही सुद्धा इतिहासाची व्याप्ती आहे. साम्यवादी देशामध्ये घडणाऱ्या घडामोडींकडे मार्क्सवादी तत्त्वज्ञानातून पाहिले जाते. अशा घडामोडींमध्ये कामगार चळवळ, वर्ग कलह, व्यापार, उद्योगधंदे, शेती इत्यादींचा समावेश असतो. एखाद्या लोकशाहीवादी देशात याच घटनांच्याकडे सामाजिक बदल अशा दृष्टिकोणातून पाहिले जाते. विविध राजकीय - सामाजिक संस्थांचा, संसदीय लोकशाहीचा विकास ही इतिहासाची व्याप्ती दर्शवितात. स्वाभाविकच इतिहासाची व्याप्ती वाढून अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र,

munotes.in

मानववंशशास्त्र, इतर भौतिकशास्त्रे यांच्याशी निगडित असणारा विषय म्हणून इतिहासाकडे पाहिले जाते. इतिहासाचे विविध प्रकार उदा. संसदीय पद्धतीचा इतिहास, लष्कराचा इतिहास, कायद्यांचा इतिहास या विषयाची व्याप्ती दाखवितात.

काळाच्या ओघात इतिहासाची व्याप्ती वाढली. इतिहासाला त्रिविध कामे करावी लागतात, ती पुढीलप्रमाणे :

१) हकिकत सांगणे.

२) ही हकिकत कशी घडली ते सांगणे व

३) हकिकतीचे विच्छेदन करणे.

परंतु अगदी अलीकडील काळात यापेक्षासुद्धा इतिहासाची व्याप्ती वाढली आहे. पूर्वी इतिहासाला खूप मर्यादा होत्या. त्यावेळी फक्त राजघराण्यांचा उदय व अस्त, राजांचे दरबार, युद्धे व तह यांचा विचार करणे म्हणजे इतिहास असा समज होता. आता मात्र इतिहासाकडे मानवतावादी दृष्टिकोणातून पाहिले जाते. माणसाच्या सर्व सामाजिक हालचालींचा उदा. विविध खेळ, चालीरीती, परंपरा या सर्वांचाच विचार केला जातो. इतकेच नव्हे तर सामान्य माणसाचे दैनंदिन जीवन हा सुद्धा इतिहासाचा विषय बनलेला आहे.

पूर्वी इतिहास ही वाङ्मयाची किंवा तत्त्वज्ञानाची किंवा राज्यशास्त्राची एक शाखा म्हणून तिच्याकडे पाहत असत. परंतु आज इतिहास हा एक स्वायत्त विषय मानला गेला आहे. इतिहासाला जो स्वायत्त दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे मानव किंवा मानवी समूह यांचा अभ्यास करीत असताना त्याबद्दल विविध प्रकारचे ज्ञान त्यांच्यातील कलाविकास, नैतिक अधिष्ठान, परंपरा आणि त्याची झालेली सर्वांगीण प्रगती हा इतिहासाचा वर्ण्य विषय बनलेला आहे. इतिहास नुसताच एखादी घटना जगाला सांगत नाही तर साधन साहित्य जमविणे व त्याचा अन्वयार्थ लावून ऐतिहासिक घडामोडीमागे असणारी प्रेरणा स्पष्ट करणे ही इतिहासाची व्याप्ती बनलेली आहे. इतिहास हा विषय शास्त्र आहे असे मानले जाते. परंतु ज्यावेळी संदर्भ साहित्य गोळा केले जाते तेव्हा ते गोळा करण्यामागे वस्तुनिष्ठता ही शास्त्रीय संकल्पना असते. परंतु ज्यावेळी घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रसंग येतो तेव्हा बऱ्याचवेळा व्यक्तिनिष्ठता येण्याची शक्यता असते.

इतिहास हा निसर्गाचा अभ्यास करीत नाही तर त्या निसर्गात राहणाऱ्या मानवाची प्रगती कसकशी झाली याचा तो विचार करतो. इतिहासामध्ये एखाद्या योद्ध्याच्या संदर्भात नद्या, पर्वत, सागर, डोंगर यांचा विचार केला जातो. उदा. प्लासीच्या रणांगणाचा विचार रॉबर्ट क्लाईव्हच्या संदर्भात, पानिपतच्या रणांगणाचा विचार भाऊसाहेब आणि अब्दाली यांच्या संदर्भात, तर वॉटर्लूचा विचार नेपोलियनच्या संदर्भात केला जातो. याचा अर्थ असा की, मानवाच्या जडण - घडणीमध्ये निसर्गाचा जेवढा संबंध असेल तेवढ्या संदर्भातच निसर्गाचा विचार केला जातो. इतिहासकाराने इतिहासाची व्याप्ती ठरवीत असताना नुसतेच प्रशासन, कायदा किंवा धर्म यांचा विचार न करता त्यांच्या पलीकडे परंतु मानवी समाजामध्ये ज्या घटना घडत असतात त्यांचा विचार केला पाहिजे. इतिहासामध्ये शास्त्रीय प्रगती, तंत्रज्ञानविषयक प्रगती, भौगोलिक शोध या सर्वांचा मानवावर कोणता परिणाम झाला या संदर्भात अभ्यास केला पाहिजे. इतिहासामध्ये सामान्य व्यक्ती ही सर्वांत महत्त्वाची मानली

जाते. कारण अशी व्यक्ती एखादे राज्यशासन निर्माण करू शकते किंवा अन्यायकारक राज्यशासनाचा शेवट करू शकते.

इतिहासाच्या बदलत्या व्याप्तीसाठी इतिहास लेखनशास्त्र देखील तेवढेच जबाबदार मानले पाहिजे. कारण १९ व्या शतकापर्यंत इतिहासाचे अध्ययन हे केवळ राजकीय घटना, प्रसंग यांच्याशी निगडित होते. पण सध्या इतिहासाचा विचार करतांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, नैतिक, साहित्यविषयक, गोष्टींचा आपण विचार करतो कारण इतिहासात आपण मानवाच्या प्रगतीचा विचार करतो. तेव्हा वरील विषयांचा विचार करणे केवळ अपरिहार्य ठरते. इतिहास हा विषय रूक्ष न बनता सतेज, आकर्षक बनण्यासाठी साहित्याचा आधारदेखील नेहमी घेतला जातो. इतिहासलेखन शास्त्राने वर नमूद केलेल्या विषयांचा आधार घेऊन साधने गोळा करणे व त्यातून भूतकाळातील घडलेल्या घटनांचा, गोष्टींचा वेध घेण्याचे काम सुरू ठेवले आहे.

इतिहासाची वाटचाल वस्तुनिष्ठ अनुभववादापासून (Empirism) इतिहासावादापर्यंत (Historicism) झाली आहे. वस्तुनिष्ठ अनुभववाद म्हणजे ऐतिहासिक घटितांची (Historical facts) निश्चिती करण्याची प्रक्रिया होय, तर इतिहासवाद म्हणजे घटितांची सुरुवात, उगम कसा झाला ते सांगून त्या घटितांचा विकास कसा झाला हे सांगण्याची प्रक्रिया होय. या दोन्ही संकल्पना इतिहासाची व्याप्ती वेगळ्या प्रकारे सिद्ध करतात. इतिहासांच्या व्यापक स्वरूपावर **सिग्मंड फ्रॉईड व अल्बर्ट आईनस्टाईन** यांच्या विचारसरणीचा प्रभाव दिसून येतो. यामधूनच अमेरिकेने ऐतिहासिक सापेक्षतावाद (Historical relativism) ही संकल्पना रूढ केली.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. इतिहासाची व्याप्ती विशद करा.

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

## १. ४ सारांश :

एतिहासिक घटनांचा नुसता एक ढीग म्हणजे इतिहास नव्हे तर विविध घटनांमध्ये एक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. या घटनांचा अन्वयार्थ लावीत असता कोणत्या ना कोणत्या तत्त्वज्ञानाचा आधार घेतला जातो. इतिहासकार, इतिहासामध्ये मानवी समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण घटना, त्या मागील तत्त्व, विचार, व्यक्तीची वृत्ती यांचा विचार करतो. समाजाला समजेल, रुचेल, पचेल अशा शब्दांत आपले संशोधन मांडत असतो. इतिहासाला नुसती घटना नोंदवून चालत नाही तर ती हकीगत कशी घडली त्याचा अन्वयार्थ लावून ऐतिहासीक घडामोडी मागची प्रेरणा स्पष्ट करावी लागते. त्यामुळे इतिहासाची व्याप्ती वाढत जाते.

## १.५ प्रश्न :

१. इतिहासाचा अर्थ व व्याख्या स्पष्टीकरणासह लिहा.

२. इतिहासाची व्याप्ती विशद करा.

३. इतिहासाच्या विविध व्याख्या सांगा. त्यापैकी कोणती व्याख्या ही अधिक बरोबर आहे असे तुम्हास वाटते का?

## १.६ अतिरिक्त वाचन :

१. ई. एच. कार, अनुवादक - प्रा.वि.गो. लेले, इतिहास म्हणजे काय ? कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

२. गार्डन चाईल्ड, अनुवादक - डॉ. बलराज शर्मा, इतिहास का इतिहास, हरियाणा साहित्य अकादमी, चंदीगढ, १९८८.

३. डॉ. गोविंदचंद्र पांडे, इतिहास : स्वरूप एवं सिद्धांत, राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपूर, १९९ ८.

४. डी. डी. कोसांबी, पुराणकथा व वास्तवता.

५. द. वि. केतकर, इतिहासातील अंत : प्रवाह.

६. ग. ह. खरे, साधना चिकित्सा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७६.

७. वि. द. घाटे, इतिहासशास्त्र आणि कला, देशमुख प्रकाशन, पुणे.

८. प्रभाकर देव, इतिहास : एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड.

९. सदाशिव आठवले, इतिहासाचे तत्त्वज्ञान, प्राज्ञ पाठशाला मंडळ, वाई, १९६७.

१०. डॉ. शांता कोठेकर, इतिहास : तंत्र आणि विज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.

११. सुहास राजदरेकर, इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८.

१२. डॉ. बी. एन. सरदेसाई, इतिहासलेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

१३. गायकवाड, डॉ. सरदेसाई हनमाने, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१.

१४. डॉ. एस. एस. गाठाळ, इतिहासाचे तत्वज्ञान, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००५

❄❄❄❄❄❄❄

munotes.in

munotes.in

# २

# इतिहासाचे स्वरूप व महत्व

**घटक रचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ इतिहासाचा अर्थ व व्याखया

२.३ इतिहासाची व्याप्ति

२.४ सारांश

२.५ प्रश्न

२.६ अतिरिक्त वाचन

## २.० उद्दिष्टे :

**हे युनिट पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी पुढील बाबतीत सक्षम होऊ शकेल :**

१. इतिहासाचा अर्थ आणि व्याख्या समजणे.

२. इतिहासाच्या व्याप्तीचे मूल्यमापन करणे.

## २.१ प्रस्तावना :

इतिहास हा एक गतिमान व बहुआयामी विषय आहे. त्याला सर्व विषयांची जननी म्हणून गणले जाते. इतिहासाचे ठिकाण, वेळ आणि विषयानुसार प्रकार आहेत. पूर्व-ऐतिहासिक, प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक हे 'काळा' च्या आधारे इतिहासाचे प्रकार आहेत. आर्थिक, लष्करी, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादी 'विषया' नुसार इतिहासाचे प्रकार आहेत. स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय हे 'ठिकाणा' च्या आधारे इतिहासाचे प्रकार आहेत. आंतरराष्ट्रीय इतिहासात अशा घटनांच्या अभ्यासावर जोर देण्यात आला की घडलेल्या घटनांनी जगाच्या संपूर्ण मानवी समुदायावर त्याचा परिणाम केला. उदा. फ्रेंच राज्यक्रांती, पहिले महायुध्द, दुसरे महायुध्द. त्यानंतर देशांवर त्यांचा प्रभाव पाडणाऱ्या घटना व घडामोडींचा राष्ट्रीय इतिहासात अभ्यास केला जातो. उदा. भारतीय संदर्भात, १८५७ चा राष्ट्रीय उठाव, असहकार आंदोलन. प्रादेशिक इतिहास एखाद्या विशिष्ट प्रदेशात किंवा राज्यापुरते मर्यादित असून त्या अंतर्गत घडणाऱ्या घडामोडी आणि घटना यांच्या एतिहासिक प्रभावावर लक्ष केंद्रित करते. उदा. मराठ्यांचा इतिहास. स्थानिक इतिहासात अशा इतिहासाचा समावेश आहे ज्यामध्ये महत्त्वपूर्ण स्थानिक घटना आणि स्थानिक समुदायावर प्रभाव टाकणारी घटना मर्यादित असते . आधुनिक काळात स्थानिक इतिहासाच्या संशोधनावर विशेष भर दिला जात आहे. स्थानिक इतिहासामध्ये गतिमान सामाजिक, राजकीय, आर्थिक बदलांची प्रतिबिंब पुन्हा तयार केली जात आहे. पारंपारिक दृष्टीने इतिहास म्हणजे भूतकाळातील घटना आणि पूर्वीच्या जीवनाची त्याचच्या योग्यते व अयोग्यातेसह ओळख होय.

इतिहास म्हटल्यानंतर आपल्या डोळ्यासमोर भूतकाळ येतो. आणि भूतकाळ म्हणजे भूतकाळात घडलेल्या गोष्टी किंवा होऊन गेलेल्या गोष्टी किंवा जो काळ आता केवळ आठवणीत शिल्लक राहिला आहे असा काळ. इतिहासात भूतकाळातील घडलेल्या घटना किंवा त्याचा पुरावा किंवा निवेदन हे आपल्याला बघावयास मिळते. माणसाला पूर्वी काय घडले असावे याची फार मोठी उत्सुकता असते. त्याचबरोबर पुढे काय घडणार आहे याची जिज्ञासा असते. ' इतिहास ' या शब्दाचा अर्थ हा विविध प्रकारे वापरला जातो. एक अर्थ म्हणजे पूर्वी घडून गेलेल्या घटनांची जंत्री किंवा घडून गेलेल्या घटना. मात्र नंतरच्या काळात इतिहासाचा अर्थ म्हणजे पूर्वी घडून गेलेल्या घटनांची चौकशी करणे व त्याबद्दल काही विधान करणे. थोडक्यात इतिहास म्हणजे मानवाच्या जीवनात ज्या भूतकाळात होऊन गेलेल्या गोष्टी आहेत, घडामोडी आहेत त्यांचा प्रामुख्याने अभ्यास होय. इति + हा + आस = म्हणजे असे घडले हा त्याचा शब्दशः अर्थ होय. इतिहासात मानवी व्यवहार याचा विचार प्रथम येतो व तो विचार एक संघ आणि एकजिनसी असा केला जातो. केवळ वृत्तांत मांडणे म्हणजे इतिहास आहे असे समजणे बरोबर नाही. त्यातील म्हणजे वृत्तांत मांडण्यातील कला, सौंदर्य आणि सजीवता हेच खऱ्या अर्थाने इतिहासाचे खरे स्वरूप आहे. इतिहास हा संजीवक हवा. त्यात त्रयस्थपणा येता कामा नये. मानवी प्रगतीचा, त्याच्या मनातील स्पंदनाचा त्याच्या मनात निर्माण झालेल्या विविध विचारांचा, आचाराचा, एक जिवंत तात्त्विक झरा ज्यास नैसर्गिक प्रवाह आहे असा विषय व त्याचे अध्ययन म्हणजे इतिहास होय.

इतिहासाची संकल्पना प्रामुख्याने तीन गोष्टींवर साकारलेली आहे.

(१) भूतकाळातील परिस्थिती व त्या काळात मानवाने केलेली प्रगती.

(२) त्याने भूतकाळात केलेल्या प्रगतीबद्दलची नोंद असणाऱ्या व पुरावा म्हणून असणाऱ्या गोष्टी.

(३) मानवी प्रगतीची नोंद करणारी पध्दती व ती नोंद करण्यासाठी वापरलेले तंत्रज्ञान.

इतिहासाची संकल्पना ही मूळची ग्रीक लोकांची, लॅटिनमध्ये इतिहासाला "हिस्टोरिया" म्हणतात तर फ्रेंच भाषेत त्याला "हिस्टोरी" तर इंग्लिशमध्ये "हिस्ट्री" असे म्हणतात. वरील सर्व शब्दांचा खरा अर्थ चौकशी करणे किंवा चौकशी करण्याचा उद्देश, चौकशी करून मिळालेले ज्ञान अथवा माहिती संकलित करून सादर करणे असा होत नाही. पण मात्र भूतकाळात घडून गेलेल्या गोष्टीचा विचार करणे म्हणजे इतिहास किंवा भूतकाळातील यथार्थता (Actuality) म्हणजे इतिहास होय.

या घटकामध्ये आपण इतिहासाचा अर्थ व इतिहासाची व्याप्ती यावर चर्चा करू या.

## २.२ इतिहासाचा अर्थ आणि व्याख्या:

इतिहासाबद्दल अनेक प्रकारच्या व्याख्या अनेक नामवंत लेखकांनी मांडल्या आहेत. प्रत्येक व्याख्येत एक वेगळ्या प्रकारची छटा वा माहिती इतिहासाच्या संदर्भात आपल्याला मिळते आणि इतिहासाचे स्वरूप त्याची व्याप्ती किती मोठी आहे याचे ज्ञान आपल्याला मिळते. आता आपण काही महत्त्वाच्या व्याख्यांचा आढावा घेऊ.

**हिरोडोटस** या ग्रीक इतिहासकाराच्या मते,"**भूतकालीन मनोरंजक व संस्मरणीय घटनांचा शोध म्हणजे इतिहास होय."(History means inquiry into the interesting and memorable past events.)** या व्याख्येनुसार हिरोडोटसने मनोरंजकता व संस्मरणीयता हे इतिहासाचे प्रमुख निकष मानले आहेत. पण मनोरंजक घटना या संस्मरणीय असतात किंवा संस्मरणीय घटना या मनोरंजक असतातच असे नाही. या व्याख्येनुसार इतिहासातील संस्मरणीय घटनांची निवड करण्याची जबाबदारी हिरोडोटस इतिहासकारावर टाकतो.

सुप्रसिध्द इंग्रज विचारवंत **फ्रान्सिस बेकन** यांच्या मते"**मानवाला शहाणी बनविणारी विद्याशाखा म्हणजे इतिहास होय."("History is a discipline that makes men wise")** याचा अर्थ इतिहासाचे अध्ययन केल्यामुळे माणसाला शहाणपण प्राप्त होते.अवतीभोवती पूर्वी काय घडले होते त्याची माहिती मिळते.शहाणपण मिळविण्यासाठी इतिहासाचे अध्ययन आवश्यक आहे असाच त्याचा अर्थ आहे.

**हॅप्पोल्ड** च्या मते,"**इतिहास हा अनुभवाचा नंदादीप आहे."(History is the lamp of experience.)** भूतकाळातील अनुभवाच्या प्रकाशात भविष्याची वाटचाल करावी म्हणजे त्याला योग्य अशी दिशा मिळू शकेल असे हप्पोल्डला सुचवायचे होते.

तर **हेन्री जॉन्सन** यांच्या मते"**इतिहास म्हणजे जे घडले, जसे घडले, ते जसेच्या तसे सांगणे"**या व्याख्येचा अर्थ असा की भूतकाळात घडलेल्या सर्व घटना जशाच्या तशा मांडणे, सांगणे व त्याबद्दल माहिती देणे म्हणजे इतिहास होय. ज्या घटना मानवी मनावर, समूहावर, त्यांच्या वर्तनावर खोल असा ठसा उमटवितात अशा घटना म्हणजे इतिहास होय.

**प्रा.फिंडले** यांच्या मते"**इतिहास म्हणजे अनेक घटनांची सुसंगती लावून त्याचा परस्पर संबंध प्रस्थापित करणारी विद्याशाखा होय."(History is a sequence of events traced in their relations.)** प्रा. फिंडले यांची व्याख्या इतिहासात घटनांना वैशिष्ट्यपूर्ण स्थान देते असे दिसते. केवळ घटनांचा अभ्यास नसून त्या भूतकाळात घडलेल्या सर्व घटनांचा परस्पराशी संबंध प्रस्थापित करून यथार्थ माहिती देणारा विषय अथवा विद्याशाखा म्हणजे इतिहास होय. घटना आणि त्यांचा परस्परांशी संबंध सुसंगती ही महत्त्वाची आहे असे फिंडले सुचवितात.

**प्रा. मेटलँड :** यांच्या मते"**इतिहास म्हणजे मानवाने जे केले किंवा ज्याचा उच्चार केला व सगळ्यापेक्षा सुध्दा त्यांनी ज्याचा विचार केला त्याला इतिहास असे म्हणतात."(What men have done and said, above all what they have thought that is history.)**या व्याख्येत मेटलँड यांनी इतिहासामध्ये एक निश्चित प्रकारची वैचारिक प्रक्रिया आहे असे मांडले. म्हणजे मानव काही विचार मांडू शकतो, त्याच्या मनातील विचारांचे प्रतिबिंब आपल्याला इतिहासात दिसते. म्हणजे इतिहास केवळ घटना ज्या भूतकाळात होऊन गेल्यात त्याच सांगत नाही तर त्या घटनातून एक नवी वैचारिक प्रक्रिया देखील मांडू शकतो असे सांगितले.

**प्रा. रेनियर :"इतिहास म्हणजे समाजामध्ये राहणाऱ्या लोकांची हकीकत होय."(History is a story of men living in societies.)**या व्याख्येत इतिहासाचा वेगळा पैलू पहावयास मिळतो तो म्हणजे इतिहास हा प्रामुख्याने भूतकाळातील समाजाचा,

समाजातील माणसांचा त्यांच्या कृत्यांचा, त्यांच्या प्रगतीचा, सामुदायिक कार्याचा आढावा ज्यात घेतलेला आहे त्याचा इतिहास होय.प्रा. रेनियर यांची व्याख्या सामाजिक इतिहासाची कवाडे खोलणारी आहे म्हणून ती महत्त्वाची आहे.

**प्रा.लेकी :"इतिहास म्हणजे नैतिक कल्पनांचा संग्रह व स्पष्टीकरण होय."(History is the record and explanation of moral values.)** प्रा. लेकी यांची ही व्याख्या जास्त तत्वचिंतक वाटते. या व्याख्यामध्ये इतिहासाला तत्वज्ञानाचा मुलामा दिलेला दिसतो. अर्थात वेगळ्या अर्थाने इतिहासाच्या अभ्यासातून एक वेगळे तत्वज्ञान प्रतीत होत असते. पण केवळ नैतिक कल्पना म्हणजे इतिहास नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

**एडमंड बर्क :** १८ व्या शतकातील फार मोठे विचारवंत होऊन गेले. त्यांच्या दृष्टीने"**इतिहास म्हणजे दूरदर्शीपणाचा मार्गदर्शक होय; तत्वांचा मार्गदर्शक नव्हे. "(History is a preceptor of prudence and not of principles.)** ही व्याख्या इतिहासाची व्याप्ती मोठी आहे असे तर सांगतेच पण त्याबरोबर इतिहासात प्रामुख्याने सातत्याने घडणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक बदलांचा इतिहासाशी त्याचा संबंध असतो. हा घडत असणारा प्रवाही बदल कोणत्याही तत्वाच्या चौकटीत त्याला बसविता येत नाही. मात्र इतिहासात घडणाऱ्या घटनांमुळे व त्याच्या अध्ययनामुळे भावी काळात काय घडू शकेल याचा अंदाज व्यक्त करता येतो व मानवाला एक दूरदर्शीपणाची जाणीव होऊ शकते.असा या व्याख्येचा अर्थ आहे..

**जर्मन विचारवंत हर्डरच्या** मते,"**इतिहास म्हणजे घटनांची साखळी होय."(History is the chain of events.)** हर्डरच्या मते कोणतीही ऐतिहासिक घटना ही एकाकीपणे तपासून पाहता येत नाही तर त्या घटनेमागे घटनांची एक साखळी असते. उदाहरणार्थ पहिले महायुद्ध हे आर्चड्यूक फर्डिनांड या ऑस्ट्रियन राजपुत्राच्या खुनाने सुरू झाले असे नव्हे तर ते अनेक कारणांपैकी एक कारण आहे. हिटलरच्या पोलंडवरील आक्रमणाने ने दुसरे महायुद्ध सुरू झाले असे नव्हे तर ते अनेक कारणांपैकी एक कारण आहे.

**कार्लाईल** यांच्या मते**"इतिहास म्हणजे श्रेष्ठ व्यक्तीची चरित्रे व त्यांनी बजावलेली कामगिरी होय."(History is nothing but the biographies of great men.)** ही व्याख्या मर्यादित स्वरूपाची असली तरी ती पूर्णपणे अर्थहीन अथवा चुकीची आहे असे म्हणता येत नाही. कार्लाईलला असे म्हणावयाचे होते की, काही श्रेष्ठ व्यक्ती आपल्या कर्तृत्वाच्या, विचारांच्या सामर्थ्यावर संपूर्ण राष्ट्रांची, समाजाची दिशा बदलतात. एखाद्या थोर व्यक्तीचे चरित्र हे त्या देशाचा त्या काळातील इतिहास असतो. एखाद्या व्यक्तीची त्या काळातील घडामोडींवर एवढी छाप पडलेली असते की, त्या व्यक्तीचे चरित्र म्हणजेच त्या काळातील इतिहास असतो. वस्तुत : प्रत्येक ऐतिहासिक व्यक्ती तत्कालीन विशिष्ट सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक परिस्थितीचे फळ असते. त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व घडविण्यात त्यावेळची स्वीकृत मूल्ये व आदर्श यांचा फार मोठा वाटा असतो. कर्तबगार व्यक्ती ही त्या त्या काळातील इतिहासाच्या केंद्रस्थानी असते. कार्लाइल म्हणतो, "What History requires is geniuses and not masses."उदा. मराठ्यांच्या इतिहासातून शिवाजी महाराजांना वगळले तर मराठ्यांच्या इतिहासात काय उरते ? मौर्याच्या इतिहासातून चंद्रगुप्त मौर्य व अशोक यांना वजा केले तर काय उरते ? १७७९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीनंतरचा इतिहास हा नेपोलियन बोनापार्टच्या नावाभोवती केंद्रित झाला

होता. स्वतंत्रोत्तर भारताचा राजकीय इतिहास (१९६६-१९८४) हा पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींच्या नावाभोवती केंद्रित झालेला आहे. इटाली व जर्मनीच्या एकीकरणाचा इतिहास एकीकरणाच्या चळवळीतील प्रमुख नेत्यांच्या कार्यांशी एकरूप झाला आहे. स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास हा गांधीजींचे चरित्र व त्यांचे कार्य याभोवती केंद्रित झालेला आहे. थोर व्यक्तीच्या चरित्राशिवाय प्रत्येक देशाच्या इतिहासाचा अभ्यासच होणे कठीण आहे. या एकूण पार्श्वभूमीवर ७ आहे असे म्हणता येईल.

**प्रा. इल्टन :** यांच्या दृष्टीने**"इतिहास म्हणजे मानवी जीवनात भूतकाळात घडलेल्या सर्व घटना त्याच्यातून उदयास आलेले विचार, सुख, दुःख, भोग, चांगल्या /वाईट गोष्टी वर्तमान काळात देखील आपला ठसा उमटवून जातात व ज्याच्यामुळे पुढे मानवाची भौतिक प्रगती सामाजिक बदल याबद्दल आपल्याला काही अटकळ बांधता येते."**ही व्याख्या जास्त प्रमाणात इतिहासाबद्दल माहिती देते. इतिहासात मानवाच्या झालेल्या प्रगतीचा, विकासाचा विचार तर केला आहेच पण त्याचबरोबर मानवाला भोगावयास मिळालेले सुख दुःख, बऱ्या / वाईट गोष्टी यांचा देखील विचार असून वर्तमानात व भविष्यात घडलेल्या गोष्टींचा सखोल असा परिणाम घडलेला दिसतो. या व्याख्येने इतिहासाचा प्रवास हा भूतकाळ - वर्तमानकाळ - भविष्यकाळ या तिन्हीशी असून त्यांचे एकमेकांशी आंतरिक नाते आहे हे सिध्द केले आहे.

**सर चार्लस प्रिथ :"इतिहास म्हणजे गतकाळातील मानवी समाजाच्या बदलाचा आढावा आहे. यात त्या काळातील समाजात कसकसा बदल होत गेला, त्यावेळी समाजात कोणत्या निराळ्या संकल्पनांचा उदय झाला, त्यावेळची भौतिक परिस्थिती कशी होती आणि अनेक अडचणींवर मात करून मानवाने प्रगती कशी घडवून आणली त्याचा आढावा म्हणजे इतिहास होय."**या व्याख्याने मानवी समूह -मानवी समाज - समाजात कालपरत्वे झालेले उदय, तत्कालीन भौतिक परिस्थिती आणि मानवाला प्रगती घडवून आणत असतांना झालेला त्रास / अडचणी यावर त्याने केलेली मात या सर्व गोष्टी येतात. या व्याख्येचा साधा सरळ रोख मानवाच्या भौतिकप्रगतीचा आढावा व त्यातून उदयास आलेला नवा विचारप्रवाह म्हणजे इतिहास असा आहे. अनेक अर्थाने इतिहासाची योग्य मीमांसा त्यात आपल्याला आढळते.

**लॉर्ड ॲक्टन** :**"मानवाची मुक्तिगाथा म्हणजे इतिहास"**अशी अत्यंत सुटसुटीत व्याख्या केलेली आहे. ही व्याख्या मानवाने निसर्गाशी मैत्री करून आपले केलेले भले असा अर्थ त्याचा होतोच पण त्याचबरोबर मानवाने अनेक अडीअडचणींवर केलेली मात त्याचा आढावा म्हणजे इतिहास.असा देखील त्याचा अर्थ आहे.

**प्रा. ए.एल.रोस :"इतिहास म्हणजे भूगोल व प्राकृतिक स्थिती ह्यातून जडणघडण होत गेलेले मानवी जीवन व समाज जीवन यांचे आलेखन"**या व्याख्येचा अर्थ मानवी जीवनाच्या प्रगतीचा आढावा. जी प्रगती प्रामुख्याने त्या त्या प्रदेशाच्या भौगोलिक स्थितीवर अवलंबून आहे. म्हणजे भौगोलिक प्राकृतिक परिस्थिती ही इतिहासाला पूरक असते हे अगदी योग्य असेच आहे.

**प्रा. इ.एच.कार :** सुप्रसिध्द आधुनिक इतिहासकार म्हणून इ.एच.कार यांनी इतिहासाची व्याख्या करतांना**"इतिहास म्हणजे वर्तमानकाळ व भूतकाळ या मधील कधीही न संपणारा संवाद होय."असे म्हटले आहे. (History is an unending dialogue**



munotes.in

**between the past and the present.)** या व्याख्येत एक गोष्ट स्पष्ट होते की भूतकाळ आणि वर्तमानकाळ ही एकमेकाशी अगदी जोडले गेले आहेत. त्यांच्यातील संबंध हे कधीही संपणारे नाही. वर्तमानकाळात निर्माण झालेल्या समस्यांचे मूळ हे प्रायः भूतकाळात बघावयास मिळते. भूतकाळात घडलेली गोष्ट ही वर्तमान काळात वेगळ्या रूपात पुन्हा अनुभवता येते. या सर्व घटकांच्या मूळाशी मानवी वर्तन आहे.

इंग्रज व विद्वान **प्रोफेसर जॉन सीली** म्हणतो**, "इतिहास म्हणजे गतकाळातील राजकारण व वर्तमान काळातील राजकारण म्हणजे भावी इतिहास होय."(History is past politics and present politics is future history.)** प्रोफेसर सीलीच्या मते इतिहासाचा मुख्य उद्देश राजकारणातील मार्गदर्शक हाच आहे. प्रोफेसर सीलीच्या मते इतिहासामध्ये राजकारणाशिवाय दुसरे काहीही नाही. मात्र हा दृष्टिकोन फारच संकुचित वाटतो.

**प्रा.नेव्हिन्स :** या अमेरिकन इतिहासकाराच्या मते**"इतिहास म्हणजे भूतकाळाला वर्तमानकाळाशी जोडणारा पूल आहे व तो भविष्यकाळाचा मार्गदर्शक आहे." (History is actually a bridge connecting the past with the present and pointing the road to the future.)** नेव्हिस च्या मते,"इतिहास म्हणजे मानवाच्या हातातील कंदील आहे व तो मानवाच्या प्रत्येक पावलावर प्रकाश टाकत असतो आणि भूतकाळ व वर्तमानकाळ यांच्यातील अंधार भरून काढण्याचे काम करतो व या प्रकाशाच्या आधारावर मानवाला भविष्यकाळाची चाहूल घेता येते."या व्याख्येचा अर्थ असा निघतो की इतिहास हा भूतकाळ व वर्तमानकाळ या दोन्ही काळांशी संबंधित आहे. त्यामुळे दोन्ही काळात घडलेल्या घटनांमुळे मानवाला योग्य असे मार्गदर्शन सातत्याने पुढील भविष्यात मिळते. पूर्वी झालेल्या वर्तमानकाळात होत असलेल्या चुकांची पुनरावृत्ती भावीकाळात टाळता येते.

**कार्ल मार्क्स :** १ ९ व्या शतकातील क्रांतीकारी, श्रेष्ठ जर्मन तत्वज्ञ याने इतिहासाचा सखोल असा अभ्यास करून आपले क्रांतीकारी तत्वज्ञान जगासमोर मांडले व साम्यवादाचा उदय जगात झाला. त्याच्यामते**"इतिहास म्हणजे वर्गकलहाचा इतिहास होय"**कालानुसार वर्गाची नावे बदलतील कलहाचे स्वरूप मात्र कायम आहे. ते आहेरे आणि नाहीरे (Haves and Have nots) असाच तो संघर्ष कायम इतिहासात बघावयास मिळतो. इतिहासातील सातत्याने दिसणाऱ्या संघर्षाचा धागा कार्लमार्क्सने नेमका धरून हा संघर्ष श्रीमंत आणि गरीब, जमीनदार आणि भूदास, सरंजामदार आणि तळागाळातील सामान्यजन यांच्या संघर्षाचा इतिहास कार्ल मार्क्सला अभिप्रेत आहे. कार्लमार्क्सची इतिहासाची व्याख्या ही विशिष्ट आसाभोवतीच फिरते आहे. संघर्षाव्यतिरिक्त इतिहासात बाकी काही नाही असे म्हणणे योग्य ठरणार नाही. संघर्ष हाच केवळ इतिहासाचा पाया आहे असे म्हणणे आततायीपणाचे आहे. संघर्ष सर्व ठिकाणी आहे पण तो फारच मोलाचा आहे असे मानून त्याला अवाजवी महत्त्व देणे तेवढे बरोबर नाही.

**टॉइन्बी :** सुप्रसिध्द इंग्रज इतिहासकार अरनॉल्ड टॉइन्बी याने जगातील सर्व संस्कृत्यांचा अभ्यास करून इतिहासाची व्याख्या अशी केली आहे की**"मानवी संस्कृतीचा उदय व -हास म्हणजे इतिहास." (All history is nothing but the rise and fall of human civilization.)** इतिहास म्हणजे दुसरे काही नसून संस्कृतीचा उदय व त्यांचा

कालानुरूप होणारा -हास ह्याचा एक भला मोठा पट इतिहास निर्माण करते. म्हणजे इतिहासात संस्कृती असणे आवश्यक आहे. संस्कृतीच्या उदय व -हासाशिवाय इतर काहीही इतिहासात आढळत नाही. टॉइन्बी याने सारे आयुष्य संस्कृतीच्या अभ्यासासाठी व्यतीत केल्याने इतिहासाची व्याख्या म्हणजे संस्कृतीचा अभ्यास / शोध / निरीक्षण / प्रगती यांच्याशीच संबंधित असणार हे अगदी उघड आहे. टॉइन्बी याने मात्र संस्कृतीचा उदय - विकास - -हास यावर भर देऊन इतिहासाची व्याख्या जास्त समर्थक, विशाल अशी केली आहे. यात शंका नाही. तत्त्वज्ञान इत्यादी चे त्यांचे चिंतन होते.

**पंडित नेहरूंनी** इतिहासाची व्याख्या पुढील शब्दात केली आहे ते म्हणतात,"**मनुष्याने निरनिराळ्या युगात निसर्ग व पंचमहाभूते, वन्यपशू व अरण्य आणि शेवटी ज्या सजातियानी त्याला पददलित ठेवण्याचा व आपल्या स्वार्थासाठी त्याचे शोषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे, या सर्वांच्या विरुद्ध त्याने केलेल्या संघर्षाची कहाणी म्हणजे इतिहास होय."**

**वि. का. राजवाडे** यांनी इतिहासाची अत्यंत सोपी व्याख्या केली आहे. ते म्हणतात,"**समाजाच्या चरित्रातील गतगोष्टीची जी हकीगत तो इतिहास होय. इतिहास म्हणजे राष्ट्राचे सर्व तऱ्हेचे गतकालीन चरित्र होय."**

**डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन** यांच्या मते, **"History is the memory of the nation, History is the memory of the races."**

**धनंजय कीर** यांच्या मते,"**इतिहास हे मानवी समाजाचे एक अखंड, अभंग, नि अविभाज्य असे छायाचित्र होय."**

**सदाशिव आठवले,** इतिहासाचे तत्त्वज्ञान या ग्रंथात म्हणतात,"**इतिहासाचा दुसरा कोणताही अर्थ लागो न लागो इतिहास म्हणजे बदल, इतिहास म्हणजे स्थित्यंतर होय."**

**रियासतकार गो. स. सरदेसाई** यांनी"**इतिहास म्हणजे मानवी प्रगतीचा आढावा"**असे म्हटले आहे.

**धर्मानंद कोसंबी** यांच्या मते, **"इतिहास म्हणजे साधन व उत्पादन यांच्या संबंधातील एक अनुक्रमावर आधारित अशी घटना होय."**

वरील व्याख्या पाहिल्या असता आपल्या लक्षात येते की इतिहास म्हणजे इतिहासकाराच्या नजरेसमोर घटना येतात. या घटनांचा नुसता एक ढीग म्हणजे इतिहास नव्हे तर विविध घटनांमध्ये एक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. त्या घटनांचा अन्वयार्थ लावीत असता कोणत्या ना कोणत्या तत्त्वज्ञानाचा आधार घेतला जातो. इतिहासकार, इतिहासामध्ये मानवी समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण घटना, त्यामागील तत्त्व, विचार, व्यक्तीची वृत्ती यांचा विचार करतो. समाजाला समजेल, रुचेल, पचेल अशा शब्दांत आपले संशोधन मांडत असतो.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

प्र. १. इतिहासाच्या विविध व्याख्या लिहा.

--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------

## २.३ इतिहासाची व्याप्ती (Scope of History)

आतापर्यंत आपण इतिहास म्हणजे काय याची माहिती घेतली. आता आपल्याला इतिहासाची व्याप्ती पाहावयाची आहे. इतिहासाची व्याप्ती ठरवीत असताना पहिल्यांदाच एक समस्या निर्माण होते की, इतिहासाचा अभ्यास कोणत्या कारणासाठी महत्त्वाचा ठरतो. इतिहासाचा वर्ण्य विषय भूतकाळाशी संबंधित आहे. असा भूतकाळ संदर्भ साधनांमधूनच दिसून येतो. कागदपत्राशिवाय इतिहास लिहिता येत नाही. म्हणूनच **लॅंजिलास व सिनबॉस** म्हणतात, "No documents no History"' इतिहासाच्या टीकाकारांच्या मते, ' Dead - Past ' पेक्षा Living Present हे जास्त महत्त्वाचे आहे. परंतु आज जे सद्य : स्थितीत (Living Present) असते तेच काही काळाने मृतप्राय (Dead Past) होते. म्हणून कोणत्याही घटनेमध्ये असा कालानुक्रमे फरक करता येणार नाही. आपल्याला भेडसावणाऱ्या अनेक प्रसंगांचे मूळ गतकाळामध्ये असते. म्हणून गतकाळाच्या, माहितीशिवाय वर्तमानकाळातील त्या समस्येवरील उपाय आपल्याला शोधून काढणे शक्य नाही.

इतिहास या विषयाची व्याप्ती ही विविध कालानुरूप सातत्याने बदलती राहिली आहे. आधुनिक कालखंडात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, मानसशास्त्रीय अशा असंख्य सामाजिक शास्त्रांचा जन्म झाला. प्रत्येक सामाजिकशास्त्र आपली महत्वाची भूमिका आपआपल्या चौकटीप्रमाणे पार पाडत आहे आणि आपला विषय हा इतर विषयांप्रमाणेच महत्वाचा आहे असे सातत्याने सांगत आहे. इतिहास या विषयाच्या संदर्भात अशी गोष्ट घडली आहे की त्याची व्याप्ती फार मोठया प्रमाणात असून त्याचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. त्याची शिकवण सर्वच दृष्टीने जीवनाला उपयुक्त आहे. कारण मानवी जीवनात घडून गेलेल्या गोष्टी व त्याचे होणारे परिणाम हे फार मोठे आहेत. इतिहासाचे अध्ययनाने भविष्यकाळात निर्णय घेतांना नेहमीच उपयुक्त ठरले आहे हे आपल्याला नाकारता येणार नाही. **प्रा. इलटन** यांच्या दृष्टीने"सर्व काही इतिहासाचे उत्तम लिखाण हे एका अर्थाने जागतिक इतिहासाचाच भाग आहे. कारण एका छोट्या देशाच्या इतिहासाचा विचार करतांना जगाचा विचार टाळता येत नाही."इतिहासाची व्याप्ती वाढत जाण्याची खरी कारणे खालीलप्रमाणे आहेत.

(१) आज देखील अतिप्राचीन जुन्या संस्कृतीचा शोध लागत आहे. जुने अतिप्राचीन असे शिलालेख, भूर्जपत्रे, प्राचीन काळातील भांडी, विविध वस्तू उत्खननाद्वारे मिळत आहे. त्यामुळे प्राचीन कालखंडाच्या ज्ञानात / माहितीत भर पडत आहे. जुने सिद्धांत मागे पडून नवे सिद्धांत नव्याने मांडले जात आहे.

(२) नवीन भौगोलिक शोधांमुळे अतिप्राचीन संस्कृतीच्या शोधाबरोबरच नवी मानवाची वंशावळ नव्याने पुढे येत आहे. मानववंशशास्त्रात नव्या माहितीची भर पडून नवे सिद्धांत मांडले जात आहे ते इतिहासाच्या अध्ययनाला पूरक ठरत आहे.

(३) काळाच्या ओघात इतिहासाची व्याप्ती वाढली असून हकीकत सांगणे, ही हकीकत कशी घडली ते सांगणे शिवाय हकीकतीचे बौद्धिक दृष्ट्या विश्लेषण करणे व त्याच्यावर आधारित भविष्यकाळासाठी काही अनुमान तयार करणे, असे खरे आता इतिहासाचे स्वरूप बनत चालले आहे. म्हणून त्याची व्याप्ती वाढीस लागली आहे. या पूर्वी इतिहास हा केवळ राजकीय - राजघराण्यांचा राजाच्या कुटुंबापुरता मर्यादित होता. युद्ध, तह, विजय, पराजय यांच्याशी निगडित होता. आता तसे स्वरूप इतिहासाचे नव्या युगात राहिले नाही. माणसाच्या सर्व सामाजिक गोष्टींचा त्याच्या कृत्यांचा, चालीरीतीचा, परंपरांचा, भाषेचा, विचारांचा, वर्तनाचा विचार इतिहासात साकल्याने केला जात आहे. किंबहुना माणसाचे दैनंदिन जीवन हा भाग देखील इतिहासाचा विषय बनला आहे.

अगदी पूर्वी इतिहास हा विषय वाङमयाचा किंवा राजकारणाचा - राज्यशास्त्राचा एक भाग म्हणून त्याकडे पाहिले जात होते. आज इतिहास हा स्वायत्त विषय मानला जात आहे. त्यामध्ये मानवी समूहाचा अभ्यास, त्याचा कलाविकास, नैतिक कल्पना, धार्मिक कल्पना, विविध परंपरा यांचा झालेला विकास, व्यापार, अर्थशास्त्रीय व्यवहार, नाणी इ. चा देखील विचार आता इतिहासामध्ये केला जात आहे. इतिहासाची साधने गोळा करून त्याचा अन्वयार्थ लावून ऐतिहासिक घडामोडी मागे असणारी प्रेरणा स्पष्ट करणे ही इतिहासाची व्याप्ती बनलेली आहे.

अगदी अलिकडच्या काळात इतिहास या विषयांतर्गत सामाजिक बदल social change, आर्थिक घडामोडी Economic Activities, तळागाळातील जनसामान्यांचा इतिहास या विविध विषयांबरोबर तत्वज्ञान या विषयात होणारे बदल हा देखील अभ्यासाचा विषय बनला आहे. त्याचबरोबर कामगार चळवळ, वर्गकलह, शेती, उद्योगधंदे त्याचा विकास यासारखे विषय देखील आता इतिहासाच्या अध्ययनाचा भाग बनले आहेत.

**प्रो. गुस्टावसन (Gustavson)** आपल्या **' A Preface to History '** या ग्रंथात म्हणतात की, एखादा मनोवैज्ञानिकसुद्धा औषध सुचविण्यापूर्वी रुग्णाच्या गतकालाकडे जातो, ज्यावेळी त्याला रुग्णाची समस्या सोडवावयाची असते, तेव्हा त्याला निदान करण्यासाठी रुग्णाची व्यक्तिगत माहिती असणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व म्हणजे तिच्या अनुभवांची गोळाबेरीज, त्याचप्रमाणे एखादे राष्ट्र किंवा संस्था यांचे दृश्य स्वरूप त्यांच्या पार्श्वभूमीवर प्रकाश टाकते.

इतिहासाच्या अभ्यासाने माणसाची अनुभवकक्षा वाढते. अनेक घटनांतील परस्परसंबंध त्याला समजून येतात. **प्रो. एल्टन** (Alton) आपल्या **' The Practice of History '** या ग्रंथात म्हणतात,"इतिहासाच्या ज्ञानाने वर्तमानकाळाच्या अनुभूतीला भक्कमपणा येतो व



munotes.in

भविष्यकाळासाठी काही मार्गदर्शन होऊ शकते. ("Historical knowledge gives solidity to the understanding of the present and may suggest guiding lines for the future.")

इतिहासाच्या अभ्यासाने माणसाला आपला बुद्धिवादी दृष्टिकोण (Rational Attitude) व तर्कबुद्धी (Reasoning) वाढविता येते. **प्रो. आर्. जी. कॉलिंगवूड (R.G.Collingwood)"**यांनी **' Idea of History '** या ग्रंथात"इतिहासाला खूप महत्त्व आहे. त्याची शिकवण मानवी जीवनाला उपयुक्त आहे. कारण सध्याच्या मानवी जीवनातील गतगोष्टी व त्याचे होणारे परिणाम यामुळे त्यातील नाद हा पूर्वीप्रमाणेच बदलण्याची शक्यता आहे. महत्त्वपूर्ण घटना लक्षात ठेवल्याने भविष्यकाळात निर्णय घेण्याच्या दृष्टीने त्या उपयुक्त ठरतात. असे हे निर्णय दृश्य स्वरूपात दाखविता येत नाहीत. परंतु काय होऊ शकेल व सध्याच्या सुसंगत कालक्रमणेमध्ये कोणता धोका होऊ शकेल याचे दिग्दर्शन करता येईल. ("History has a value, its teachings are useful for human life ; simply because the rhythem of its change is likely to repeat itself, similar antecendents leading to similar consequents, the history of notable events is worth remembering in order to serve as a basis for prognostic judgements, not demonstrable but probable laying down not what will happen, but what is likely to happen, indicating the points of danger in rhythems now going on".)

**प्रो. लेकी (Lecky)** ने इतिहासाची व्याप्ती सांगताना म्हटले आहे की, "जी व्यक्ती गतकाळातील घटनांचे वैशिष्ट्य जाणण्यात निष्णात आहे, ती व्यक्ती स्वत : च्या समकालीन घटनांचे मूल्यमापन करण्यात फारशी चूक करणार नाही."("He who has learnt to understand the true character and tendency of many succeeding years is not likely to go very far wrong in estimating his own.")

**प्रो. बॉडीन (Bodin)** ने इतिहासाची व्याप्ती ठरवीत असताना तीन महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. ती पुढीलप्रमाणे :

१. ज्या शाश्वत तत्त्वावर मानवी स्वभावाची बैठक आधारित आहे त्या तत्त्वाची ओळख इतिहासामुळे आपल्याला होते. उदा. मानवी स्वभावातील राग, लोभ, मोह, क्रौर्य, हिंसा, महत्त्वाकांक्षा या गुणांची ओळख आपल्याला इतिहासामधून होते. मोगल इतिहासामध्ये जागोजागी क्रौर्य आपल्याला दिसते. उदा. मोगल राज्यकर्ते शिक्षेचा भाग म्हणून आपल्या विरोधकांची डोळे काढीत असत. आपल्या विरोधकांचा नायनाट करण्याची प्रवृत्ती मोगलांमध्ये किंबहुना अनेक राज्य कर्त्यांमध्ये आपणास दिसते.

२. ऐतिहासिक घटनांच्या अभ्यासावरून एका ठराविक मर्यादेपर्यंत भावी घटना वर्तविता येतात. या व्याप्तीचे स्वरूप असे की, प्रत्येक राष्ट्राची, समाजाची विशिष्ट जडणघडण असते. एकदा या जडणघडणीचा अभ्यास केला म्हणजे त्या समाजासंबंधी, राष्ट्रासंबंधी आपल्याला भवितव्यता काही प्रमाणात वर्तविता येईल. इतिहासाच्या अभ्यासाने ज्याप्रमाणे भवितव्यता वर्तविणे काही प्रमाणात शक्य आहे,

त्याचप्रमाणे वर्तमानकाळाचा अभ्यास करून आपल्याला ऐतिहासिक घटनांच्या आधारे भूतकाळाचे चित्र उभे करणे शक्य आहे.

३. मानवी इतिहासाच्या अभ्यासाद्वारे शाश्वत जीवनाची मूल्ये जाणता येतात. मानवी जीवनाची शाश्वत मूल्ये म्हणजे प्रेम, दया, शांती, माणुसकी, मानवतावाद इ. प्राचीन भारताच्या अभ्यासापासून या गुणांचा परिपोष झालेला आपल्याला दिसतो. आधुनिक जगामध्ये याच मूलभूत सत्याच्या मागे सर्व जग धावते आहे असे आपल्याला दिसते.

इतिहासाचे क्षेत्र दिवसेंदिवस व्यापक होत आहे. पूर्वी इतिहास फक्त राजे, राण्या, लढाया, तह याच्यापुरताच मर्यादित होता आता त्याची व्याप्ती खूप बदलली आहे. पूर्वी सामान्य माणसाला इतिहासामध्ये कोणतेही स्थान नव्हते आज तोच सामान्य मनुष्य इतिहासाचा 'कणा ' बनला आहे. तळागाळातील लोकांचा इतिहास (Subaltern History) हा इतिहासाचा महत्त्वाचा भाग बनला आहे. पूर्वी स्त्रियांसंबंधीचा दृष्टिकोण अतिशय संकुचित होता, आज स्त्रीवादी दृष्टिकोण (Feminist Attitude) हा इतिहासलेखनाचा, संशोधनाचा महत्त्वाचा विषय मानला जातो.

**प्रो. बी. शेख अली** यांनी इतिहासाच्या व्याप्तीचे वर्णन करीत असताना पुढील मुद्यांची चर्चा केली आहे.

(१) जे घडले त्याचे वर्णन करणे.

(२) जे घडले त्याचे मूल्यमापन करणे.

या दोन तत्त्वामध्येच वेगळ्या स्तरांवर आपल्याला इतिहासाची व्याप्ती स्पष्ट करता येईल. इतिहासांची व्याप्ती मानवी जीवनाशी निगडित असते. मानवी जीवन अनेक अंगांनी बहरत असते. त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक धार्मिक बाबींचा संबंध येत असतो. समाजजीवनातील रूढी, परंपरा मनोरंजनाचे विविध प्रकार या सर्वांचा समावेश इतिहासामध्ये होत असतो. इतिहास हा एक स्वयंभू विषय आहे, ही बाब विद्वानांनी मान्य केलेली आहे. त्यामुळे इतर कोणत्याही विषयाच्या अधिपत्याखाली न राहता विविध कला, नीतिमूल्ये सर्वांचा व्यापक अर्थाने इतिहासामध्ये समावेश होत असतो.

इतिहासाला दोन प्रकारची कार्ये करावी लागतात.

(१) संदर्भसाधने गोळा करणे व

(२) मिळालेल्या इतिहासाच्या साधनांचे मूल्यमापन करणे.

या दोन प्रक्रिया मूलभूत शास्त्रीय प्रक्रिया आहेत. त्यामुळे स्वाभाविकच इतर शास्त्राप्रमाणेच वस्तुनिष्ठता (Objectivity) व शास्त्रीय दृष्टिकोण (Scientific attitude) अवलंबावा लागतो. परंतु इतिहासाचा गाभा मानवी मनातील भावभावनाशी असतो. त्यामुळे शास्त्रामधील वस्तुनिष्ठता प्रत्यक्षात येऊ शकत नाही. ही इतिहासामधील उणीव आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. इतिहासाचा संबंध मानवी जीवनाशी असतो आणि मानवी जीवन परिपूर्ण करण्यासाठी साहित्याचा आधार घ्यावा लागतो. **सर जदुनाथ सरकार**

यांच्या मते, ' इतिहास आणि साहित्य ' यांना विभागणारी रेषा अतिशय पुसट आहे. या विधानाचा अर्थ असा की, इतिहासाची व्याप्ती ही साहित्याप्रमाणेच अतिशय व्यापक आहे.

**प्रो. जी. एम. ट्रिव्हलीन** यांनी इतिहासाची ' त्रिविध ' व्याप्ती सांगितलेली आहे. ती व्याप्ती अशी-

(१) शास्त्रीय (२) काल्पनिक व (३) साहित्यिक

या त्रिविध व्याप्तीचा विचार केला असता आपल्या असे लक्षात येते की, आधुनिक काळात शास्त्रीय दृष्टिकोणामुळे ज्या काही संशोधनाच्या विविध शाखा निर्माण झाल्या त्यांचा समावेश होतो यालाच आपण शास्त्रांचा इतिहास (History of Sciences) म्हणतो. उदा. मानवाने चंद्रावर ठेवलेले पाऊल किंवा भारतीय अंतरिक्ष महिला कल्पना चावला हिच्या बाबतीत घडलेली घटना किंवा मंगळ ग्रहाचे पृथ्वीजवळ येणे ही शास्त्रीय घटना ही सुद्धा इतिहासाची व्याप्ती आहे.

काल्पनिक बाबींचा विचार केला असता बऱ्याच वेळा घडलेल्या घटनांच्या आधारे वर्तमान किंवा भविष्यकाळामध्ये काय घडू शकेल यासंबंधी विचार करणे हीसुद्धा इतिहासाची व्याप्तीच आहे. उदा. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेतील World Centre वर झालेला दहशतवादी हल्ला यावरून कल्पनेच्या आधारावरून भावी काळात कोणत्या घटना घडू शकतील याचा अंदाज येऊ शकतो.

साहित्यामध्ये तर आपल्याला इतिहासाचे पदोपदी दर्शन होत असते. मग ती शेक्सपिअरची ऐतिहासिक नाटके असोत, वसंत कानेटकरांनी लिहिलेली ' विषवृक्षाच्या छायेत ' ' हिमालयाच्या सावलीत ' किंवा ' रायगडाला जेव्हा जाग येते ' अशी नाटके असोत. न्या. रानडे यांचे लेख असोत अथवा म. फुल्यांनी लिहिलेल्या ' शेतकऱ्यांचा आसूड ' यासारखे साहित्य असो.

थोडक्यात, इतिहासाची व्याप्ती ही मानवाच्या उत्क्रांतीशी संबंधित आहे. इतिहासामध्ये मानवाने विविध क्षेत्रांत केलेली प्रगती व तिचा आलेख येणे आवश्यक असते. इतिहासाच्या वाचनामध्ये व्यक्ती आपले प्रतिबिंब शोधण्याचा प्रयत्न करीत असते व अशा त-हेचे प्रतिबिंब ज्या वेळी इतिहासामध्ये दिसेल त्या वेळीच खऱ्या अर्थाने इतिहासलेखन झाले असे म्हणता येईल. अनादि कालापासून सामान्य माणूस परिस्थितीचे भक्ष्यच बनत गेला आहे. त्याचे हुबेहूब वर्णन इतिहासामध्ये आले पाहिजे.

इतिहासाच्या व्याप्तीमध्ये आर्थिक घडामोडी व समाजशास्त्रीय बदल यामुळे वाढ होत आहे. मार्क्सवादी तत्त्वज्ञानाने अंतर्विरोधाची (Dialects) कल्पना मांडली. व्यक्ती किंवा समाज यांची प्रगती होण्यासाठी अंतर्विरोधाची कल्पना मांडली. विरोध- विकास हे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे मानतात. सोशल डार्विनिझमची संकल्पना समाजाला लावण्यात येते. ही सुद्धा इतिहासाची व्याप्ती आहे. साम्यवादी देशामध्ये घडणाऱ्या घडामोडींकडे मार्क्सवादी तत्त्वज्ञानातून पाहिले जाते. अशा घडामोडींमध्ये कामगार चळवळ, वर्ग कलह, व्यापार, उद्योगधंदे, शेती इत्यादींचा समावेश असतो. एखाद्या लोकशाहीवादी देशात याच घटनांच्याकडे सामाजिक बदल अशा दृष्टिकोणातून पाहिले जाते. विविध राजकीय - सामाजिक संस्थांचा, संसदीय लोकशाहीचा विकास ही इतिहासाची व्याप्ती दर्शवितात. स्वाभाविकच इतिहासाची व्याप्ती वाढून अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र,

मानववंशशास्त्र, इतर भौतिकशास्त्रे यांच्याशी निगडित असणारा विषय म्हणून इतिहासाकडे पाहिले जाते. इतिहासाचे विविध प्रकार उदा. संसदीय पद्धतीचा इतिहास, लष्कराचा इतिहास, कायद्यांचा इतिहास या विषयाची व्याप्ती दाखवितात.

काळाच्या ओघात इतिहासाची व्याप्ती वाढली. इतिहासाला त्रिविध कामे करावी लागतात, ती पुढीलप्रमाणे :

१) हकिकत सांगणे.

२) ही हकिकत कशी घडली ते सांगणे व

३) हकिकतीचे विच्छेदन करणे.

परंतु अगदी अलीकडील काळात यापेक्षासुद्धा इतिहासाची व्याप्ती वाढली आहे. पूर्वी इतिहासाला खूप मर्यादा होत्या. त्यावेळी फक्त राजघराण्यांचा उदय व अस्त, राजांचे दरबार, युद्धे व तह यांचा विचार करणे म्हणजे इतिहास असा समज होता. आता मात्र इतिहासाकडे मानवतावादी दृष्टिकोणातून पाहिले जाते. माणसाच्या सर्व सामाजिक हालचालींचा उदा. विविध खेळ, चालीरीती, परंपरा या सर्वांचाच विचार केला जातो. इतकेच नव्हे तर सामान्य माणसाचे दैनंदिन जीवन हा सुद्धा इतिहासाचा विषय बनलेला आहे.

पूर्वी इतिहास ही वाङ्मयाची किंवा तत्त्वज्ञानाची किंवा राज्यशास्त्राची एक शाखा म्हणून तिच्याकडे पाहत असत. परंतु आज इतिहास हा एक स्वायत्त विषय मानला गेला आहे. इतिहासाला जो स्वायत्त दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे मानव किंवा मानवी समूह यांचा अभ्यास करीत असताना त्याबद्दल विविध प्रकारचे ज्ञान त्यांच्यातील कलाविकास, नैतिक अधिष्ठान, परंपरा आणि त्याची झालेली सर्वांगीण प्रगती हा इतिहासाचा वर्ण्य विषय बनलेला आहे. इतिहास नुसताच एखादी घटना जगाला सांगत नाही तर साधन साहित्य जमविणे व त्याचा अन्वयार्थ लावून ऐतिहासिक घडामोडीमागे असणारी प्रेरणा स्पष्ट करणे ही इतिहासाची व्याप्ती बनलेली आहे. इतिहास हा विषय शास्त्र आहे असे मानले जाते. परंतु ज्यावेळी संदर्भ साहित्य गोळा केले जाते तेव्हा ते गोळा करण्यामागे वस्तुनिष्ठता ही शास्त्रीय संकल्पना असते. परंतु ज्यावेळी घटनांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रसंग येतो तेव्हा बऱ्याचवेळा व्यक्तिनिष्ठता येण्याची शक्यता असते.

इतिहास हा निसर्गाचा अभ्यास करीत नाही तर त्या निसर्गात राहणाऱ्या मानवाची प्रगती कसकशी झाली याचा तो विचार करतो. इतिहासामध्ये एखाद्या योद्ध्याच्या संदर्भात नद्या, पर्वत, सागर, डोंगर यांचा विचार केला जातो. उदा. प्लासीच्या रणांगणाचा विचार रॉबर्ट क्लाईव्हच्या संदर्भात, पानिपतच्या रणांगणाचा विचार भाऊसाहेब आणि अब्दाली यांच्या संदर्भात, तर वॉटर्लूचा विचार नेपोलियनच्या संदर्भात केला जातो. याचा अर्थ असा की, मानवाच्या जडण - घडणीमध्ये निसर्गाचा जेवढा संबंध असेल तेवढ्या संदर्भातच निसर्गाचा विचार केला जातो. इतिहासकाराने इतिहासाची व्याप्ती ठरवीत असताना नुसतेच प्रशासन, कायदा किंवा धर्म यांचा विचार न करता त्यांच्या पलीकडे परंतु मानवी समाजामध्ये ज्या घटना घडत असतात त्यांचा विचार केला पाहिजे. इतिहासामध्ये शास्त्रीय प्रगती, तंत्रज्ञानविषयक प्रगती, भौगोलिक शोध या सर्वांचा मानवावर कोणता परिणाम झाला या संदर्भात अभ्यास केला पाहिजे. इतिहासामध्ये सामान्य व्यक्ती ही सर्वांत महत्त्वाची मानली

जाते. कारण अशी व्यक्ती एखादे राज्यशासन निर्माण करू शकते किंवा अन्यायकारक राज्यशासनाचा शेवट करू शकते.

इतिहासाच्या बदलत्या व्याप्तीसाठी इतिहास लेखनशास्त्र देखील तेवढेच जबाबदार मानले पाहिजे. कारण १९ व्या शतकापर्यंत इतिहासाचे अध्ययन हे केवळ राजकीय घटना, प्रसंग यांच्याशी निगडित होते. पण सध्या इतिहासाचा विचार करतांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, नैतिक, साहित्यविषयक, गोष्टींचा आपण विचार करतो कारण इतिहासात आपण मानवाच्या प्रगतीचा विचार करतो. तेव्हा वरील विषयांचा विचार करणे केवळ अपरिहार्य ठरते. इतिहास हा विषय रूक्ष न बनता सतेज, आकर्षक बनण्यासाठी साहित्याचा आधारदेखील नेहमी घेतला जातो. इतिहासलेखन शास्त्राने वर नमूद केलेल्या विषयांचा आधार घेऊन साधने गोळा करणे व त्यातून भूतकाळातील घडलेल्या घटनांचा, गोष्टींचा वेध घेण्याचे काम सुरू ठेवले आहे.

इतिहासाची वाटचाल वस्तुनिष्ठ अनुभववादापासून (Empirism) इतिहासावादापर्यंत (Historicism) झाली आहे. वस्तुनिष्ठ अनुभववाद म्हणजे ऐतिहासिक घटितांची (Historical facts) निश्चिती करण्याची प्रक्रिया होय, तर इतिहासवाद म्हणजे घटितांची सुरुवात, उगम कसा झाला ते सांगून त्या घटितांचा विकास कसा झाला हे सांगण्याची प्रक्रिया होय. या दोन्ही संकल्पना इतिहासाची व्याप्ती वेगळ्या प्रकारे सिद्ध करतात. इतिहासांच्या व्यापक स्वरूपावर **सिग्मंड फ्रॉईड व अल्बर्ट आईनस्टाईन** यांच्या विचारसरणीचा प्रभाव दिसून येतो. यामधूनच अमेरिकेने ऐतिहासिक सापेक्षतावाद (Historical relativism) ही संकल्पना रूढ केली.

**आपली प्रगती तपासा :**

प्र.१. इतिहासाची व्याप्ती विशद करा.

--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------

## २.४ सारांश :

एतिहासिक घटनांचा नुसता एक ढीग म्हणजे इतिहास नव्हे तर विविध घटनांमध्ये एक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. या घटनांचा अन्वयार्थ लावीत असता कोणत्या ना कोणत्या तत्त्वज्ञानाचा आधार घेतला जातो. इतिहासकार, इतिहासामध्ये मानवी समाजाच्या वैशिष्ट्यपूर्ण घटना, त्या मागील तत्त्व, विचार, व्यक्तीची वृत्ती यांचा विचार करतो. समाजाला समजेल, रुचेल, पचेल अशा शब्दांत आपले संशोधन मांडत असतो. इतिहासाला नुसती घटना नोंदवून चालत नाही तर ती हकीगत कशी घडली त्याचा अन्वयार्थ लावून ऐतिहासीक घडामोडी मागची प्रेरणा स्पष्ट करावी लागते. त्यामुळे इतिहासाची व्याप्ती वाढत जाते.

## २.५ प्रश्न :

१. इतिहासाचा अर्थ व व्याख्या स्पष्टीकरणासह लिहा.

२. इतिहासाची व्याप्ती विशद करा.

३. इतिहासाच्या विविध व्याख्या सांगा. त्यापैकी कोणती व्याख्या ही अधिक बरोबर आहे असे तुम्हास वाटते? का?

## २.६ अतिरिक्त वाचन :


१. ई. एच. कार, अनुवादक - प्रा.वि.गो. लेले, इतिहास म्हणजे काय ? कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

२. गार्डन चाईल्ड, अनुवादक - डॉ. बलराज शर्मा, इतिहास का इतिहास, हरियाणा साहित्य अकादमी, चंदीगढ, १९८८.

३. डॉ. गोविंदचंद्र पांडे, इतिहास : स्वरूप एवं सिद्धांत, राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपूर, १९९ ८.

४. डी. डी. कोसांबी, पुराणकथा व वास्तवता.

५. द. वि. केतकर, इतिहासातील अंत : प्रवाह.

६. ग. ह. खरे, साधना चिकित्सा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७६.

७. वि. द. घाटे, इतिहासशास्त्र आणि कला, देशमुख प्रकाशन, पुणे.

८. प्रभाकर देव, इतिहास : एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड.

९. सदाशिव आठवले, इतिहासाचे तत्त्वज्ञान, प्राज्ञ पाठशाला मंडळ, वाई, १९६७.

१०. डॉ. शांता कोठेकर, इतिहास : तंत्र आणि विज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.

११. सुहास राजदरेकर, इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८.

१२. डॉ. बी. एन. सरदेसाई, इतिहासलेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.

१३. गायकवाड, डॉ. सरदेसाई हनमाने, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१.

१४. डॉ. एस. एस. गाठाळ, इतिहासाचे तत्वज्ञान, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००५


❇❇❇❇❇❇❇

munotes.in

# ३

## इतिहास आणि सहाय्यकारी शास्त्रे
## (History and Auxiliary Sciences)

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ इतिहासाची सहाय्यकारी शास्त्रे (Auxiliary Sciences of History)

३.३ सारांश

३.४ प्रश्न

३.५ अतिरिक्त वाचन

## ३.० उद्दिष्टे :

हे युनिट पूर्ण झाल्यावर विद्यार्थी पुढील बाबतीत सक्षम होऊ शकेल:

१. इतिहास आणि नैसर्गिक विज्ञानांमधील संबंध समजणे .

२. इतिहास आणि सहाय्यकारी शास्त्रांमधील संबंध समजणे.

३. इतिहास आणि सामाजिक शास्त्र यांच्यातील संबंधांचे आकलन होणे.

## ३.१ प्रस्तावना :

एकोणिसाव्या शतकामध्ये इतिहासलेखन प्रक्रियेसंबंधी अनेक विचार नव्याने मांडण्यात येऊ लागले. इतिहास लिहीत असताना त्याला शास्त्रीय दर्जा प्राप्त व्हावा यासाठी अनेक प्रयत्न जाणीवपूर्वक होऊ लागले. अशा प्रयत्नामधूनच एक समस्या अशी निर्माण झाली की, इतिहास हे एक शास्त्र आहे की कला ? यामधूनच ज्या गटाला इतिहास हा वाङ्मयाचाच एक भाग आहे असे वाटत असे त्यांनी History is an Art या दृष्टिकोणातूनच लिखाण केले. अशा लिखाणामध्ये बुद्धिवादापेक्षासुद्धा बऱ्याचवेळा प्रतिभेकडे लक्ष देण्यात आले. परंतु दुसरा गट जास्त प्रभावी ठरल्याने History is a Science या दृष्टिकोणातूनच त्याच्याकडे पाहिले जाऊ लागले. विसाव्या शतकापूर्वी इतिहास लेखन करीत असताना इतर काही शास्त्राची इतिहासाला काही मदत होऊ शकते अशी कल्पनाच नव्हती. १९०३ मध्ये History is a Science, no more and no less. असे म्हटल्यामुळे इतिहास लेखनात अनेक शास्त्रांचा संबंध येतो याची पहिल्यांदा कल्पना आली. **प्रो. ॲलन नेव्हिन्स** म्हणतात, "इतिहासामधील दोन मूलभूत घटक म्हणजे विश्वसनीय साधनसामग्री व त्यांच्या वापरासाठी असलेली टीकात्मक पद्धती होय. इतिहासासाचा जन्म जोपर्यंत हे दोन्ही घटक एकत्र आले नाहीत तोपर्यंत होऊ शकला नाही."("The two basic elements in History are a body of more or less trustworthy materials, and a critical method applied to them. History was not born - it could not be born - until both these elements came into existance.")

इतिहास लेखन प्रक्रियेमध्ये जी अनेक शास्त्रे येतात, त्यांना Auxiliary Sciences किंवा Anciliary Disciplines असे म्हणतात. **प्रो. लॅंजीलॉस आणि सेनबॉस** आपल्या '

Introduction to the Study of History ' या ग्रंथात म्हणतात, "या बाबतीत एखादा विद्वान गृहस्थ किंवा इतिहासकार यांचे कार्य इतर शास्त्रांप्रमाणेच आहे. तांत्रिक ज्ञानाची माहिती असल्याशिवाय किंवा निश्चित स्वरूपाची साधनसामग्री असल्याशिवाय ही गोष्ट साध्य होणार नाही. मग असे आहे तर विद्वान गृहस्थांची किंवा संशोधकाची उमेदवारी कोणत्या गोष्टीमध्ये समाविष्ट असते ? किंवा जर अप्रस्तुत भाषा वापरली तरीसुद्धा या ज्ञानाच्या जोडीला इतर शास्त्रांचा जो साठा वापरला जातो त्याला इतिहासाची साहाय्यकारी शास्त्रे असे म्हणतात."(The profession of a scholar of a historian is, moreover, similar in this respera to all other professions, it is impossible to follow it without possessing a certain equipment of technical notions, whose absence neither natural aptitude nor even method can make good. In what, then, does the technical apprenticeship of the scholar or the historian consist ? or to employ language which though inappropriate, as we shall endeavour to show is in more common use : what is addition to the knowledge of repertories, are the"Auxiliary Sciences"of history.)

**प्रो. डावनू (Daunou)** म्हणतो, जर इतिहासकाराला आपल्या लेखनकार्यात काही यशाची अपेक्षा करावयाची असेल तर अशा इतिहासकाराने कोणत्या प्रकारच्या ज्ञानाचे परिशीलन केले पाहिजे, तसेच कोणत्या प्रकारचे ज्ञान त्याने मिळवले पाहिजे ?"("What studies wil the intending historian need to have gone through, what kinds of knowledge ought he to have acquired, in order to began writing work with any hope of success ?") इ. स. १८२० साली **प्रो. डावनूने** इतिहास संशोधकांच्या दृष्टीने तीन वर्ग कल्पिलेले आहेत. त्यात वाङ्मयीन (Literary), तत्त्वज्ञानविषयक (Philosophical) व इतिहासविषयक (Historical) असे भाग आहेत. तो म्हणतो, "इतिहास संशोधकाने पुष्कळ वाङ्मय वाचून एक निश्चित स्वरूपाची भाषाशैली कमावली पाहिजे. अशा वाङ्मयामध्ये महाकाव्याचा अवश्य समावेश असला पाहिजे तसेच त्याच्या काळातील श्रेष्ठ कादंबऱ्या वाचल्या पाहिजेत. या दोन वाङ्मय प्रकारांमुळे त्याला शैलीदार पद्धतीने इतिहास कसा लिहावा हे समजेल. इतिहास संशोधकाला तत्त्वज्ञानातील अनेक सिद्धांत माहीत असणे आवश्यक आहे, इतकेच नव्हे तर त्याला प्राचीन व आधुनिक नीतिशास्त्रज्ञ, आर्थिक, राजकीय सिद्धांत (Treaties on Political Economy) मॅकियाव्हॅली, बॉडीन, मॉन्टेस्क्यू, लॉक व रुसो हे माहीत असणे आवश्यक आहे"व शेवटी तो विनोदाने म्हणतो, "इतिहास संशोधकाला इतिहाससुद्धा माहीत असणे आवश्यक आहे."(It is evidently necessary to know history.) इतिहासकाराने अनेक घटना समग्रपणे लक्षात ठेवून त्यांच्यामध्ये तपशिलाची सुसंगती साधली पाहिजे. इतिहासाच्या जोडीला त्याला अनेक भाषा अवगत असण्याची आवश्यकता आहे.

**प्रो. मॅब्ले (Mably)** म्हणतो, "असे काही साहाय्यकारी विषय आहेत की, जे इतिहासकाराला टाळता येणे शक्य नाही. (' There are preparatory studies with which no historian can dispense.") **प्रो. मॅब्लेच्या** मते, इतिहासकाराने सुरुवातीला निसर्गनियम, सामान्यनियम, राज्यशास्त्रातील नियम, राज्यशास्त्र व नीतिशास्त्र यांचा अभ्यास केला पाहिजे.

**प्रो. फ्रीमन (Freeman)** आपल्या ' The Method of Historical Study ' या ग्रंथात म्हणतात की, "इतिहासकाराला तत्त्वज्ञान, कायदा, अर्थशास्त्र, मानवी वंशाचे शास्त्रीय वर्णन, भूगोल, मानववंशशास्त्र, नैसर्गिक शास्त्रे माहीत असणे आवश्यक आहे.("The historian ought to know everything - philosophy, law, finance, ethnography, geography, anthropology, natural science and what not.")

असे जरी असले तरी मानवी ज्ञानाच्या सर्वच शाखा सारख्याच उपयोगाच्या असतात असे नव्हे. तर त्यांपैकी काही शास्त्रे ही इतिहासाला जास्त पूरक असतात, तर काही शास्त्रे इतिहासाला इतकी जवळची असतात की, त्यांच्या मदतीशिवाय इतिहास लेखन शाक्यच होत नाही. उदा. भू-गर्भशास्त्राच्या माहितीशिवाय उत्खननही शक्य नाही व इतिहास लेखनही शक्य नाही. म्हणून इतिहासकाराला भू - गर्भशास्त्र माहीत असणे आवश्यक आहे. आता आपण साहाय्यकारी शास्त्रांचा थोडक्यात परिचय करून घेऊ.

## ३.२ इतिहासाची साहाय्यकारी शास्त्रे (Auxiliary Sciences of History)

१. **कालक्रम (Chronology) :**

इतिहास संशोधकाला सुरुवातीला जर कोणत्या गोष्टीची माहिती आवश्यक असेल तर ती म्हणजे कालचक्राची होय. इतिहास लिहीत असताना घटकांची सुसंगती लावून एकामागोमाग एक घटना जर दिल्या नाहीत तर त्या लिखाणाला कादंबरीचे स्वरूप प्राप्त होते. कालचक्राचे महत्त्व सांगताना सुप्रसिद्ध भारतीय इतिहास संशोधक **नीळकंठशास्त्री** म्हणतात, "Chronology is the eye of history."आता प्रश्न निर्माण होतो तो असा की, कालक्रम ही कल्पना कशामुळे अस्तित्वात आली ? पूर्वी धार्मिक कृत्ये व शेतीची कामे यांचे वार तिथी ठरविण्यासाठी अनेक घटनांची नोंद ठेवावी लागत असे. त्यामुळे एकापाठोपाठ एक घटना नमूद करण्याची पद्धती सुरू झाली व ही पद्धती इतिहास लेखनासाठी अतिशय आवश्यक आहे. कालक्रम नसेल तर त्या घटनांना काही अर्थच राहणार नाही. उदा. सातवाहन राजा हाल याने ' गाथासप्तशती ' हा प्राकृत ग्रंथ लिहिला असे मानले जाते. अर्थात, कालक्रमाचा कोठेही उल्लेख नसल्यामुळे ' हा हाल कोणता ? यापासून ते हा ग्रंथ हालनेच लिहिला काय ? ' इथपर्यंत अनेक मतभेद निर्माण होतात.

२. **हस्ताक्षराचे शास्त्र (Paleography) :**

पॅलिओग्रॅफी म्हणजे जुन्या हस्ताक्षरांचा अभ्यास करणारे शास्त्र होय. या शास्त्रामध्ये अक्षरे कसकशी विकसित होत गेली याचा अभ्यास केला जातो. प्रत्येक शब्द किंवा अक्षर हे प्रत्येक व्यक्तीच्या हस्ताक्षरामध्ये कालांतराने बदलत जाते. या शास्त्रामध्ये स्थल व काल यामध्ये प्रत्येक शब्दाचा कसा विकास झाला याचा अभ्यास केला जातो. हस्ताक्षरतज्ज्ञ (Paleographer) ही जुनी कागदपत्रे व शिलालेख नुसतेच वाचतो असे नव्हे तर प्रत्येक अक्षराचा विकास कसा झाला याची माहिती देतो. शिक्षणक्रमामध्ये प्रत्येक अक्षर ठरावीक कालखंडामध्ये बदलत असते. उदा. पूर्वी काही, यापैकी दोन्ही अक्षरांवर अनुस्वार देत असत तर हल्ली दोन्ही अनुस्वार काढून टाकलेले आहेत. ज्याप्रमाणे एखादी भाषा एकाच जमातीचे लोक अनेक प्रकारांनी लिहितात तसेच एखादी भाषा अनेक जमातींतील लोक अनेक प्रकारांनी

लिहितात, तेव्हा हस्ताक्षर तज्ज्ञाला नुसते अक्षर पाहूनसुद्धा तो शब्द कोणी लिहिला असेल याची कल्पना येऊ शकते. हस्ताक्षर तज्ज्ञ हा अनेक संक्षिप्त रूपांचा (Abbreviation) अभ्यास करीत असतो. हस्ताक्षर शास्त्राच्या अभ्यासाने संशोधकाची बुद्धी जास्त तीक्ष्ण बनते. तसेच अनेक गूढ प्रश्न सुटतात, उदा. तंजावर येथील बृहदीश्वर मंदिराच्या शिलालेखावरून मराठ्यांची अधिक माहिती समजते. सिंधू संस्कृतीमधील लिपी वाचण्याचे प्रयत्न अजूनही चालू आहेत. ज्या वेळेला त्यामध्ये यश येईल त्या वेळी सिंधू संस्कृतीविषयी अधिक माहिती उजेडात येईल.

**३. आलेखशास्त्र (Graphology) :**

या शास्त्रानुसार व्यक्तींच्या हस्ताक्षरावरून तिचा स्वभावधर्म समजू शकतो. एखाद्या व्यक्तीच्या अनेक पत्रांचा संग्रह तपासला असता त्या व्यक्तीचा स्वभाव निश्चित समजू शकतो. उदा. एखाद्या व्यक्तीचे हस्ताक्षर शब्दाच्या शेवटी जर वर वर जाणारे असेल तर ती व्यक्ती महत्त्वाकांक्षी असते असा निष्कर्ष निघतो.. अर्थात, निष्कर्ष ढोबळ मानाने काढलेले असतात. म्हणून वापरलेला कागद, त्या व्यक्तीचे वय, त्याचे लिंग व मनोवृत्ती यांचा अभ्यास केला पाहिजे. काहीवेळा हेतुपूर्वक दिशाभूल करण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या प्रकारची अक्षरे काढली जातात. बऱ्याचवेळा कामात अतिशय व्यग्र असणाऱ्या माणसाचे हस्ताक्षर अतिशय खराब असते. उदा. पत्रकार व डॉक्टर. एकंदरीत या शास्त्राच्या अभ्यासावरून एवढे निश्चित समजू शकेल की, तो मनुष्य सावधान चित्ताने लिहीत होता की घाईने लिहीत होता.

**४. अधिकृत कागदपत्रांचा अभ्यास करणारे शास्त्र (Diplomatics) :**

अधिकृत कागदपत्रे ही राष्ट्राराष्ट्रांमधील पत्रव्यवहारात समाविष्ट होतात. अधिकृत कागदपत्रांचा अभ्यास करणारी ही एक स्वतंत्र शाखा आहे. Diplomatics हा शब्द Diploma या शब्दावरून आला आहे. Diploma या शब्दाचा अर्थ एका कागदाचे केलेले दोन भाग असा आहे. या शब्दापासून Diplomacy या शब्दाचा उदय झाला. Diplomatics या प्रकारामध्ये कोणी कोणाला पत्र लिहावे त्याचा मायना ठरलेला असतो. त्यावरून त्या पत्रलेखकाचा व पत्र स्वीकारणाऱ्याचा दर्जा समजतो.

अधिकृत कागदपत्रांमध्येसुद्धा मायने कालानुरूप बदलत असतात. उदा. पेशवे दप्तरात अनेक पत्रांची सुरुवात ' स्वामी ', ' गोसावी ' अशा शब्दाने होते. अलीकडील काळात हे शब्दप्रयोग हास्यास्पद वाटतात. Diplomatics हे अशा बदलांचा अभ्यास करते. Paleography व Diplomatics या दोन्हीही शास्त्रांचे निष्कर्ष जर बरोबर ठरले तर संशोधकाचे काम सुलभ होते.

**५. मुद्रांचा अभ्यास करणारे शास्त्र (Sigillography) :**

Sigillography या शब्दाचा उगम Sigil म्हणजे Seal किंवा मुद्रा किंवा Signature म्हणजे स्वाक्षरी यापासून झाला. यालाच Sphiragistic (स्फिरागिस्टिक) असेही म्हणतात. या शास्त्रामध्ये अनेक अधिकारी, राजे - महाराजे यांच्या मुद्रांचा अभ्यास केला जातो. ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये अनेक लोकांच्या अनेक मुद्रा उठवलेल्या असतात. त्यावरून त्या व्यक्तीचा उद्देश समजतो. उदा. शिवाजीमहाराजांची राजमुद्रा -

*प्रतिपश्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।*

*शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।*

अशा मुद्रामधून जो आशय असतो तो अनेक संशोधकांच्या अनेक वर्षे संशोधनाचा विषय बनतो. राजमुद्रांचा वापर करीत असताना संबंधित ठिकाणच्या हवामानानुसार ' मेण ' किंवा ' शिसे ' यांचा वापर केला जातो. मुद्रेवरून जसे धोरण समजते तसेच त्याचा दृष्टिकोणही समजतो, बऱ्याच वेळा राज्याची आर्थिक परिस्थिती समजते. मुसलमानी आमदानीत प्रत्येक कागदपत्रावर मुद्रा उठवत असत. त्यामुळे कागदपत्रांची सुसंगती लावणे शक्य होते. तसेच, त्या राज्याचा सांस्कृतिक दर्जासुद्धा स्पष्ट होतो

**६. भाषाशास्त्र (Philology) :**

भाषाशास्त्र अनेक भाषांचा तौलनिक अभ्यास करणारे शास्त्र आहे. इतिहासाचा निकटचा संबंध कागदपत्रांशी असतो. इतिहास लिहिण्यासाठी अनेक कागदपत्रांचा वापर केला जातो. ही सर्वच कागदपत्रे एकाच व्यक्तीची किंवा एकाच भाषेतील असणे शक्य नाही. म्हणून संशोधकांना अनके भाषा अवगत असणे आवश्यक आहे. तसेच त्या भाषांतील त्या काळातील शब्दप्रयोग माहीत असणे आवश्यक आहे. **प्रो. रेनियर** म्हणतात की, "इतिहास संशोधनाच्या पद्धती भाषाशास्त्रज्ञांनीच शोधून काढल्या आहेत."इतिहास लिहीत असताना अनेक नावे, गावे इत्यादींच्या बाबतीत गुंतागुंत होत असते. अशावेळी जर भाषेचे सखोल ज्ञान असेल तर हा गोंधळ होणार नाही. अनेक भाषा बोलणारे लोक एकमेकांच्या सहवासात आल्यानंतर त्यांचा एकमेकांवर परिणाम होत असतो. उदा. इंग्लिश भाषेवर फ्रेंच भाषेचा फार प्रभाव पडलेला आहे. Parliament हा शब्द फ्रेंच भाषेतून इंग्रजी भाषेत आलेला आहे तसेच अनेक इंग्रजी शब्दांचे मूळ संस्कृत भाषेमध्येसुद्धा आहे. Mother हा शब्द ' मातृ ' या शब्दापासून तयार झाला आहे. Father हा शब्द"पितृ ' या शब्दापासून तयार झालेला आहे.

**७. नाणकशास्त्र (Numismatics) :**

नाणकशास्त्र हा स्वतंत्र विषय आहे. ज्याप्रमाणे इतिहास लेखनास कागदपत्राची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे नाण्याचीसुद्धा आवश्यकता असते. नाणी सोने, चांदी वा मिश्र धातूंची असतात. नाण्याच्या साहाय्याने एखाद्या देशाचा इतिहास लिहिणे शक्य होते. नाण्यामुळे राजांची नावे, त्यांचा कालखंड व त्यांनी कोणत्या प्रदेशावर राज्य केले याची माहिती मिळू शकते. नाण्यांमधून जी माहिती मिळते ती इतर साधनाद्वारे पडताळून पाहता येते. नाण्यांच्या साहाय्याने राजांचा व घटनांचा क्रम ठरविणे सोयीचे होते. एखाद्या राजाची जर अनेक नाणी उपलब्ध असतील तर त्यांच्या आधारे राजाचा राज्याभिषेक तसेच त्याचा मृत्यू केव्हा झाला हे ठरविणे सोयीचे होते. भारतामध्ये जी रोमन नाणी उपलब्ध झालेली आहेत त्यावरून भारत व रोम यांचा व्यापार फार प्राचीन काळापासून चालू होता असे अनुमान सहज काढता येते. नाण्यावर जर एखाद्या राजाचे चित्र असेल तर त्यावरून आपणाला त्या राजाच्या पोशाखाबद्दल काही कल्पना येऊ शकेल. नाण्याच्या आधारे राज्याच्या करमणुकीच्या साधनाबद्दलसुद्धा पुसटशी कल्पना येऊ शकते. काही नाण्यांच्या अभ्यासाने तत्कालीन शासनपद्धतीची कल्पना येते. राजाचे वैभव देशाची आर्थिक स्थिती यावरसुद्धा नाण्यांच्याद्वारे प्रकाश पडतो. नाण्यांच्या निरीक्षणामुळे भिन्न काळातील धार्मिक व सामाजिक परिस्थितीचेही थोडेसे ज्ञान मिळू शकते. ग्रीक

munotes.in

आक्रमणानंतर भारतीय राजे आपले नाव नाण्यावर कोरू लागले. नाण्यामुळे भिन्न काळातील कला विकास कळून येतो. काही नाणी साधी आहेत तर काही कलात्मक व सुंदर आहेत.

### ८. पुरातत्त्वविद्या (Archeaology) :

पुरातत्त्व संशोधन इतिहासाच्या संशोधनास उपयुक्त ठरते. हे काळाच्या कसोटीवर सिद्ध झालेले आहे. पुरातत्त्व हा शब्द भारतामध्ये अलीकडे रूढ झालेला आहे. एकेकाळी ' पुराणवस्तू संशोधन ' अशी लांबलचक संज्ञा वापरली जात असे. विद्यापीठे व भारत सरकार यांनी पुरातत्त्व या संज्ञेची निश्चिती केली असल्याने ती आता जवळजवळ सर्वमान्य झालेली आहे. ' पुरातत्त्वं ' या संज्ञेला इंग्रजी भाषेतील समानार्थी शब्द' आर्किऑलॉजी ' (Archaeology) हा आहे. या इंग्रजी शब्दाचे मूळ ग्रीक भाषेतून आले आहे. ग्रीक भाषेत त्याचे दोन भाग पडतात. अर्किऑस (Archaios) म्हणजे प्राचीन असा आहे. त्याचेही मूळ आर्के (Arche) म्हणजे ' सुरुवात ' (beginning) अशा शब्दात सापडते, दुसरा शब्द ' लोगोस ' (logos) म्हणजे ' विवेचन ' (discourse) होय. तेव्हा आर्किऑलॉजी या शब्दाचा पूर्ण अर्थ मानवाच्या उत्पत्तीचे विश्लेषण असे आहे.

**डॉ. ढवळीकर** म्हणतात, पुरातत्त्वविद्या म्हणजे प्राचीन अवशेषाचा अभ्यास होय. पुरातत्त्व विद्येचे मुख्य उद्दिष्ट मानवी जीवनाचा अभ्यास हे असल्यामुळे इतिहास काळातील सामान्य माणसाच्या जीवनाचे सुसंगत चित्र उभे करण्यासाठी पुरातत्त्व विद्येचे साहाय्य घ्यावे लागते. पुरातत्त्वविद्या हा स्वतंत्र विषय नसून इतिहासाचा एक भाग आहे."पुरातत्त्व विद्येचा मुख्य हेतू प्राचीन मानवी संस्कृतीचा अभ्यास करणे हे आहे. इतिहासाचा जसा कागदपत्रांशी संबंध असतो तसाच भू - गर्भामध्ये दडलेल्या अनेक संस्कृतीच्या अवशेषांशीही संबंध असतो. इतिहास लेखन करीत असताना लिखित व अलिखित संदर्भ साधनांचा वापर करावा लागतो. अलिखित संदर्भ साधनातील सर्वात महत्त्वाचे साधन म्हणजे पुरातत्त्व विद्या होय. आज जगातील अनके संस्कृतीचा अभ्यास करीत असताना अनके शास्त्रांचा अभ्यास केला जातो तेव्हा काही कूट प्रश्न निर्माण होतात. बऱ्याचवेळा हे प्रश्न अनुत्तरित राहतात. परंतु काळाच्या ओघात पुरातत्त्व संशोधनामुळे असे प्रश्न सुटण्यास मदत होते. उदा. भारतीय पुराणामध्ये नऊ खंड पृथ्वीचा उल्लेख आहे. आजच्या भू - पृष्ठाकडे पाहिले असता हे वर्णन कपोलकल्पित वाटते. परंतु अटलांटिक महासागरात तळाला गेलेल्या अटलांटिस या खंडाचा शोध लागल्यानंतर भारतीय पुराणातील संदर्भ महत्त्वाचा वाटतो. सिंधू संस्कृती हे पुरातत्त्व शास्त्रातील एक वैशिष्ट्यपूर्ण संशोधन आहे. उत्खननामुळे अनेक गोष्टींवर प्रकाश पडतो व अपूर्ण प्रश्न सुटू लागतात. म्हणून पुरातत्त्व विद्या हा इतिहास संशोधनाला अतिशय महत्त्वाचा असा साहाय्यकारी विषय आहे.

### ९. शिलालेखशास्त्र (Epigraphy) :

Epigrahy म्हणजे शिलालेखशास्त्र होय. हे शास्त्र भाषाशास्त्र (Philology) व हस्ताक्षरशास्त्र (Palaeography) यांना अतिशय जवळचे आहे. या शास्त्रांच्या आधारे अनेक शिलालेख वाचता येतात व त्यांच्या आधारे नवीन माहिती मिळू

शकते. अशा - प्रकारचे शिलालेख साधारणतः मंदिरे, देवालये व मोठे राजवाडे यावर असू शकतात. अशा त - हेच्या शिलालेखांत एकच धोका संभवतो. तो म्हणजे त्यातील भाषा, वाक्यरचना व संक्षिप्तरूपे (Abbreviations) यांचा होय. कारण, शिलालेख हे एकाच व्यक्तीने लिहिलेले नसतात. त्यामुळे त्यांनी वापरलेले शब्दप्रयोग, वाक्प्रचार भिन्न स्वरूपाचे असू शकतात. जरी या शास्त्रामध्ये काही दोष असले तरी इतिहास संशोधनाला साहाय्यभूत ठरणारे असे हे एक महत्त्वाचे शास्त्र आहे. या शास्त्राचा उपयोग सांगताना **प्रो. रेनियर (Renier)** म्हणतात, ऐतिहासिक घटनांचा शोध लावण्यासाठी संशोधकाला पुरावे ज्या भाषेत लिहिले आहेत तिची सखोल माहिती आवश्यक आहे तसेच शिलालेख लिहीत असताना ज्या संक्षिप्त रूपांचा वापर केला आहे ती पद्धती माहीत असणे आवश्यक आहे."("To discover the events of which they are traces the research worker must have a thorough knowledge of the language in which they are written and of the system of abbreviations used in composing them.")

**१०. संदर्भ ग्रंथसूची (Bibliography) :**

संदर्भ ग्रंथसूची हे एक स्वतंत्र शास्त्र आहे. या शास्त्रामध्ये ज्या संदर्भ साधनांच्या आधारावर संशोधन केलेले असते त्यांची समग्र यादी दिलेली असते. इतिहास संशोधन किती श्रेष्ठ दर्जाचे आहे हे ग्रंथांच्या पाठीमागे दिलेल्या संदर्भ सूचीवरून ठरविण्यात येते. संदर्भ ग्रंथसूचीसंबंधी डॉ. के. एन. चिटणीस म्हणतात, "संदर्भ सूचीमध्ये ज्या संदर्भाचा संशोधकाने वापर केलेला असतो, त्याचा समावेश त्याने आपल्या ग्रंथामध्ये केलेला असतो. पण काहीवेळा संशोधकाने काही संदर्भ साधनांचा वापर केलेला असतो. पण काहीवेळा ज्याचा उल्लेख केलेला नाही अशीही साधने त्यामध्ये असतात. काहीवेळा उपयोग न केलेल्या किंवा संदर्भ न घेतलेल्या साधनांचा समावेश सूचीमध्ये केलेला असतो त्याचा हेतू भावी संशोधनाची पार्श्वभूमी असाच असतो. ("A bibliography include all those sources cited in the research work and may also contain such of the works as are consulted by the writer but not cited in his work. Some even include in this all those works which are neither cited in the text not consulted for the preparation of the work, but which are used for providing a sort of background for the study of the subject to which the research work relates.")

**संदर्भग्रंथ सूची - शास्त्रामध्ये पुढील चार प्रकार दिसून येतात.**

१. काही संदर्भ ग्रंथसूचीमध्ये जास्तीत जास्त उपयुक्त माहिती असते.

२. काही संदर्भ ग्रंथसूचीमध्ये कोणते ग्रंथ वापरले आहेत त्यांची यादी दिलेले असते.

३. काही संदर्भ ग्रंथसूचीमध्ये कोणत्या ग्रंथांचा मागोवा घेतला आहे त्यांची यादी दिलेली असते.

४. काही संदर्भ ग्रंथसूचीमध्ये संशोधनाच्या विषयासंबंधी आवश्यक असणाऱ्या ग्रंथांची यादी दिलेली असते.

वरील चार प्रकारांपैकी पहिल्या प्रकारच्या यादीला Select bibliagraphy असे म्हणतात तर चौथ्या प्रकाराला Exchaustive bibliography असे म्हणतात. वरील चारही प्रकारांचे दोन प्रकारे उपविभाग पडतात ते असे :

१. सर्वसामान्य संदर्भ (Ordinary bibliography).

२. टिपा - टिप्पणीसह संदर्भ (Annotated bibliography),

संदर्भ ग्रंथसूची हे एक स्वतंत्र व संशोधकांना अत्यंत उपयुक्त असे इतिहासाचे साहाय्यकारी शास्त्र आहे. यामध्ये पुढीलप्रमाणे नोंद ठेवावयाची असते :

अ) ग्रंथकर्त्याचे नाव, त्यानंतर स्वल्पविराम,

ब) स्वल्पविरामानंतर ग्रंथाचे नाव, त्यानंतर स्वल्पविराम,

क) त्यानंतर खंड क्रमांक, ग्रंथ प्रकाशन, प्रकाशनाचे ठिकाण, प्रकाशनाची तारीख, वर्ष व नंतर पान क्रमांक.

उदा. १. Sarkar Sir Jadunath, House of Shivaji : Studies Documents on Maratha History : Royal period, 3rd ed, M.C. Sarkar & Sons Ltd., Calcutta, 1955.

२. Balkrishna, Shivaji the Great, Vol.1, Tarapurwala & Sons, Bombay, 1932.

### ११. राज्यशास्त्र (Political Science) :

'इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण ' ही **सीले** यांनी केलेली इतिहासाची व्याख्या प्रसिद्ध आहे. एकोणिसाव्या शतकापर्यंत राजकीय विषयांना इतिहासात प्रामुख्याने स्थान असे. राजकीय विषयांचा शास्त्रीय दृष्टीने अध्ययन करणारी अभ्यासशाखा हे राज्यशास्त्राचे स्वरूप असल्यामुळे भिन्न राजकीय विचारप्रणाली, राजकीय घडामोडी, प्रशासकीय पद्धती व यंत्रणा यांची माहिती ते शास्त्र करून देते. एकाधिकारशाही, हुकूमशाही, लोकशाही, श्रेष्ठीसत्ता, वसाहतवाद, निमवसाहतवाद अशा इतिहासात वारंवार वापरण्यात येणाऱ्या संकल्पना राज्यशास्त्र स्पष्ट करते. शासनाने पारित केलेले कायदे, अमलात येणारे संविधान हे विषय देखील दोन्ही अभ्यासशाखांना महत्त्वाचे आहेत. तसेच लोकोत्तर शासकांच्या, युगप्रवर्तक विभूतींच्या कार्याचे राजकीय पैलू, त्यांची युद्धनीती, राजनैतिक संबंधाचे तात्विक अधिष्ठान, आंतरराष्ट्रीय राजकीय संस्थांची जडणघडण व कार्यपद्धती इत्यादी विषयांची राज्यशास्त्र देत असलेली माहिती इतिहासकाराला उपयुक्त ठरते. अनेक ऐतिहासिक घडामोडींची व समस्यांची उत्तरे राज्यशास्त्रातून सापडतात.

याचप्रमाणे राज्यशास्त्राच्या अध्ययनाला इतिहासाची मदत होते. वेगवेगळ्या राजकीय संकल्पना, राजकीय व शासकीय संस्था काळाच्या ओघात कशा उत्क्रांत झाल्या, गतकालीन राजकीय संस्थांचे स्वरूप काय होते, युद्धनीती काय होती, ही माहिती इतिहासातून राज्यशास्त्रज्ञ मिळवितो. यामुळे राजनीतीज्ञांना इतिहासाचे अध्ययन निकडीचे ठरते. पंडित जवाहरलाल नेहरू, विन्स्टन चर्चिल, फ्रान्क्लीन रूझवेल्ट यांसारखे महान जागतिक मुत्सद्दी इतिहासाचे गाढे अभ्यासक होते. यावरून राज्यशास्त्र व इतिहासाचा निकटचा संबंध स्पष्ट होतो. राजकारणाची कला आत्मसात करण्यास इतिहासाची मदत होते असे ग्रीक इतिहासकार **पॉलीबीअस**

munotes.in

म्हणतो."प्रत्यक्ष घडलेल्या सत्याधिष्टित राजकारणाकडे दुर्लक्ष झाल्यास इतिहासाला कल्पनाधिष्टीत साहित्याचे स्वरूप प्राप्त होते आणि इतिहासाच्या व्यापक दृष्टीखेरीज राजकारणाला गंभीर रूप येत नाही."असे **सर सीले** यांचे विधान दोहोतील परस्परपूरकता व निकटता दाखविण्यास पुरेसे बोलके आहे. राजकारण इतिहासाला विषय पुरविते तर इतिहास गतराजकारणाला उजाळा देतो. यामुळे दोन्ही अभ्यास शाखा परस्परांवर आधारित आहेत.

**१२. तत्त्वज्ञान (Philosophy):**

गतकालीन घटनांचे निव्वळ वर्णन करणे म्हणजे चांगला इतिहास नाही, इतिहासाला शैक्षणिक मूल्य आहे. गतकालीन घटनांतून, घडामोडींतून काही सारभूत तत्वे, सिद्धांत मांडता येतात. जीवनदर्शन घडविता येते. असे मानवी जीवनाचे सैद्धांतिक दर्शन घडविणारे शास्त्र म्हणजे तत्त्वज्ञान होय. संपूर्ण मानवी व्यवहारांच्या चिंतनातून जीवनाचा अर्थ सांगणारे, अंतिम सत्याचा शोध घेणारे अनेक तत्ववेत्ते पौर्वात्य व पाश्चिमात्य जगात पुढे आले. त्यांचा प्रभाव इतर विषयांच्या अभ्यासकावर होणे अपरिहार्य होते. फ्रेंच तत्वज्ञ व्होलटेअरने ' इतिहासाचे तत्त्वज्ञान 'असा शब्दप्रयोग प्रथम केला. आणि अठराव्या शतकापासून इतिहासाच्या क्षेत्रातील विचारवंत तत्त्वज्ञानाकडे आकर्षित झाले. गतकालीन समाज जीवनाचा व्यापकपणे अभ्यास करून त्यातून काही सार्वकालीन सिद्धांत स्पेंगलर, अर्नोल्ड टॉयनबी, विल ड्यूरांट यासारख्या इतिहासक्षेत्रातील विचारवंतांनी मांडले. तर क्रोसे, कॉलींगवुड, बरी यांनी तात्विक भूमिकेतून इतिहासाबाबतचे सिद्धांत मांडलेले दिसतात. तत्वज्ञानाही भूतकाळात प्रतिपादित करण्यात आलेल्या सिद्धांतांचा, विचारांचा मागोवा घ्यावा लागतो. नव्या पद्धतीचे जीवनदर्शन घडविण्यास त्यांची मदत होते. गतकाळातील तत्वप्रणालींचा आधार घेत वैचारिक परिवर्तन घडून येते. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाला प्लेटो आणि अरिस्टोटल यांचा सखोल अभ्यास केल्याखेरिज पुढे वाटचाल करता येत नाही.

**१३. साहित्य (Literature) :**

साहित्य व इतिहास यांचा निकट संबंध सर्वमान्य आहे. अठराव्या शतकापर्यंत इतिहास हे साहित्याचे अंग मानले जाई. मानवी जीवन हा या दोन्ही ज्ञानशाखांचा अभ्यासविषय आहे. साहित्यिक मानवी जीवनाचे कल्पनाधिष्टीत चित्रे रेखाटतो. तर इतिहासकार मानवी जीवनाचे सत्यदर्शन घडवितो. या दोहोतील दुसरा भेद म्हणजे इतिहासकारांचा अभ्यासविषय गतकाळातील मानवी जीवन आहे. साहित्यिक मात्र भूतकाळाप्रमाणे वर्तमानालाही आपल्या कक्षेत घेतो. इतिहास साहित्याला वर्ण्यविषय देतो; गतकाळातील महान् व्यक्तिंची चरित्रे, ऐतिहासिक प्रसंगावर आधारित कादंबऱ्या, लघुकथा, नाटके हे लोकप्रिय साहित्यप्रकार आहेत. इतिहासकाराला काही साहित्यिक गुणांची गरज असते. इतिहास म्हणजे ' निखळ शास्त्र ' असे म्हणणाऱ्या प्राध्यापक बरी यांनीही इतिहासकाराला गतकाळाचा अर्थ लावताना ' सहानुभूतीपूर्ण कल्पनाशक्ती ' वापरावी लागते असे म्हटलेले दिसते. लिओपोल्ड रँके हा शास्त्रीय पद्धतीच्या इतिहासलेखनाचा खंदा पुरस्कर्ता खरा, परंतु त्याच्या लिखाणातही कल्पनेचा वापर दिसतो, काही अंशी आत्मनिष्ठाही डोकावते. साहित्यिकात असणारे भाषाप्रभुत्व इतिहासलेखकात असणे उपयुक्त ठरते.

ऐतिहासिक सत्यकथन रंजक पद्धतीने केल्यास ते विशेष परिणामकारक ठरते. इतिहासकाराचे भाषाप्रभुत्व, शब्दार्थांच्या सूक्ष्म छटांची जाण हे गुण लेखन प्रभावी करण्यासाठी आवश्यक ठरतात. थॉमस कार्लाइल याचा फ्रेंच राज्यक्रांतीवरील ग्रंथ किंवा यदुनाथ सरकारांचा औरंगजेबावरील अभ्यासपूर्ण ग्रंथ त्यांच्या भाषाप्रभुत्वामुळे रोचक ठरतात. एरवी इतिहासग्रंथ कितीही विद्वत्तापूर्ण असले तरी ते वाचकांपर्यंत पोहोचत नाहीत. याच दृष्टीने इतिहास हे शास्त्र आहे व कलाही असे विधान जी. एम. ट्रिव्हेलियन यांनी केलेले आढळते.

## १४. भूगोल (Geography) :

भूगोलाचा मानवी इतिहासावर परिणाम होत असतो. **प्रो. बकल (Buckle)** म्हणतो, "मानव व समाज यांच्यावर भौगोलिक परिस्थितीचा प्रभाव पडत असतो."("The type of man and of society is influenced by the general aspects of nature.") **प्रो. मिचलेट (Michelet)** यांच्या मते, "भौगोलिक परिस्थितीची माहिती असल्याशिवाय इतिहासाचा जो कर्ता, तो मानवप्राणी चिनी चित्रातील व्यक्तीप्रमाणे अधांतरीच चाललेला दिसेल. म्हणून जमिनीकडे (भूगोलाकडे) नुसतेच एक घटना केंद्र म्हणून पाहू नये तर अन्न व हवामान यांचा जसा प्रभाव पडतो तसाच जमिनीचासुद्धा शतगुणाने प्रभाव पडतो."

इतिहास संशोधन करीत असताना ज्यावेळी श्रेष्ठ दर्जाची कागदपत्रे उपलब्ध नसतात तेव्हा भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून, निरीक्षण करून एक चित्र तयार केले जाते व त्याच्या आधारेच संभाव्य वर्णन करणे सोपे जाते. म्हणून **प्रो. जॉन ग्रीन (John Green)** आपल्या"The Making of England"या ग्रंथात म्हणतात, "निसर्गचित्र हे सर्वांत परिपूर्ण व विश्वसनीय असे कागदपत्र होय."("The landscape is the fullest and most certain of all documents.")

कोणत्याही देशाच्या इतिहासावर भूगोलाचा प्रभाव पडल्याशिवाय राहात नाही. भौगोलिक परिस्थितीनुसार माणसाच्या आवडी - निवडी व चालीरीती बनत असतात. उदा. डोंगराळ व खडकाळ प्रदेशातील माणसे शरीराने धिप्पाड व काटक असतात. त्यांची आवड साधी असते. त्यांच्या चालीरीती भपकेबाज असत नाहीत. तसेच कोणत्याही संकटाला तोंड देण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये असते. त्याच्या उलट चांगली सुपीक जमीन, विपुल पाणी, समशीतोष्ण हवामान अशी स्थिती असेल तर ती माणसे वातुळ शरीराची ; आळशी, मंद व निरुत्साही स्वभावाची असतात. ग्रीक तत्त्ववेत्ता **हिप्पोक्रेटिस** याने नैसर्गिक परिस्थिती व मानवी जीवनपद्धती यांमध्ये समन्वय दाखवून दिला आहे. ग्रीक तत्त्ववेत्ता **प्लेटो** म्हणतो की, माणसाच्या विविध प्रकारच्या शारीरिक ठेवणी, त्यांच्या कर्तृत्वाची क्षेत्रे, त्यांच्या सामर्थ्याच्या मर्यादा, त्यांची स्वभाव वैशिष्टये आणि त्यांच्या बऱ्यावाईट सवयी हे सगळे त्यांना मिळणारा सूर्यप्रकाश, त्यांच्या अंगावरून वाहणारे वारे, त्यांच्या पोटात जाणारे अन्नपाणी आणि त्यांना नेहमी दिसणारा निसर्ग यांवर अवलंबून असते. प्रसिद्ध फ्रेंच विचारवंत **माँटेस्क्यूने** भौगोलिक परिस्थितीच्या बाबतीत विचार मांडले आहेत. मानवी इतिहासाच्या घडणीत माणसाचे कर्तृत्व फारसे महत्त्वाचे नाही. मोठेमोठे पराक्रम करणारे महापुरुष इतिहास घडवत नाहीत. कितीही प्रचंड लढाई होऊन गेली तरी समाजाचे जीवन फार बदलत नाही. राष्ट्राच्या भरभराटीची किंवा

अधोगतीची ती कारणे नव्हेत, तर तेथील भूमी व हवामान यांचा मानवी इतिहासावर दीर्घकाळ टिकणारा परिणाम होत असतो.याचा अर्थ असा नव्हे की, भूगोलाशिवाय इतर कशालाच महत्व नाही, तर मानवी इतिहास घडत असताना भूगोल हा त्यामध्ये एक महत्त्वाचा घटक आहे एवढेच होय.

## १५. अर्थशास्त्र (Economics) :

अर्थशास्त्र हे जरी एक स्वतंत्र शास्त्र असले तरी इतिहासाच्या अभ्यासकाला त्याचा मागोवा घेणे आवश्यक ठरते. कोणत्याही व्यक्तीच्या हालचाली या स्वतंत्रपणे होऊ शकत नाहीत. समाजातील अनेक व्यक्ती एकमेकांशी आर्थिक हितसंबंधाने जोडलेल्या असतात. इतिहासकाराला या आर्थिक हितसंबंधाची थोडीशी तरी का होईना माहिति असणे आवश्यक असते. उदा. प्राचीन भारतातील व्यापार व नाणेपद्धती यांची माहिती घेतल्याशिवाय तत्कालीन समाजाचे आर्थिक व सामाजिक विवेचन करता येत नाही. आधुनिक काळात अर्थशास्त्र हे दिवसेदिवस गुंतागुंतीचे व किचकट होऊ लागले आहे. परंतु याचासुद्धा काही प्रमाणात ऐतिहासिक घटनांवर परिणाम होत असतो ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. अठराव्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली आणि मग या आर्थिक प्रश्नांना मानवी समस्यांचे स्वरूप प्राप्त झाले. **प्रा. सदाशिव आठवले** आपल्या ' इतिहासाचे तत्त्वज्ञान 'या ग्रंथात म्हणतात, "इतिहासाला, मानवी घडामोडींना, भौतिक बाजू असतात ; माणसांच्या कृती त्याच्या आर्थिक गरजांतून आणि हितसंबंधांतून निर्माण होत असतात. हा विचार एकोणिसाव्या शतकात एकदम नव्याने आणि प्रथमच सांगण्यात आला असे मुळीच नाही ; परंतु एवढे निश्चित की, जीवनाच्या आर्थिक बाजूचा बराच खोलवर विचार करून तपशीलवार विवेचनाने इतिहासाचा हा अर्थ प्रथम एकोणिसाव्या शतकात जर्मन तत्त्वज्ञ **कार्ल मार्क्स** यानेच दिला."

वरील विवेचनावरून असे वाटण्याची शक्यता आहे की, इतिहासकारांना अर्थशास्त्राचे सखोल ज्ञान घेणे आवश्यक आहे. याचा अर्थ इतकाच की, आर्थिक घडामोडींकडे दुर्लक्ष न करता त्यांतील महत्त्वाचे निष्कर्ष लक्षात घेऊन मगच इतिहासकाराने निर्णय घेणे उचित होईल. इतिहास संशोधकाला तत्कालीन अर्थशास्त्रीय दृष्टिकोण व विचार परंपरा माहीत असणे आवश्यक आहे. उदा. १८१८ नंतर एलफिन्स्टनने महाराष्ट्रातील आर्थिक पुनर्रचना करीत असताना जो शास्त्रशुद्ध आर्थिक दृष्टिकोण मांडला त्याचे ज्ञान अभ्यासकाला असणे आवश्यक आहे. तत्कालीन महाराष्ट्रातील जमीन महसुलात बदल करीत असताना **रिकार्डोच्या** खंड सिद्धांताचा प्रभाव येथील प्रशासनावर पडलेला होता. त्याचबरोबर इंग्लंडमध्ये **जेरोमी बेन्थम** याने मांडलेल्या उपयुक्ततावादाचा प्रभाव येथील आर्थिक बाबींवर पडलेला दिसून येतो. तसेच **मिलने** प्रस्थापित केलेल्या Political Economy चा सुद्धा प्रभाव दिसून येतो. अशा परिस्थितीत अर्थशास्त्राचा जितका सखोल अभ्यास असेल तितका जास्त उपयोग इतिहास संशोधनाला होईल. इतकेच नव्हे तर Econometrics या गणिती अर्थशास्त्राचासुद्धा इतिहास संशोधनामध्ये उपयोग होऊ शकेल. स्वतंत्र भारतामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांनी नव्या संशोधनाबद्दल ज्या सूचना केलेल्या आहेत त्यामध्ये सामाजिक व आर्थिक इतिहासावर भर द्यावा असे सुचविले आहे.

**१६. मानसशास्त्र (Psychology) :**

मानसशास्त्र व इतिहास ही दोन्हीही शास्त्रे एकमेकांना अतिशय जवळची आहेत. ऐतिहासिक घटना घडविणारी व्यक्ती एका विशिष्ट मानसशास्त्रीय प्रक्रियेमधून जात असते. मानवी स्वभावातील माया, मोह, लाभ, मद, मत्सर, हर्ष, युयुत्सू प्रवृत्ती या सर्वांची माहिती इतिहासकाराला असणे आवश्यक असते. गतकाळातील घटना ही जशीच्या तशी उभी करण्याचे काम कागदपत्रे करीत असतात ; परतु त्यातील व्यक्तीची मनोवृत्ती साक्षात उभी करण्याचे काम मानसशास्त्राच्या मदतीशिवाय होणे शक्य नाही. इंग्रज तत्त्वज्ञ **आर. जी. कॉलिंगवूड (R. G. Collingwood)** यांनी Inside Outside Theory ही याच संदर्भात मांडली आहे. उदा. शिवाजी व अफझलखान यांच्या भेटीच्यावेळी त्यांची मनःस्थिती कशी होती हे समजण्यासाठी इतिहासकाराने दोन्हीही व्यक्तींची स्वत : च कल्पना करून त्यावर निष्कर्ष काढल्यास दोघांचीही मन : स्थिती त्याला समजू शकेल. माणसाचे वैयक्तिक जीवन, भोवतालची परिस्थिती यांचा एकमेकावर प्रभाव पडत असतो. तेव्हा जर त्यांच्यातील संबंध जाणून घेतला तर मानसशास्त्रीय निष्कर्ष काढता येतात. मानसशास्त्राचा अगदी अलीकडील काळात चांगला वापर सुरू झाला आहे. पूर्वी इतिहासकार एखाद्या युद्धाची कारणे शोधत असताना आर्थिक, सामाजिक व राजकीय बाबींवर भर देत असत. अलीकडील काळात युद्धाच्या पाठीमागे असणारे मानसशास्त्रीय कारण शोधले जाते. उदा. दुसऱ्या महायुद्धास हिटलर करणीभूत ठरला. त्यासाठी त्याच्यातील मनोविकृती हेच मुख्य कारण गृहीत धरले आहे. मानसशास्त्राच्या प्रभावामुळे ऐतिहासिक घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला ही गोष्ट सिद्ध होते. **प्रो. बार्नस (Barnes)** आपल्या ' A History of Historical Writing ' या ग्रंथात म्हणतात, "मानसशास्त्राच्या आधाराने इतिहास अनेक महत्त्वाच्या गोष्टी जाणू शकेल. एखादी क्रिया करण्यामागची प्रेरणा, तसेच जडण - घडण व नियंत्रक, मानवी श्रद्धा या सर्वांची त्याला (इतिहासकाराला) माहिती घेता येईल." (History may derive from psychology most important information relating to the nature of motivation patterns and controls in human actions and beliefs.")

**१७. समाजशास्त्र (Sociology) :**

इतिहास व समाजशास्त्र या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. (Man is a Social Animal). तो समाजात राहात असताना अनेक कृती करीत असतो. इतिहास व समाजशास्त्र ही दोन्हीही शास्त्रे मानवाचाच अभ्यास करतात. त्यामुळे त्यांचा निष्कर्ष जरी वेगळा असला तरी कार्यपद्धती सारखीच असते. इतिहास संशोधनातील अनेक विद्वान हे प्रथमत : समाजशास्त्रज्ञच होते. पूर्वी इतिहास व समाजशास्त्र हे दोन्ही विषय एकत्रच असत ; परंतु त्यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्याचे काम **एमिल डर्कहॅम (Emile Durkheim)** याने केले. विसाव्या शतकात **मॅक्स वेबर (Max Waber)** याने अनेक बाबतीत संशोधन करून इतिहास व समाजशास्त्र या दोहोंच्यामधील जवळचा संबंध दाखवून दिला. **प्रो. ई. एच्. कार** यांनी समाजशास्त्राच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिले आहे. ते म्हणतात, "जर समाजशास्त्राला इतिहासासारखे उपयोगी बनवावयाचे असेल तर त्याने वैशिष्ट्यपूर्ण घटना व सामान्य घटना यांच्यातील संबंधांचा अभ्यास केला पाहिजे.



munotes.in

समाजशास्त्राने आक्रमक बनले पाहिजे व अशावेळी वर्तमानकाळातील समाजाचा अभ्यास न करता समाजातील बदल व विकास या संदर्भात अभ्यास केला पाहिजे."("Sociology, if it is to become a fruitful field of study, must like history concern itself with the relation between the unique and the general, but it must also become dynamic a study not of society at present but of social change and development.")

**१८. मानववशशास्त्र : (Anthropology)**

प्राचीन काळातील अस्थींचा अभ्यास करून मानवाच्या शारीरिक रचनेत कसकसे परिवर्तन होत गेले याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानववंशशास्त्र होय. हे बदल परिस्थितीनुरूप होतात आणि म्हणून असे शारीरिक बदल होण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत झाली असावी याबद्दल कयास बांधता येतात. माणसाच्या कवटीचा आकार, कपाळाची ठेवण, डोळ्यांचा व नाकांच्या हाडांचा आकार यांचे परीक्षण करून हे शास्त्र मानवाच्या शारीरिक उत्क्रांतीचे सर्वसाधारण निष्कर्ष काढते. मानवाचे वेगवेगळे वंश कोणते होते, त्यांची शारीरिक वैशिष्ट्ये कोणती याचा अभ्यास वंशशास्त्र करते. याच आधारे **गोबिनो (Gobineau)** सारख्या लेखकाने आर्यांच्या तथाकथित वांशिक श्रेष्ठत्वाचा सिद्धांत मांडला. त्याचे दुष्परिणाम जगाला भोगावे लागले.

प्रत्येक मानवसमूहाची काही शारीरिक, मानसिक व स्वभावासंबंधी जन्मजात वैशिष्ट्ये असतात. ही वैशिष्ट्ये नैसर्गिक, सामाजिक व शैक्षणिक प्रभावाने प्रभावित होत नाहीत. वंशवादाचे आधार -

१) उत्तम रंग - हे वंशश्रेष्ठत्वाचे महत्त्वाचे लक्षण आहे.

२) रक्तशुद्धता - हा आधार चुकीचा व अशास्त्रीय आहे.

३) मानसिक योग्यता - उच्च वंशातच तीक्ष्ण बुद्धी असते हे मतही चुकीचे आहे.

४) सांस्कृतिक श्रेष्ठत्व -

डॉ. घुर्ये, इरावती कर्वे, डॉ. दुबे, डॉ. गुहा, आशुतोष मुखर्जी, डॉ.मुजुमदार हे भारतातील मानववंशशास्त्राचे प्रसिद्ध अभ्यासक, संशोधक होत. इतिहासात विशिष्ट काळाच्या सामाजिक व राजकीय घटनांची नोंद असते. त्या घटना का व कशा घडल्या, त्याकाळची इतर परिस्थिती, त्या घटनांचे परिणाम या सर्वांची इतिहासात चर्चा होते.तर मानववंशशास्त्रात समाजाची संस्कृती व सभ्यता याची चर्चा होते. इतिहास गतकालीन घटनांची कालबद्ध नोंद ठेवतो तर मानववंशशास्त्र समाजाच्या शारीरिक, सांस्कृतिक व सामाजिक या सर्वच उपायांचा अभ्यास करते.

**१९. संख्याशास्त्र (Statistics) :**

संख्याशास्त्र हे इतिहास संशोधकाच्या दृष्टीने एक नवीनच शास्त्र आहे. पूर्वी जेव्हा संख्याशास्त्र विकसित झालेले नव्हते तेव्हा त्याच्या आधाराने इतिहास संशोधकाला काही मदत मिळू शकेल अशी कल्पनाच नव्हती. आधुनिक काळात इतर अनेक शास्त्रे वेगवेगळ्या शास्त्रांच्या आधाराने आपले ज्ञान पूर्णत्वाला नेत आहेत. उदा. एखादा समाजशास्त्रज्ञ किंवा अर्थशास्त्रज्ञ आपला मुद्दा स्पष्ट करताना संख्याशास्त्राचा

munotes.in

आधार घेतो. मग अशाच शास्त्रामध्ये असणाऱ्या इतिहासाने संख्याशास्त्राचा वापर केल्यास कोणतीही हरकत नसावी. यामुळे संख्याशास्त्राचा उपयोग करून घेण्याची पद्धत सुरू झाली. पूर्वी इतिहासकार ढोबळ मानाने विधाने करीत असे तर आता इतिहासकार संख्याशास्त्र व गणकयंत्राच्या साहाय्याने आपला निष्कर्ष शंभर टक्के तंतोतंत कसा होईल या हेतूने संख्याशास्त्राचा वापर करू लागला.

**२०. जनगणनाशास्त्र (Demography) :**

आधुनिक काळात जनगणनाशास्त्र हे एक प्रगत शास्त्र आहे. त्याच्या आधारे अनेक अनिर्णित प्रश्नांची उकल करता येते. मध्ययुगात खेडेगावात हा एक स्वयंपूर्ण घटक असे. औद्योगिक क्रांतीनंतर शहरांची संख्या वाढली व लोकसंख्येत भर पडली व तुलनेने खेडी ओस पडून खेड्यांतील लोकसंख्या कमी झाली. अशाप्रकारच्या या सामाजिक बदलामुळे समाजरचनाच बदलून गेली. शहरांची लोकसंख्या वाढल्यामुळे कोणत्या समस्या निर्माण झाल्या व त्या दूर करण्यासाठी कोणते उपाय योजले पाहिजेत यासंबंधी विचारविनिमय होऊ लागला. जनगणनाशास्त्र हे अनेक बाबींचा विचार करून निष्कर्ष काढत असते. या निष्कर्षाच्या आधारावर इतिहास संशोधक आपले निष्कर्ष पडताळून पाहतो व जरूर तेथे बदल घडवितो.

**२१. नीतिशास्त्र (Ethics) :**

नीतिशास्त्र व इतिहास यांचे नाते फार जुने व जवळचे आहे. प्राचीनकाळी अशी एक अपेक्षा असे की, प्रत्येक विषयाने (Discipine) समाजाला मार्गदर्शन करावे व त्यांनी काही ना काही आदर्श समाजापुढे ठेवलाच पाहिजे. नीतिशास्त्र हे मूलभूतपणे समाजाला नैतिक मार्गदर्शन करीत असते. इतिहास हा विषय समाज मार्गदर्शनासाठीच आहे अशी पहिल्यापासून धारणा होती. तेव्हा इतिहासानेसुद्धा घटनांचे वर्णन करीत असताना काही नीतितत्त्वे सांगावीत अशी अपेक्षा होती. प्राचीन काळापासून काही इतिहासकारांनी घटनांचे वर्णन करून मानवी स्वभाव दर्शवणारी काही विधाने नीतिबोधाच्या स्वरूपात लोकांच्यापुढे मांडली. उदा. पंचतंत्र व इसापनीती.

ग्रीक इतिहासकार **थ्युसीडीडीज** याने पुढील काही विधाने करून लोकांच्यापुढे नीतितत्त्वे मांडली.

१. सर्वच शूर माणसांना युद्ध नको असते.
   (Not every brave man wants war.)
२. सुदैवानंतर दुर्दैवाचा फेरा येतो.
   (Namesis follows upon good fortune.)
३. प्रसिद्धीच्या अभिलाषेने नाश होतो.
   (Love of fame often lures to destructon.)
४. सूड जरी चांगला व न्याय्य वाटला तरी तो सतत यशस्वी होत नाही.
   (Revenge though sweet is not always successful though it may be just.)
५. देव चांगल्याचे संरक्षण करतो. (God protects the right.)

## २२. मूर्तीकला (Iconography) :

मूर्तीकला हे सुद्धा एक स्वतंत्र शास्त्र आहे. या शास्त्राच्या आधारे तात्कालीन समाजातील सांस्कृतिक व सामाजिक परंपरा समजू शकतात. तसेच मूर्ती या अनेक देवदेवतांच्या असल्यामुळे देवदेवतांच्याविषयी कोणत्या कल्पना अस्तित्वात होत्या याची माहिती मिळते. मूर्तीकलाशास्त्र अजूनही पूर्णत्वाला पोहोचलेले नसले तरीही त्यांच्यापासून अनेक गोष्टीची माहिती मिळते.

प्रसिद्ध इतिहास संशोधक **प्रा. ग. ह. खरे** यांनी मूर्तीकलेसंबंधी विचार मांडत असताना इतिहास संशोधकाला मूर्तीकलेच्या अभ्यासासाठी आवश्यक असणाऱ्या काही गुणांची चर्चा केली आहे.

१) मूर्तीचा परिचय करून घेत असताना ती स्त्री किंवा पुरुष आहे हे पाहावे. स्त्री मूर्तीची काही लक्षणे मानली जातात उदा. उन्नत स्तन, केशबंध, कृश पोट व वस्त्रे विशेषतः प्राचीन व मध्यमयुगीन स्त्रीमूर्तीमध्ये उन्नत स्तन हे महत्त्वाचे गमक मानले जाते.

२) मूर्ती निश्चित करीत असताना तिचे वाहन हे निश्चित केले जाते. अतिप्राचीन मूर्तीच्या बाबतीत वाहन अजिबात नसे किंवा ती निश्चित अशी ठरलेली नव्हती.

३) वाहन व आयुधे यांच्यामध्ये हळूहळू बदल होत गेला. उदा. सूर्य हे विष्णू देवतेचे चिन्ह मानलेले आहे. सूर्याला गुरुत्मन् किंवा सुपर्ण असे म्हणतात. पक्षाप्रमाणे सूर्य आकाशात सर्वात उंच व जास्त चालतो. म्हणून त्याला पक्षाचा राजा म्हटलेले आहे. सूर्य चक्राकार असल्याने सूर्यचक्र हे विष्णूचे चिन्ह मानले आहे. हळूहळू पक्षाचा राजा हा पक्षी वर्गातीलच असला पाहिजे म्हणून एका विशिष्ट पक्षाला गरुड म्हणतात. विष्णूला मनुष्यरूप दिल्यामुळे गरुडाला त्याचे वाहन बनविले व सूर्यचक्र जाऊन चक्र हे विष्णूचे आयुध बनले.

४) मूर्ती निश्चयातील पुढील मुद्दा म्हणजे तिचा शिल्पपंथ ठरविणे होय. शिल्पपंथ ठरवीत असताना मूर्तीच◌े रूप, काल, स्थल, विषय, वास्तू, अंगलट, पोशाख, अलंकार, केशरचना, आयुधे, आसपासची झाडे व पार्श्वभूमी यांचा विचार करावा.

५) गुणकार्यानुसार देवतेचे रूप, वाहन, आसन, मुद्रा, स्थान, आयुधारणपद्धती, वाहनदर्शन प्रकार इत्यादींचा विचार करावा.

६) शिल्प कोणत्या धर्माचे आहे हे समजणे सम्यक् ज्ञानाच्या दृष्टीने आवश्यक आहे. उदा. उत्तरेकडे वैदिक, जैन व बौद्ध तिन्ही धर्माच्या मूर्ती सापडतात तर दक्षिणेकडे वैदिक व जैन धर्माच्याच मूर्ती मिळतात. थोडक्यात, मूर्तीकला हे एक शास्त्र असून त्याच्या साहाय्याने इतिहास संशोधनाला खूप मदत होत असते.

**२३. भौतिकशास्त्र (Physics) :**

इतिहास विषयाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. ऐतिहासिक मुद्दा स्पष्ट करण्यासाठी नुसतीच कागदपत्रे पुरेशी नसतात. ऐतिहासिक मुद्दा स्पष्ट करण्यासाठी इतिहासाच्या साहाय्यकारी शास्त्राची मदत घ्यावी लागतेच. अशा साहाय्यकारी शास्त्रामध्ये अनुक्रमणिका (chronology) मुद्राशास्त्र, डिप्लोमॅटिक्स, शिलालेखशास्त्र, नाणकशास्त्र, पुराणवस्तू संशोधन अशा अनेक शास्त्रांचा उपयोग होत असतो. परंतु अलीकडे इतिहास संशोधनामध्ये नव्या समस्या निर्माण होत असल्याने त्या सोडविण्यासाठी भौतिकशास्त्राची मदत घ्यावी लागते. भौतिकशास्त्रामध्ये या ठिकाणी आपल्याला पदार्थविज्ञानशास्त्राचा (Physics) विचार करावयाचा आहे. इ.स.१९०३ पासून इतिहासास शास्त्राचा दर्जा देण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. या संदर्भात पहिली समस्या अशी आहे की इतिहास हे शास्त्र आहे की कला ? इ. स. १९०३ साली **प्रो. जे. बी. ब्यूरी,** केंब्रिज युनिव्हर्सिटीमध्ये इतिहास विभागप्रमुख झाले. तेव्हा त्यांनी इतिहासाचे महत्त्व वर्णन करीत असताना एक विधान केले त्याची चर्चा संपूर्ण विसाव्या शतकात जगभर झाली. ते विधान म्हणजे ' History is a science no less & no more. ' निव्वळ या विधानावरून **प्रो. ब्यूरी** यांना जे म्हणावयाचे होते त्याचा संपूर्ण अर्थबोध होत नाही, सबब त्यांच्या भाषणातील पुढील भाग येथे उद्धृत करीत आहे."If year by year history is to become more and more powerful for stripping the badges of error from the eyes of men for shaping public opinion and advancing the cause of intellectual and political liberty, she will best prepare her disciples for the performance of the tack, not by considering the immediate utility of next week or next year or next century, not by accommodating her ideal or limiting her range, but by remembering always that though she may supply material for literacy art or philosophical speculation she is herself a Science no less and no more."या विधानावरून आपल्या लक्षात येईल की इतिहास हे स्वत : च एक शास्त्र आहे असा दावा पहिल्यांदा **प्रो. ब्यूरीनी** केला. इतिहास हे शास्त्र आहे, याच्या स्पष्टीकरणासाठी पुढील मुद्दे उपस्थित केले आहेत.

१. शास्त्राचा मुख्य हेतू भविष्यकथन करणे, हे त्याचे सामर्थ्य आहे. या बाबतीत इतिहास कमी पडणार नाही. हा इतिहास हे शास्त्र आहे म्हणणाऱ्याचा दावा आहे. एखाद्या विशिष्ट परिस्थितीमध्ये व्यक्ती काय करू शकेल यासंबंधीचे भविष्यकथन इतिहासकाराला करता येईल. **बकल** म्हणतो, इतिहासाकाराची ही क्षमता आहे, पण आजपर्यंत त्यांनी एखाद्या व्यक्तीवर आपले लक्ष केंद्रित केले होते. त्याऐवजी त्यांनी सर्वसाधारण घटनांवर अवलंबून राहावयास पाहिजे होते. **प्रो. शेख अलींनी** आपल्या ग्रंथात एक म्हण दिली आहे. The great man is a public misfortune."या म्हणीची आपल्याला अनेक उदाहरणे देता येतील. उदा. काश्मीर प्रश्न, आयर्लंडचा प्रश्न इ. थोडक्यात, इतिहासामध्ये व्यक्तीचा विचार न करता सर्वसाधारण समाजाचा विचार केला असता भविष्यकथन शक्य आहे असे इतिहासाला शास्त्र मानणाऱ्यांचा दावा आहे.

munotes.in

२. इतिहास व शास्त्र दोघांचाही हेतू ' सत्याची ' स्थापना करणे हा आहे. शास्त्रामध्ये पद्धतशीरपणे प्रयोग करून ' सत्य ' स्थापन करता येते. इतिहाससुद्धा शास्त्रीय पद्धतीत कार्य करीत असेल तर गतकाळाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करून ' सत्य ' स्थापन करणे शक्य आहे.

३. शास्त्रामध्ये सर्वसाधारण नियम बनवलेले आहेत त्याप्रमाणे शास्त्र कार्य करीत असते. इतिहासामध्ये घटना घडविण्याच्या प्रवाहाचा विचार करून आपले नियम बनविण्याची क्षमता इतिहासामध्ये आहे. इतिहास व शास्त्र याच्यामधील फरक विगमन व निगमन या तर्कशास्त्रांच्या पद्धतीमध्ये आहे.

४. शास्त्राचा भर निरीक्षण व प्रयोगात्मकतेवर असतो. इतिहासामध्ये याच तंत्राचा अवलंब करतात परंतु इतिहासाचे ज्ञान अप्रत्यक्ष स्वरूपाचे असल्याने प्रत्यक्ष निरीक्षण शक्य नसते. तथापि, ऐतिहासिक घटनांचे प्रयोगात्मक पद्धतीने सत्य शोधण्याचा प्रयत्न इतिहास संशोधक करतात. उदा. अंतरंग व बहिरंग परीक्षणांचा वापर करतात. इतिहास शास्त्र नाही या बाजूने मत व्यक्त करणारे विद्वानही आहेत. तथापि, इतिहासास शास्त्राचा दर्जा द्यावयाचा प्रयत्न असल्याने ही धडपड चालू आहे.

भौतिकशास्त्र दोन प्रकारे कार्य करते.

१. व्यवहारी पातळीवर उपयोगी ठरेल असे संशोधनाचे कार्य भौतिकशास्त्रे करीत असतात.

२. बौद्धिक क्षेत्रात पुढील पिढीसाठी कार्यकारणभावासंबंधी नियम करून, पुढील मार्ग आखून ठेवण्याचे काम शास्त्र करीत असते.

या संदर्भात इतिहासाला मर्यादा आहेत, तथापि इतिहास संशोधक व पद्धतिशास्त्रज्ञ या दृष्टीने प्रयत्नशील आहेत. पदार्थविज्ञानशास्त्र किंवा कोणत्याही भौतिकशास्त्रासंबंधी जे म्हणता येईल तेच इतिहासासंबंधी म्हणता येते. **प्रो. आर्थर मार्विक** म्हणतात, की 'मेटलॅण्डपासून फिशरपर्यंत इतिहासकार 'युद्ध', 'क्रांती', 'सरंजामशाही', 'प्रातिनिधिक सरकार' जे म्हणतात त्याचे स्वरूप सामान्यीकरणाचे असते.' इतिहासामध्ये सिद्धांत कल्पना असतात. घटनाची शक्याशक्यता इतिहासात सांगितलेली असते. विचारप्रवाहासंबंधी इतिहासामध्ये सांगितलेले असते. भौतिकशास्त्रामध्ये स्पष्ट शब्दांत नियम असतात. शास्त्रज्ञ आपल्या संशोधनामध्ये अत्यंत सूक्ष्म अशा घटकापर्यंत जाऊ शकतो. भौतिकशास्त्राचे संशोधक आपले संशोधन समाजाच्या जास्तीत जास्त उपयोगाचे कसे होऊ शकेल याचा विचार करतात. इतिहासाचे तसे नसते, काही वेळा केलेले संशोधन वैयक्तिक स्वरूपाचे असते. उदा. इतिहासाच्या पीएच.डी. चे प्रबंध समाजाला मार्गदर्शन करणारे असत नाहीत. भौतिकशास्त्र अख्ख्या जगाचा विचार करते व हे संशोधन जगाच्या उपयोगी कसे पडेल याचाच विचार केला जातो. पदार्थविज्ञानशास्त्र असो किंवा रसायनशास्त्र असो त्यामध्ये निर्माण झालेल्या नवनव्या शास्त्रीय पद्धतीचा उपयोग इतिहासामध्ये केला जातो. कार्बन डेटिंग चा उपयोग करून ऐतिहासिक अवशेषांचे कालमान ठरविता येते. हाडांची विविध शास्त्रीय परीक्षणे करून त्यावरून हाडे कोणाची आहेत यांचा शोध घेतला जातो.

munotes.in

**आपली प्रगती तपासा :**

प्र. १. इतिहासाचा इतर सहाय्याकारी शास्त्राशी असलेल्या संबंधाचा आढावा घ्या.

-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------------

## ३.३ सारांश :

वरील सर्व सहाय्यकारी शास्त्रे पाहिल्यावर असे दिसून येईल की, इतिहास संशोधकाला आपला मुद्दा मांडत असताना कोणत्या ना कोणत्या शास्त्राचा आधार घ्यावाच लागतो. इतिहासाच्या संशोधनासाठी वरील सर्व शास्त्रे महत्त्वाची व निर्णायक ठरतात. म्हणजेच जर संशोधकाने यापैकी अनेक शास्त्रांचा चांगला अभ्यास केला तर त्याने काढलेले निष्कर्ष हे जास्त चिरकालीन स्वरूपाचे ठरू शकतील.

एकूण, इतिहासाच्या अभ्यासाची, ऐतिहासिक सामुग्री संकलित करण्याची इतकी विविध साधने व शास्त्रे आज उपलब्ध आहेत की त्यामुळे इतिहास अध्ययनाची कक्षा सतत व्यापक होत आहे आणि भिन्न शास्त्रांच्या मदतीखेरीज बिनचूक व अर्थपूर्ण इतिहास लिहिणे दुरापास्त झाले आहे.

## ३.४ प्रश्न :

१. ' इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण ' या मताशी आपण सहमत आहात काय?
२. इतिहासाचा इतर सहाय्याकारी शास्त्राशी असलेल्या संबंधाचा आढावा घ्या.
३. ऐतिहासिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी इतिहासाला अर्थशास्त्राची कोणत्या प्रकारे मदत होते ते लिहा.
४. इतिहासाचे भाष्य करण्यासाठी मानसशास्त्राच्या होणाऱ्या उपयोगाची चर्चा करा.
५. इतिहास व भूगोल आणि मानववंशशास्त्र यांचे संबंध सांगा.
६. इतिहासाच्या अभ्यासास साहित्य आणि भाषाशास्त्र कितपत उपयोगी ठरतात ?
७. इतिहास - समाजशास्त्र यांचे परस्पर नाते स्पष्ट करा.

## ३.५ अतिरिक्त वाचन :


१. ई. एच. कार, अनुवादक - प्रा.वि.गो. लेले, इतिहास म्हणजे काय ? कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
२. गार्डन चाईल्ड, अनुवादक - डॉ. बलराज शर्मा, इतिहास का इतिहास, हरियाणा साहित्य अकादमी, चंदीगढ, १९८८.
३. डॉ. गोविंदचंद्र पांडे, इतिहास : स्वरूप एवं सिद्धांत, राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी, जयपूर, १९९ ८.

४. डी. डी. कोसांबी, पुराणकथा व वास्तवता.
५. द. वि. केतकर, इतिहासातील अंत : प्रवाह.
६. ग. ह. खरे, साधना चिकित्सा, लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७६.
७. वि. द. घाटे, इतिहासशास्त्र आणि कला, देशमुख प्रकाशन, पुणे.
८. प्रभाकर देव, इतिहास : एक शास्त्र, कल्पना प्रकाशन, नांदेड.
९. सदाशिव आठवले, इतिहासाचे तत्त्वज्ञान, प्राज्ञ पाठशाला मंडळ, वाई, १९६७.
१०. डॉ. शांता कोठेकर, इतिहास : तंत्र आणि विज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.
११. सुहास राजदरेकर, इतिहास लेखनशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९९८.
१२. डॉ. बी. एन. सरदेसाई, इतिहासलेखनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५.
१३. गायकवाड, डॉ. सरदेसाई हनमाने, इतिहास लेखनशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१.
१४. डॉ. एस. एस. गाठाळ, इतिहासाचे तत्वज्ञान, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००५.

❄❄❄❄❄❄❄

munotes.in

munotes.in

# ४

# इतिहासाचे स्त्रोत / साधने, स्वरूप आणि प्रकार

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे
४.१ परिचय
४.२ प्राथमिक स्त्रोत - साहित्यिक/ वाङ्मयीन
४.३ प्राथमिक पुराभिलेखीय स्त्रोत
४.४ दुय्यम स्त्रोत - साहित्यिक/ वाङ्मयीन स्त्रोत
४.५ मौखिक स्त्रोत
४.६ डिजिटल स्त्रोत
४.७ सारांश
४.८ प्रश्न
४.९ अतिरिक्त वाचन

## ४.० उद्दीष्टे

या युनिटमधून गेल्यानंतर विद्यार्थी सक्षम होऊ शकेल

- प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक इतिहासासाठी स्त्रोतांचे स्वरूप आणि प्रकार समजणे.
- प्राचीन भारतीय इतिहासाची प्राथमिक व दुय्यम स्त्रोत यातील फरक लक्षात येणे.
- ऐतिहासिक स्त्रोतांचे विविध प्रकारचे स्पष्टीकरण करणे.

## ४.१ परिचय

इतिहास लेखनाचा स्त्रोत साहित्य हा आवश्यक भाग आहे. इतिहासाचे साधन म्हणजे ज्याच्या साहाय्याने आपणाला इतिहासाच्या एखाद्या पैलूचे किंवा प्रत्यक्ष इतिहासाचे ज्ञान होते त्याला इतिहासाचे साधन म्हणतात. इतिहास लेखनात साधनांचे महत्त्व स्पष्ट करताना आर्थर मार्विक यांनी म्हटले होते की, " केवळ साधनांचा अभ्यास इतिहास - लेखनासाठी पुरेसा नाही, मात्र त्याखेरीज इतिहास आकार घेत नाही हेही तितकेच सत्य आहे." इतिहासाला शास्त्राचा दर्जा प्राप्त करून देण्यासाठी ऐतिहासिक साधने इतिहास लेखनासाठी महत्त्वाची आहेत. विश्वसनीय संदर्भ साधने व त्या साधनांसाठी वापरात आणलेली शास्त्रशुद्ध मूल्यमापन पद्धती या दोन बाबी इतिहास लेखनासाठी महत्त्वाच्या आहेत. यावरून साधनांचे महत्त्व लक्षात येते.

थ्युसिडाईडीज याने संदर्भ साधनांचे महत्त्व स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, "ऐतिहासिक घटनांचे खरेखुरे, तंतोतंत वर्णन करणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी योग्य साधने जमविणे आवश्यक आहे, अशा घटना जमविल्या पाहिजेत की, त्यापासून भविष्यकाळात मानवाला काही धडा मिळू शकेल."



munotes.in

ऐतिहासिक स्त्रोत विविध प्रकारचे आहेत. त्यांच्या स्वरूपाप्रमाणे त्यांचे वर्गीकरण केले जाऊ शकते. इतिहास लेखनात स्त्रोत महत्वाची भूमिका बजावतात. म्हणून इतिहासकार पुराभिलेखागार, वस्तुसंग्रहालये आणि संस्था अशा वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेतो. इतिहासकार ऐतिहासिक स्त्रोतांच्या मदतीने भूतकाळातील घटनेचे पद्धतशीर वर्गीकरण करतो. त्यांचे विस्तृत प्रकारात खालील प्रकारे वर्गीकरण केले जाऊ शकते.

१. पुरातत्वीय स्त्रोत

२. साहित्यिक किंवा वाङ्मयीन स्त्रोत

३. मौखिक परंपरा

४. डिजिटल स्त्रोत

या स्त्रोतांचे दोन प्रकारात वर्गीकरण देखील केले जाऊ शकते

**प्राथमिक स्त्रोत - घटना घडत असताना निर्माण झालेली साधने ही प्रथम दर्जाची साधने मानली जातात.** गोत्शॅल्क यांनी प्राथमिक डेटा स्त्रोत म्हणून परिभाषित केले आहे. "कोणत्याही इंद्रिय व लेखकांची नेत्र साक्ष". दुसऱ्या शब्दांत प्राथमिक स्त्रोत मूर्त सामग्री आहेत, जी ऐतिहासिक घटनेचे वर्णन प्रदान करतात आणि घटना घडल्यानंतर लवकरच तयार केली जातात. नवीन कागद अहवाल, अक्षरे, सार्वजनिक दस्तऐवज, कोर्टाचे निर्णय, वैयक्तिक डायरी, आत्मचरित्र, कलाकृती आणि प्रत्यक्षदर्शींच्या तोंडी साहित्याचा समावेश होतो.

भूमिपूजन किंवा उद्घाटनाच्या कार्यक्रमाला वेळेस जी कोनशिला बसवतात ते सुद्धा प्राथमिक साधन मानले जाते. एखाद्या महापुरुषाच्या समक्षच त्याच्या हयातीत त्याचे चरित्र लिहिले जाते तेसुद्धा प्रथम दर्जाचे साधन ठरते. उदाहरणार्थ बाणभट्टाचे हर्षचरित. प्राथमिक स्त्रोत खालील प्रमाणे दोन विस्तृत श्रेणींमध्ये विभागले जाऊ शकतात.

१) दिलेल्या ऐतिहासिक कालावधीचे अवशेष यामध्ये छायाचित्रे, कोरीव सापळे, जीवाश्म साधने, शस्त्रे, भांडी, फर्निचर आणि इमारतींचा समावेश असू शकतो. हे मूलतः भावी पिढ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्याकरिता नसले तरी भूतकाळाविषयी विश्वसनीय आणि योग्य पुरावे देण्यासाठी ते खूप उपयुक्त स्त्रोत सिद्ध करतील. या अवशेषाद्वारे मौखिक नसलेली माहिती प्रदान करतात.

२) ज्या वस्तूंचा प्रत्यक्ष तत्कालीन व समकालीन काळात उपयोगात आला आहे अशा वस्तूंचा यात समावेश होतो. यात कायदे, फाइल्स, पत्रे, हस्तलिखिते, सरकारी ठराव, स्मरणपत्रे, वर्तमानपत्रे, मासिके, जर्नल्स, फाइल्स, सरकारी किंवा इतर अधिकृत प्रकाशने, नकाशे, तक्ते, पुस्तके, कॅटलॉग, संशोधन अहवाल, बैठक अहवाल नोंद अशा कागदपत्रांचा समावेश आहे. शिलालेख, लिप्यंतरण वगैरे रेकॉर्डिंगच्या बैठका इ. साधने

प्राथमिक साधनांना इतिहास लेखनात महत्त्व दिले जाते याची कारणे प्रभाकर देव यांनी पुढीलप्रमाणे दिले होती. १) प्राथमिक साधने ही समकालीन असतात. २) समकालीन असल्यामुळे ती अधिक विश्वसनीय असतात. ३) समकालीन असल्यामुळे वास्तवाचा विपर्यास होण्याची शक्यता असते. ४) प्राथमिक साधने ही पूराव्याच्या स्वरूपातील असल्यामुळे सत्यशोधनात उपयुक्त ठरतात. ५) शिलालेखासारख्या साधनांत खाडाखोड शक्य नसते.

प्राथमिक किंवा मूळ साधनांचे वर्गीकरण दोन प्रकारे केले जाते. अ) लिखित साधने

munotes.in

**ब) अलिखित किंवा भौतिक साधने**

**दुय्यम स्त्रोत / साधने** : घटना घडुन गेल्यानंतर त्या घटनेविषयी कुणाला तरी माहिती कळते, कुणाकडून तरी माहिती ऐकली जाते ती नोंदविली जाते. अशा नोंदी, माहीती म्हणजे दुय्यम दर्जाचे साधन होय. दुय्यम स्त्रोत असा आहे ज्यामध्ये प्रत्यक्षदर्शी किंवा सहभागी म्हणजेच ज्या घटनेचे वर्णन करणारे व्यक्ती प्रत्यक्षात उपस्थित नव्हते परंतु ज्याने दुसऱ्या व्यक्तीकडून किंवा स्त्रोतांकडून वर्णन किंवा वर्णन प्राप्त केले.

दुय्यम साधनांचा वापर संशोधक पुढील कारणांसाठी करतो- १) अभ्यास विषयाचे साकल्याने ज्ञान होण्यासाठी व विषयाची प्राथमिक चौकट तयार करण्याची, २) विषयाच्या उपलब्ध माहितीत असलेल्या उणीवांची पूर्तता करण्यासाठी ३) दुय्यम ग्रंथाच्या वाचनामुळे अधिकाधिक संदर्भ मिळण्यास मदत होते ४) विषयाची मांडणी करण्यासाठी.

दुय्यम स्त्रोतांचा, मूळ घटनेचा अभ्यास असण्याशी प्रत्यक्ष संबंध नसतात. मजकूर पुस्तके, चरित्रे, विश्वकोश, संदर्भ पुस्तके इत्यादींचा समावेश आहे. हे शक्य आहे की दुय्यम स्त्रोतांमध्ये एका स्त्रोताकडून दुसऱ्या स्त्रोताकडे माहिती पुरविल्यामुळे त्रुटी येऊ शकतात. अशा प्रकारे, जिथे शक्य असेल तेथे संशोधकाने डेटाचे प्राथमिक स्त्रोत वापरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तथापि, यामुळे दुय्यम स्त्रोतांचे मूल्य कमी होत नाही.

आर्थर मार्विक यांनी म्हटले होते की, " प्राथमिक साधन हा कच्चामाल असून सामान्य वाचकापेक्षा संशोधकाला अधिक मोलाचा असतो. दुय्यम साधन हे मूळ साधनावर आधारलेले असले तरी असे ग्रंथ सुसंगत माहिती देणारे असल्यामुळे बुद्धिमान सामान्य वाचकाला तसेच संशोधकालाही मोलाचे ठरतात. " एखाद्या विषयावर नवे भाष्य, नव्या दृष्टीने स्पष्टीकरण किंवा नवी कारणमीमांसा करणारा ग्रंथ असल्यास दुय्यम साधनांचा उपयोग अधिक प्रमाणात होतो.

प्राथमिक स्त्रोत साहित्य आणि पुरातत्व स्त्रोतांमध्ये विभागले जाऊ शकतात.

## ४.२ प्राथमिक स्त्रोत - लिखित साधने

लिखित साधनामध्ये समकालीन वाङ्मयाचा समावेश होतो. लिखित साधनाचे प्रकाशित अप्रकाशित साधने असे दोन प्रकार पडतात. वाङ्मय अनेक प्रकारचे असू शकते. उदा. धार्मिक, लौकिक, ललित, इतिवृत्ताच्या स्वरूपाचे, प्रवासवर्णने इ. पुराणे, चरित्र, बखरी, काव्य, नाटक, कथा यांचाही समावेश लिखित साधनामध्ये होतो. जेव्हा लेखनासाठी कागद उपलब्ध नव्हता तेव्हा ताडपत्रे, भूर्जपत्रे, शिला, ताम्रपट यांचाही वापर केला जाई.

कागदाचा शोध लागल्यानंतर वाङ्मयीन साधनांची व्याप्ती वाढली. मध्ययुगीन कालखंडात राजाचे आदेश, तहनामे, कैफियती, खाजगी पत्रे, जमा खर्च, धार्मिक सनदा इ.संबंधीची कागदपत्रे तसेच तवारीख नामे, वंशावळी, मोहिमांची टिपणे, शकावल्या, महजर, करीने, पोवाडे, काव्य, ऐतिहासिक म्हणी इबा लिखित साधनात समावेश होतो .

आधुनिक काळात घडलेल्या घटनांच्या चित्रफिती, छायाचित्रे, ध्वनिफिती यांचा पुरावा म्हणून उपयोग केला जातो. सर्वसाधारणपणे अव्वल दर्जाची मानली जाणारी काही समकालीन पूर्णपणे विश्वसनीय असतीलच असे नाही. उदा. आत्मचरित्र हे सामान्यतः अव्वल दर्जाचे मानले जाते परंतु ते स्मृतीच्या आधारे लिहिले गेले असल्यामुळे त्यातील सर्व तपशील सत्य म्हणून स्वीकारणे धोक्याचे ठरते. तसेच वृत्तपत्रांचे आहे, वृत्तपत्रातून

समकालीन घटनाचे वृत्त प्रकाशित होत असले तरी इतर वृत्तपत्रात काही प्रमाणात भेद आढळतो.

भूतकाळातील लोक, घटना आणि दैनंदिन जीवनाबद्दल माहिती घेण्यासाठी, शिकण्यासाठी इतिहासकार पुरावा वापरतात. गुप्तहेरांप्रमाणेच इतिहासकार पुराव्यांकडे पाहतात आणि निष्कर्षापर्यंत पोहोचतात. डायरी, पत्रे, जन्म-मृत्यू किंवा लग्नाची प्रमाणपत्रे, करार, राज्यघटना, कायदे, कोर्टाच्या नोंदी, कर रेकॉर्ड, जनगणनाची नोंद, करार, अहवाल कार्ड, वैद्यकीय नोंदी, प्रवासी याद्या, पासपोर्ट, व्हिसा आणि सैन्य भरती किंवा डिस्चार्ज पेपर्स हे प्राथमिक स्त्रोत मानले जाऊ शकते.

**पत्रे -**

समकालीन पत्रांचा उपयोग प्राथमिक साधन म्हणून केला जातो यामध्ये वैयक्तिक पत्रे खाजगी स्वरूपातील व सरकारी स्वरूपातील असतात. कार्यक्रम, भावना किंवा कथांच्या लोकांमधील पत्रव्यवहाराचा एक प्रकार आहे. पत्रे बहुतेकदा वैयक्तिक स्वरूपाची असतात पण ती अधिक औपचारिक देखील असू शकतात. सरकारी आणि खाजगी पत्रे ही समकालीन घटनांचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी महत्त्वपूर्ण स्त्रोत आहेत.

**आठवणी -**

समकालीन व्यक्तीने लिहिलेल्या आठवणी प्राथमिक साधन म्हणून वापरता येते. मुघल साम्राज्याचे संस्थापक बाबर यांच्या स्मृतींना बाबरनामा हे नाव देण्यात आले आहे. हे बाबरचे स्वरूप आणि व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित करते. तुजुक-ए-जहांगीरी किंवा तुझुक-ए-जहांगीरी हे मुघल सम्राट जहांगीर (१५६९-१६२७) यांचे आत्मचरित्र आहे. तसेच जहांगीरनामा म्हणूनही संबोधले जाते, तुझुक-ए-जहांगीरी पर्शियन भाषेत लिहिलेले आहे. महात्मा गांधींच्या 'सत्याचे माझे प्रयोग' त्यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना आणि बालपणापासूनच गांधींच्या चारित्र्य निर्मितीची माहिती देतात. यांचा उपयोग प्राथमिक साधन म्हणून केला जातो.

**कोर्टाचे लेखन:**

न्यायालयीन कागदपत्रांचा उपयोग ही साधनांसाठी केला जातो. परंतु ही साधने योग्य पद्धतीने तपासून पाहावे लागतात कारण कोर्टातील निकाल आपल्या बाजूने लागावा यासाठी खोट्या साक्षी सुद्धा सादर केलेल्या असतात. ही साधने समकालीन असल्याने महत्त्वपूर्ण असतात. अबुल फजल लिखित ऐन-ए-अकबरीमध्ये सर्व विषयांवरील सर्व विभागांमधील नियम आहेत आणि त्यात काही बाह्य गोष्टींचा समावेश आहे. ऐतिहासिक आणि इतर माहीतीसह त्याच्या साम्राज्याचे हे मौल्यवान आणि बैठकांचे सांख्यिकीय माहीती असणारे साधन आहे. यात मोगल प्रशासन आणि राज्य धोरणांची माहिती देण्यात आली आहे. हे त्यावेळच्या इतिहासाच्या प्रत्येक पैलूचा अंतर्भाव करते. तिसऱ्या खंडात आपल्याला अबुल फजलच्या वंशज आणि चरित्राबद्दल माहिती मिळते.

अब्बास खान सरवाणी यांनी 'तारिक-ए-शेरशाही' लिहिले. ते शेरशहाशी संबंधित होते आणि अकबरच्या कारकिर्दीत ५०० चा मनसबदार म्हणून काम करत होता. हे आत्मकथनाच्या स्वरूपात अधिक आहे. ते मुगल काळातील इंडो-मुस्लिम समाजाचे चित्र देतात. अहमद यादगर तारिक-ए-शाही किंवा तारिक-ए-सलाटिन-ए-अफगीना यांचे लेखक होते. हा भारतातील अफगाण वंशातील शेवटचा राजकुमार होता.

munotes.in

**खाजगी नोंदी**

खाजगी अभिलेखागार विभागाच्या ताब्यात भारतातील सार्वजनिक जीवनाच्या विविध क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या नामांकित व्यक्तींच्या खासगी कागदपत्रांचा समृद्ध संग्रह आहे. हे कागदपत्रे मुख्यत्वे जगभरातील व्यक्ती आणि संस्थांकडून मिळालेल्या देणग्या आणि भेटवस्तूंच्या माध्यमातून मिळविल्या गेल्या आहेत. सार्वजनिक नोंदींमधील माहितीची पूर्तता करण्यासाठी ते एक महत्त्वपूर्ण स्त्रोत आहेत. अभिलेखामधील काही खास खाजगी कागदपत्रे म्हणजे महात्मा गांधी, राजेंद्र प्रसाद, दादाभाई नौरोजी, पी. डी. टंडन, मौलाना आझाद, मिनु मसानी, सरदार पटेल, के. डी. मालवीय इत्यादीचे हे सर्व खासगी कागदपत्रे नियमानुसार व अटींनुसार उपलब्ध आहेत.

**डायरी:**

डायरी एक प्राथमिक स्त्रोत आहे. लंडनमधील ब्रिटीश ग्रंथालयात 'राज दरम्यान प्रत्यक्षदर्शी खाती डायरी आणि संबंधित नोंदी' या ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या डायरींनी समकालीन विषयांवर चांगले पुरावे दिले आहेत. १८५७ विद्रोहाने भारतात विशेषत: उत्तर आणि मध्यभागी ब्रिटिश सत्ता कशा प्रमाणात हालावली हे ते प्रकट करतात. नागरी सेवा, व्हायसरॉय आणि गव्हर्नर्स यांच्यासह ब्रिटनने जटिल सरकारच्या अधिक जटिल रूढीवादी यंत्रणेत ज्या प्रकारे योगदान दिले त्याबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करणे, हे स्त्रोत साहित्य विद्वानांना ही प्रक्रिया कशी प्राप्त झाली आणि किती यशस्वीरित्या अंमलात आणली गेली याचा अभ्यास करण्यास अनुमती, माहिती देते.

**शासन दस्तऐवज:**

भारतातील तुर्को-अफगाण आणि मोगल शासनाच्या इतिहासाशी संबंधित अधिकृत नोंदी आढळल्या आहेत. या कालावधीसाठी ही सर्वात मूल्यवान आणि विश्वासार्ह स्त्रोत सामग्री आहे. परंतु योग्य देखभाल न केल्यामुळे आणि इतर अनेक कारणामुळे त्या नाहीशा झाल्या आहेत. फॅक्टरी रेकॉर्ड्स, जसे की नावावरून हे सूचित होते, पश्चिमेकडील ईस्ट इंडिया कंपनीच्या उत्तरेकडील सिंध ते मलाबार कोस्टवरील टेलिचेरीपर्यंतच्या व्यावसायिक आस्थापनांच्या नोंदी आहेत. फॅक्टरीमध्ये कमर्शियल रेसिडेन्सी, इत्यादींचा समावेश होता. फॅक्टरी आणि रेसिडेन्सी रेकॉर्ड्स मुख्यत: कंपनीच्या व्यवसायाचे व्यवहार नोंदवतात, परंतु योगायोगाने देशातील राजकीय घटनांचा संदर्भ घेतात. भारतीय राज्यघटना ही सरकारच्या कागदपत्रांचे उत्तम उदाहरण आहे.

**वृत्तपत्र लेख:**

वर्तमानपत्रे किंवा मासिके स्थानिक, प्रादेशिक किंवा राष्ट्रीय प्रचलित असू शकतात, म्हणून वर्तमानपत्रातील लेख किती वाचकांपर्यंत पोहोचला असेल आणि लेखात दिलेल्या माहितीसाठी संपादकांचा हेतू कोणता होता हे लक्षात ठेवणे महत्वाचे आहे. वर्तमानपत्राचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, प्रबोधनात्मक, राजकीय परिणाम कसा झाला याचाही उपयोग होतो.

**ऐतिहासिक कुटुंबांची नोंद आणि खासगी कागदपत्रे:**

महाराष्ट्र राज्य अभिलेखागार साहित्याने, कागदपत्राने समृद्ध आहे. पुष्कळ ऐतिहासिक कुटूंबात त्यांच्या पूर्वजांच्या वेळीचे वर्णन करणारे विपुल कागदपत्रे आहेत. कौटुंबिक आख्यायिका, शाही कारकीर्द, सार्वजनिक व खाजगी पत्रव्यवहार आणि कायदा, दावे आणि कायदेविषयक निर्णय, लेखाची कागदपत्रे आणि पर्शियन भाषेतील व मोडी लिपीतील प्रत्येक वर्णनाची हस्तलिखिते या सर्वांच्या ताब्यात असलेल्या लोकांच्या ताब्यात असलेले राज्य

कागदपत्रे अज्ञात घटना असतात. ते जतन करून ठेवलेले असते. ते संशोधक आणि विद्यार्थ्यांना संशोधनासाठी उपलब्ध आहेत.

**मुलाखत:**

एखाद्या घटनेबद्दल किंवा त्या व्यक्तीच्या आयुष्याविषयी आणि निर्णयाबद्दल अधिक माहिती मिळविण्यासाठी एखाद्याची मुलाखत घेतली जाते. मुलाखती एका नंतर एक घेतल्या जाऊ शकतात किंवा त्या पत्रकार परिषद स्वरूपात घेता येतील. ऑडिओ स्वरूपात लेखी रेकॉर्ड तयार करण्यासाठी मुलाखत रेकॉर्ड केली जाऊ शकते आणि नंतर लिप्यंतरण केले जाऊ शकते.

**प्रश्नावली:**

प्रश्नावली हे एक संशोधन साधन आहे जे प्रतिसादकर्त्यांकडून माहिती एकत्रित करण्याच्या उद्देशाने प्रश्नांच्या मालिकेचा समावेश करते. प्रश्नावलीमध्ये प्रश्नांचा एक संच असतो. साधारणपणे डेटा गोळा करण्याच्या प्रतिसादकांना हे मेल किंवा पोष्टाने पाठवले जाते. जेव्हा अभ्यासाचे क्षेत्र विस्तृत असेल आणि विषय व्यापक असेल तेव्हा हे काम केले जाते. या पद्धतीत संशोधक स्वत:हून प्रत्यक्ष पद्धतीने माहीती गोळा करत नाही.

**नकाशे आणि फोटो प्रती:**

बॉम्बे प्रेसिडेन्सी व इतर प्रांतांशी संबंधित सुमारे २०,००० जुने नकाशे आहेत. १८२० पासून या प्रांतात सर्व्हे ऑपरेशन जोरदारपणे सुरू झाले होते. बॉम्बे प्रेसिडेन्सी, आसपासच्या भागातील आणि मुंबई बेटाच्या जिल्ह्यांच्या त्या काळापासून आजपर्यंत तयार केलेल्या नकाशांच्या प्रती या संग्रहात सापडल्या आहेत. बहुतेक नकाशे भारतीय सर्वेक्षण संस्थेने तयार केले आहेत. भारतातील रेल्वे सुरू झाल्यापासून भारतीय रेल्वे लाईन्सच्या योजना या संग्रहात जोडल्या गेल्या आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. १. विविध प्राथमिक साधानांची माहिती द्या

---------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------

## ४.३ पुरातत्वीय साधने / अलिखित किंवा भौतिक साधने

भौतिक साधनांना अलिखित किंवा वस्तुरूप साधने म्हटले जाते. भौतिक साधन म्हणजे अशी साधने की आजही आपण तत्कालीन घटनांची साक्ष म्हणून हाताळू शकतो किंवा पाहू शकतो. यातील बहुतांश साधने घटना स्थळाच्या जागेवर असतात. त्यामुळे लिखित किंवा वाङ्मयीन साधनांच्या तुलनेत अधिक विश्वसनीय असतात. भौतिक साधनांना **पुरातत्वीय साधने** म्हणूनही ओळखले जाते. ही साधने म्हणजे गतकालीन वाटचालीचा तो प्रत्यक्षदर्शी पुरावा असतो. इतिहासपूर्व व प्रागैतिहासिक काळातील वाटचाल रेखाटण्यासाठी पुरातत्त्वीय साधनेच उपयुक्त ठरतात. सर्वसामान्य समाजाचे चित्र स्पष्ट होण्यासाठी पुरातत्वीय साधनांचा उपयोग मोठ्या प्रमाणात होतो. ही साधने उत्खननात किंवा जमिनीवर, नदीच्या काठी आढळतात. भौतिक साधनांना सामान्यपणे स्मारके, अभिलेख, नाणी, अवशेष, उत्खनने या प्रकारात विभागले जाते. वस्तुरूप साधनात मानवी अथवा प्राण्यांचे अस्थी,

munotes.in

अवशेष, मातीची भांडी, खापरे, दैनंदिन वापराच्या वस्तू, नाणी, शिलालेख - ताम्रपट, शिल्पावशेष, स्थापत्य अवशेष, अन्य कलावशेष इ.चा समावेश होतो. या साधनांचा इतिहास लेखनात कसा उपयोग होतो ते आपण पाहू या.

**स्मारके:**

या स्मारकांमध्ये मंदिरे, स्तूप, मठ (विहार), राजवाडे, किल्ले इत्यादींचा समावेश आहे. वैयक्तिक स्मारकांव्यतिरिक्त प्राचीन शहरेही विपुल आहेत. मोहेंजोदारो आणि हडप्पा शहरांमध्ये या प्रकारचे स्त्रोत दिसून येतात. साहित्यिक नोंदी नसतानाही स्मारक इतिहास लेखनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. प्राचीन राजवंशांसारख्या कुशाण आणि सातवाहन यांची माहिती या ठिकाणी उत्खनन करून आणि उत्खनन केलेल्या ऐतिहासिक ठिकाणी सापडलेल्या स्मारकांचा अभ्यास करून गोळा केली जाऊ शकते.

स्मारके आणि त्यांचे अवशेष याशिवाय शिल्प, पेंटिंग्ज, कुंभारकाम आणि इतर कलाकृती आपल्याला प्राचीन भारताचा इतिहास आणि संस्कृतीची पुनर्रचना करण्यात मदत करतात. अजिंठाच्या गुंफावरील चित्रे, सांची, भारूत इत्यादीतील बौद्ध स्तूपांवरील प्राण्यांच्या शिल्पे, बुद्धांच्या जीवनातील दृश्ये दर्शवितात आणि जातक कथा दर्शवितात. पल्लव, चोल, चालुक्य आणि पांड्य काळातील दक्षिण भारतीय मंदिरे शिल्पांनी भरलेली आहेत, जी आपल्याला प्राचीन भारतीय शिल्पकार आणि कलाकारांच्या कलात्मक कामगिरी समजून घेण्यात मदत करतात. प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक भारताचा इतिहास आणि संस्कृतीची पुनर्रचना करण्यात आपल्याला विविध प्रकारची कलाकृती मदत करतात.

**पेंटिंग्ज:**

गुजरात आणि माळवासारख्या काही प्रदेशांव्यतिरिक्त सुलतानांच्या काळात अनेक सचित्र हस्तलिखिते नव्हती. लघु चित्रकलेची पर्शियन प्रथा प्रथम या प्रादेशिक राज्यकर्त्यांनी सुरू केली होती. जेथे गुजरात व माळवा सारखे प्रदेशातील भारत विविध भागांमध्ये विशेषत: ऑर्थोडॉक्स धार्मिक नेत्यांचा आक्षेप, चित्रकला इस्लामिक मानणाऱ्या, मोगल सम्राटांनी या कलेचे रक्षण केले. चित्रकारांनी युद्ध, शिकार आणि इतर सार्वजनिक उपक्रमांसारख्या नेहमीच्या दृश्यांचे वर्णन करण्याबरोबरच पोर्ट्रेट पेंटिंग्जमध्येही विशेषता आणण्यास सुरुवात केली. राजस्थानात हिंदू पौराणिक शीर्षक वापरुन अशीच पेंटिंगची शैली विकसित केली गेली.

**नाणी:**

नाणीं या वरील पौराणिक कथा आणि पुतळे इतिहासाला त्या काळातील धार्मिक इतिहासाची पुनर्रचना करण्यास मदत करतात. शक, पहलव आणि कुशाण या परदेशी आक्रमणकर्त्यांचे हळूहळू भारतीयकरण त्यांच्या नाण्यांवरून समजू शकते. या परकीय आक्रमणकर्त्यांनी हिंदू किंवा बौद्ध असे भारतीय धर्म स्वीकारले आणि भारतीय नावेही स्वीकारली. नाणी आपल्याला पुरातन भारतातील प्रजासत्ताक आणि राजेशाही सरकारबद्दल बरीच माहिती पुरवतात. बहुतेक प्राचीन राज्यांची नाणी होती. त्या नाण्यांवर दंतकथा कोरलेली होती. नाणींवरील आख्यायिका इतिहासकारांना त्या काळातील धार्मिक इतिहासाची पुनर्रचना करण्यास मदत करते.

**शिलालेख**

एखाद्या प्रदेशाचा इतिहास लिहिण्यासाठी किंवा पुनर्रचना करण्यास पुरातत्व स्त्रोतांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. पुरातत्व स्त्रोताने आपल्या भूतकाळाबद्दल महत्त्वाची सामग्री



munotes.in

पुरविली, जी आपल्याला अन्यथा मिळू शकली नाही. इपिग्राफी आणि न्यूमिसमॅटिक्स ही इतिहासाच्या अभ्यासाची महत्त्वाची शाखा आहे, ज्याने भारताच्या भूतकाळाची समज वाढविली आहे. प्राचीन भारताच्या राजकीय इतिहासाच्या पुनर्बांधणीसाठी शिलालेख खूप मोलाचे आहेत. दगड किंवा धातूंवर कोरलेली ही शिलालेख प्रामाणिक आहेत कारण ते छेडछाड करण्यापासून मुक्त आहेत. शिलालेखांमध्ये विविध विषय आहेत. त्यामध्ये धार्मिक बाबी, राज्यकर्त्यांचे हुकूम, विजयाच्या नोंदी, व्यक्ती किंवा धार्मिक संस्था यांना विविध शासकांनी जमीन विकणे किंवा जमीन दान, कर्तृत्वाचे वर्णन इ. बाबी आहेत.

**अभिलेखीय कागदपत्रे:**

मुंबई आर्काइव्हजमध्ये खंड आणि पुस्तकांच्या रूपात छापील रेकॉर्डची चांगली संख्या आहे. जुन्या प्रकाशनांमध्ये छापील ॲब्स्ट्रॅक्ट ऑफ प्रोसिडींग्ज, शासकीय राजपत्रे, विविध विभागांचे अहवाल, कार्यालये, आयोग आणि समित्या, अधिनियम, नियम व शासनाने जारी केलेले आदेश, नागरी याद्या व वेळोवेळी प्रसिद्ध केलेली असंख्य सरकारी प्रकाशने यांचा समावेश आहे. राज्य सरकारच्या प्रत्येक प्रकाशनाच्या तीन प्रती मुंबई अभिलेखागारात संवर्धनासाठी पाठविल्या जातात. सार्वजनिक नोंदी आणि खाजगी पेपर्सच्या मोठ्या प्रमाणाव्यतिरिक्त, राष्ट्रीय अभिलेखागारात ग्रंथालयाचा समृद्ध आणि वाढणारा संग्रह आहे. यात समकालीन प्रकाशित सामग्रीव्यतिरिक्त विविध विषयांवरची काही जुनी आणि दुर्मिळ प्रकाशने आहेत.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. १. प्राथमिक पुरातत्वीय साधने व आलेखन साधानांचे वर्णन करा

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

## ४.४ दुय्यम वाङ्मयीन स्त्रोत

प्राचीन भारतीय इतिहासाची पुनर्रचना करण्यासाठी वाङ्मयीन स्त्रोतांचे दोन व्यापक प्रकारात वर्गीकरण केले जाऊ शकते १) धार्मिक साहित्य आणि २) धर्मनिरपेक्ष साहित्य.

इतिहासाच्या साधनांचे वर्गीकरण करण्याच्या दृष्टीने प्राथमिक व दुय्यम असे दोन मुख्य प्रकार साधनांचे करण्यात आले आहेत. यामध्ये प्राथमिक म्हणजे अधिक दर्जेदार व ' दुय्यम ' म्हणजे कमी दर्जाचे अथवा कमी महत्त्वाची साधने असे नव्हे. इतिहास लेखनाच्या दृष्टिकोनातून प्राथमिक साधनांइतकेच दुय्यम साधनासही महत्त्व आहे. दुय्यम साधनांना 'दुय्यम' म्हणण्याचे कारण म्हणजे यामध्ये प्रत्यक्षदर्शी कोणीही नसले तरी ज्यांनी घटना पाहिलेली आहे त्याने काही काळाने ती दुसऱ्याला सांगितली आहे व त्यांनी ती लगेचच लिहून काढली आहे. घटना घडून गेल्यानंतर बराच काळ उलटून गेल्यावर स्मृतीच्या आधारे लिखाण केल्यास त्यात चुका होण्याची शक्यता बरीच असते. एखाद्या व्यक्तीची स्मरणशक्ती कितीही चांगली असली तरी केवळ ऐकीव माहितीच्या आधारे केलेल्या लिखाणात ती पूर्णपणे सत्य येण्याची शक्यता कमीच असते. यामुळे अशा साधनांना दुय्यम म्हणतात. खरे म्हणजे प्राथमिक साधनांवरच दुय्यम साधने अवलंबून असतात, त्यामुळे दर्जाच्या दृष्टिकोनातून ती दुय्यम ठरत असली तरी कधी कधी त्याचीही विश्वासार्हता

प्राथमिक साधनांएवढीच असते. घटना घडून गेल्यानंतरच्या माहितीवर दुय्यम साधने अवलंबून असतात. मूळ साधनांच्या आधारे लिहिण्यात येणारे संशोधनपर ग्रंथ, बखरी, शकावल्या, पोवाडे, करीने इत्यादींना दुय्यम साधने म्हटले जाते. या साधनांना दुय्यम साधने म्हणण्याची प्रमुख तीन कारणे आहेत. १) अशा साधनांमधून संबंधित लेखकाचे स्वतःचे मत डोकावण्याची शक्यता असते. २) इतिहासकार मूळ साधनांचा अर्थ आपल्या मतानुसार वा विचारसरणीनुसार लावण्याची शक्यता असते आणि ३) इ.एच. कार यांच्या म्हणण्यानुसार, 'घटिते स्वतः बोलत नाहीत, तर त्यांना बोलते करणारा इतिहासकार असतो.' या प्रमुख कारणांमुळे अशा साधनांना दुय्यमत्व प्राप्त होते. उदा. कालिदासाचे 'मालविकाग्निमित्र' हे नाटक घटना घडून गेल्यानंतर साधारणतः सहा शतकांनी लिहिलेले आहे. असे असले तरी, दुय्यम साधने सामान्य अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वाची असतात कारण दुय्यम साधनांचे स्वरूप हे तुलनात्मक दृष्टिकोनातून कमी विश्वासार्ह असले तरी त्यामध्ये घटनांची सविस्तर माहिती दिलेली असते. प्राथमिक साधनांची विश्वासार्हता पडताळून पाहण्यासाठीही दुय्यम साधनांचा उपयोग केला जातो. दर्जाच्या दृष्टीने साधनांना दुय्यम संबोधले जात असले तरी कधी कधी या साधनांची विश्वासार्हता प्राथमिक साधनांएवढीच असते. सामान्य वाचकांना असे दुय्यम ग्रंथ मूळ साधनांपेक्षा अधिक उपयुक्त वाटतात.

**वंशावळी:**

मध्ययुगीन काळात नामांकित व्यक्तींच्या कुटूंबाची वंशावळ तयार करण्याची परंपरा होती. अशा वंशावळीत शौर्य, सैन्य मोहीम किंवा कुटुंबातील वेगवेगळ्या सदस्यांच्या इतर कृत्यांचा उल्लेख असत. अशी माहिती सामान्यत: अधिकृत नोंदींवर आधारित असते आणि म्हणूनच इतिहासाचे स्त्रोत म्हणून उपयुक्त आहे.

**पोवाडे आणि कविता:**

पोवाडा हा एक प्रकारचा नृत्य आहे जो एका रोमांचक शैलीने लिहिलेला आहे आणि ऐतिहासिक घटना प्रेरणादायक मार्गाने वर्णन करतो. पोवाड्याचे संगीतकार आणि गायक शाहीर म्हणून ओळखले जातात. प्रारंभीचे पोवाडे मुख्यत: या बॅलडमध्ये साजरे केलेल्या महान कार्यक्रमांच्या प्रत्यक्षदर्शींनी बनविला आहे. सर्वात अगोदरचा उल्लेखनीय पोवाडा म्हणजे अफझल खानचा वध (द किलिंग ऑफ अफझल खान) (१६५९) आग्निदास याने बनविला. ज्याने छत्रपती शिवाजीची महाराज यांची अफजलखानशी झालेल्या चकमकीची नोंद केली. त्यानंतरचा उल्लेखनीय पोवाडा म्हणजे तुलसीदास यांचा *तानाजी मालुसरे*, ज्यामध्ये तानाजींनी सिंहगड किल्ला ताब्यात घेतला याचा अहवाल दिला आहे .

**चरित्र :**

प्राचीन भारतीयांमधील काही लेखकांनी त्यांच्या साहित्यिक कृतींचा विषय म्हणून आपल्या शाही संरक्षकांचे जीवन स्वीकारले. धर्मनिरपेक्ष साहित्याच्या या श्रेणीमध्ये गौतम बुद्धांच्या जीवनाची आणि शिकवणुकीचा लेखाजोखा देणारी अश्वघोषाने लिहिलेल्या बुद्धचरिताचा समावेश आहे. संस्कृत गद्यातील श्रेष्ठ गुरु बानभट्ट यांनी हर्षचरित लिहिले. सल्तनत काळात फिरोजशाह तुघलक यांनी फतुहात-ए-फिरोज शाही हे त्यांचे चरित्र लिहिले. सुलतान महमूद आणि तैमूर यांची स्वतःची चरित्रे होती. आणि चांद बारदोई त्यांच्या 'पृथ्वीराज रासो' या गीतात्मक गाण्यामुळे प्रसिद्ध झाले. मुघल भारतातील सर्वात महत्वाच्या आठवणी आणि चरित्रे म्हणजे बाबर आणि जहांगीर यांच्या स्मृती आणि गुलबदन बेगम यांचे हुमायूंचे चरित्र रेखाटन होय.

**वर्णनात्मक लेखन:**

**तारीख-ए-हिंद :- (अल-बेरुनी)** अल-बेरुनी भारतात येऊन गझनीच्या महमूदच्या अधीन राहिले. ते अरबी, पर्शियन भाषेत चांगले परिचित होते आणि औषध, तर्कशास्त्र, गणित, तत्वज्ञान, ब्रह्मज्ञान आणि धर्मशास्त्रात त्यांची उत्कृष्ट बुद्धिमत्ता होती. भारतात वास्तव्याच्या वेळी त्यांनी संस्कृत भाषा शिकले आणि हिंदू धर्म आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. त्यांनी दोन संस्कृत ग्रंथाचे अरबी भाषेत भाषांतरही केले. त्याच्या सर्वात महत्त्वाचे साहित्य योगदान म्हणजे तारिख-उल-हिंद होय. महान अचूकता आणि विद्वत्तापूर्ण सादरीकरण उत्कृष्ट अरबी लिहिले जात. ११व्या शतकात हिंदू साहित्य, विज्ञान आणि धर्म खाते यावर लेखन केले. गझनीच्या भारत हल्ल्याच्या महमूदच्या वेळीचा या पुस्तकात भारताचा लेखाजोखा देण्यात आला आहे.

**इतर लेखन -**

सल्तनत आणि मोगल काळाविषयी बऱ्याच प्रमाणात लेखन आहे. मिन्हज-उस-सिराजचा "तबाकत-ए-नसिरी" हा एक महत्त्वाचा समकालीन स्त्रोत आहे. जो महंमद घोरीच्या विजयाचा आणि १२६० पर्यंत मिंज-उस-सिराज पर्यंतचा भारतातील तुर्की साम्राज्याचा इतिहासाचा माहिती देणारा महत्त्वपूर्ण समकालीन स्त्रोत आहे. सुलतान नासिर-उद-दीन महमूद यांचे नेतृत्व तेव्हा होते. " तारिख-ए-अलई किंवा खजैन-उल-फुतुह" पर्शियन भाषेत अमीर खुस्राने लिहिले होते. दिल्लीच्या कैकुबाद, जलाल-उद्दीन खिलजी, अलाउद्दीन खिलजी अशा अनेक सुलतानांच्या संरक्षणाचा त्यांना फायदा झाला. कुतुब-उदिन मुबारक शाह खिलजी आणि घियास-उद्दीन तुगलक. अमीर खुसरो हे गद्य आणि कवितांचे प्रख्यात लेखक होते. १२९० मध्ये ते कवी पुरस्कार विजेते होते. खजैन-उल-फुतुह हे तारिख-ए-अलई म्हणून ओळखले जात. हा अलाउद्दीन खिलजीच्या कारकिर्दीच्या पहिल्या सोळा वर्षांचा दरबार आहे. यामध्ये मलिक काफूर डेक्कन मोहिमेचा तपशील देण्यात आला आहे की, जलालउद्दीनची हत्या किंवा मंगोल लोकांनी सुलतानच्या पराभवाचा उल्लेख केला नाही. अमीर खुसरौ यांच्या नावावर इतरही अनेक लेखन आहे. यामध्ये १२९१ मध्ये लिहिलेल्या "मिफ्ताह-उल-फुतुह" जलालउद्दीन खिलजीच्या सैन्य मोहिमेचे वर्णन आहे तुघलकनामा यामध्ये घियासुद्दीन तुघलकच्या राज्यारोहनासंदर्भातील घटनांचा मार्ग सापडतो.

तारिख-ए-फिरोजशाही जियाउद्दीन बरनी यांनी लिहिली होती. तारिख-ए-फिरोजशाही १३५८ च्या सुमारास लिहिले गेले होते. त्यात आपल्याला बलबनपासून मुहम्मद-बिन तुगलक आणि दिल्ली फिरोजशहाच्या कारकिर्दीच्या पहिल्या सहा वर्षांच्या दिल्लीच्या सुलतानांबद्दल माहिती देण्यात आली आहे. तारखांविषयी तो फारसा अचूक नव्हता. त्यांनी घटनांच्या कालक्रमानुसार वर्णन केले नाही. झिया-उद्दीन बरनी यांनी लिहिलेले फतवा-ए-जहांदारी १४ व्या शतकाच्या सुरूवातीस रचले गेले होते. सरकारच्या धोरणांवर आणि मुस्लिम राजाने पाळली पाहिजे अशी आदर्श आचारसंहिता यावर बरनी यांनी आपले विचार लिहिले होते .

शम-ए-सिराज आफिफ यांनी लिहिलेले तारिख-ए-फिरोज शाही बहुधा पंधराव्या शतकाच्या पहिल्या दशकात रचले गेले होते. लेखक सुलतान फिरोजशहा यांचे आवडते होते. त्यांनी सुलतानाच्या दीर्घ कारकिर्दीचा इतिहास वर्णन केला आहे. या काळातील संस्कृतीबद्दलही त्यांनी लिहिले आहे. सुलतान फिरोज तुघलक यांच्या इतिहासासाठी त्याच्या लेखाला खूप महत्त्व आहे.

अब्दुल कादिर बदायूनी यांनी मुन्ताख-उल-तवारीख किंवा तारिक-ए-बदायूनी लिहिले होते. पहिला खंड बाबर आणि हुमायूंच्या कारभाराबद्दल आहे. मुंतखब-उल-लुबाब हा ग्रंथ मुहम्मद हाशिम उर्फ खाफी खान यांनी लिहिले होते. इतिहासाच्या लेखनावर बंदी असल्याने खाफी खानने ते गुप्तपणे लिहिले. बाबरच्या कारकिर्दीपासून इ. स. १७३३ पर्यंतच्या मोगलांचा प्रारंभ होण्याचा हा संपूर्ण इतिहास आहे. औरंगजेबाच्या कारभाराच्या सर्व बाबींचा त्यांनी पाहिल्या होत्या.

**नियतकालिके आणि वर्तमानपत्रे**

समकालीन नियतकालिके आणि वर्तमानपत्र आपल्याला सामाजिक, राजकीय स्थितीबद्दल विविध प्रकारची माहिती देतात. बॉम्बे क्रॉनिकल (१८२५ ते १९५९)), बॉम्बे कुरियर (१७९७ ते १८४६), बॉम्बे टेलिग्राफ आणि कुरियर (१८४७ ते१८६१), बॉम्बे टाईम्स ( १८३८ ते१८५९), बॉम्बे गॅझेट (१८०९ ते १९१४), बॉम्बे दर्पण (मराठी) ( १८३२ आणि १८३४), मराठा (१९१३ ते १९२५), पूना ऑब्झर्व्हर (१८५२ - ५३, १८६१-६२, १८७६-१९१५)), केसरी (मराठी) (१९०० ते १९३१, १९६२ ते१९७३), नवजीवन (१९१९ ते १९३२), यंग इंडिया ( १९१५ ते १९३२), इंडियन एक्सप्रेस (१९५५ ते डिसेंबर २००८), ब्लिट्ज (१९५७ ते १९६४), फायनान्शियल एक्सप्रेस (१९६१ ते १९६४) लंडन टाइम्स, टाईम्स ऑफ इंडिया (१८६१ अप-टू-डेट), महाराष्ट्र टाइम्स (मराठी) ( १९६२ अप-टू-डेट), लोकसत्ता (मराठी) ( १९६० ते डिसेंबर २००८), सकाळ (मराठी) (१९६५ ते१९६८) आणि बऱ्याच समकालीन नियतकालिक जसे एशियाटिक जर्नल एशियाटिक जर्नल न्यू सिरीज, बंगाल ऑबिचुअरी (कलकत्ता, १८४८) बंगाल आणि आग्रा प्रेसीडेंसीच्या विविध भागांमधून स्मारकांच्या शिलालेखांचे संकलन. १८ व्या शतकापासून ते १८४८ च्या सुरुवातीच्या काळातील ब्रिटिश भारतातील नामवंत व्यक्तींच्या चरित्रात्मक स्केच आणि स्मृतींचा देखील यात समावेश आहे.

**जनगणना अहवाल**

जनगणना अहवाल ( १८७१ नंतर) लोकसंख्याशास्त्रीय अभ्यासाचे एक मौल्यवान आणि मूलभूत स्त्रोत आहेत आणि त्यात लोकसंख्या, जाती, जमाती, व्यवसाय इत्यादींचा अभ्यासक आणि इतर वापरकर्त्यांच्या वापरासाठी माहीती (डेटा) आहे.

**आपली प्रगती तपासा :**

प्र. १. इतिहासतील दुय्यम साधानांवर भाष्य करा

---------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------------

## ४.५ मौखिक साधने (स्त्रोत)

मौखिक इतिहास म्हणजे त्यांच्या स्वत: च्या शब्दातले अकाउंट्स आणि पूर्वीचे स्पष्टीकरण संग्रह. एखाद्या व्यक्तीच्या थेट भावना किंवा ती ज्या घटनांमध्ये सहभागी होती त्याबद्दल मते नोंदवतात. मौखिक इतिहास अशा महत्त्वपूर्ण घटनांबद्दल माहिती प्रदान करते ज्यात अन्यत्र लेखी किंवा संग्रह अभिलेखांमध्ये कागदपत्रांची कमतरता असू शकते. मौखिक इतिहासाची साधने मुलाखतींद्वारे प्राप्त केल्या जातात आणि ऑडिओ आणि व्हिडिओ रेकॉर्डिंगवर,

munotes.in

चित्रपटांमध्ये आणि लेखी उताऱ्यामध्ये जतन केल्या जातात. मौखिक इतिहासाचा प्राथमिक स्त्रोत म्हणून उपयोग होतो. स्त्रोत सामग्री म्हणून त्यांचे कोणते फायदे आहेत. बऱ्याच वेळा मौखिक इतिहासात अशा व्यक्तींचे अनुभव नोंदवले जातात जे अशक्य आहेत किंवा ज्यांना वेळ नव्हता त्यांची लेखी खाती, कागदपत्रे नाहीत. मुलाखतदाराचे प्रश्न सहसा उत्स्फूर्तता आणि प्रेमळपणा तयार करतात जे कदाचित वैयक्तिकरित्या लिहिलेल्या खात्यात नसतील. शिवाय, रेकॉर्ड केलेल्या मुलाखतीत, माहिती देणाऱ्याचा आवाज इतर अद्वितीय स्त्रोत मध्ये पकडला जाऊ शकत नाही अशा अद्वितीय भाषणाची वैशिष्ट्ये आणि टोन प्रकट करू शकतो. मौखिक इतिहास त्याच्या विश्लेषणामधील आव्हाने सादर करतो. माहिती देणाऱ्याच्या माहितीची विश्वासार्हता प्रश्न असू शकते. चुकीच्या किंवा अपूर्ण रेकॉर्डचा परिणाम म्हणून काही विषयांवर माहिती देण्यास माहिती देणारे कदाचित टाळाटाळ करतात. सर्व स्त्रोतांप्रमाणेच, मौखिक इतिहासाचे मूल्यमापन इतर दस्तऐवजीकरणासह करणे आवश्यक आहे की ते अपवादात्मक किंवा पूर्वी स्थापित असलेल्या अनुरुप माहिती सादर करतात की नाही, वंचितवादी इतिहासी, आदिवासी समुदायाचे इतिहास संशोधनपर लेखन करण्यासाठी मौखिक साधनाचे अनन्य साधारण महत्व महत्त्व आहे.

## ४.६ डिजिटल स्रोत

डिजिटलायझेशनमुळे ग्रंथालये, अभिलेखागार, ऐतिहासिक संस्था, संग्रहालये आणि व्यक्तींनी त्यांचे संग्रह जगाबरोबर सहजपणे सामायिक (share) करणे शक्य केले आहे. आज संशोधकांकडे वर्णनात्मक डेटा असलेल्या प्राथमिक स्त्रोत सामग्रीच्या प्रतिमांवर अभूतपूर्व प्रवेश आहे, जो प्री-डिजिटल युगात केवळ अशाच लोकांसाठी उपलब्ध होता ज्यांना वैयक्तिकरित्या एखाद्या संग्रहात भेट दिली जाऊ शकते.

१) **इंटरनेट संग्रहणे (Archives)**

वेब संग्रहण **(Archives)** सामाजिक वैज्ञानिक आणि डिजिटल मानव्यविदया अभ्यासकांना डेटा स्रोत प्रदान करते. जे ऐतिहासिक घटनेच्या संपत्तीचा अभ्यास सक्षम करते. वर्ल्ड वाइड वेबचा इतिहास रेकॉर्ड करण्याचा सर्वात उल्लेखनीय प्रयत्नांपैकी एक म्हणजे इंटरनेट आर्काइव्ह (आयए) प्रकल्प, जो जगातील संग्रहित डेटाचा सर्वात मोठा रेपॉजिटरी ठेवतो. संग्रहित डेटाची गुणवत्ता आणि एकाच वेबसाइटच्या प्रत्येक रेकॉर्डची पूर्णता समजून घेणे ही अभ्यासू संशोधनासाठी केंद्रीय समस्या आहे आणि अद्याप डिजिटल आर्काइव्हजच्या शोधाची कोणतीही मानक नोंद नाही. खरं तर, आजकालच्या नोंदी अगदी अचूक असल्या तरी, वेळोवेळी संग्रहित केल्यामुळे संग्रहित वेब सामग्री खराब होते. वेब आर्काइव्ह्ज फॉर हिस्टोरिकल रिसर्च (डब्ल्यूएएचआर) गटाचे इतिहास आणि वेब डेटा संग्रहातून डिजिटल स्रोत शोधण्यासाठी आणि स्पष्टीकरण देण्यासाठी इतिहासकारांना आवश्यक साधने प्रदान करण्यासाठी मोठा डेटा जोडण्याचे उद्दीष्ट आहे. आमचे संशोधन दोन्ही वेब इतिहासावर लक्ष केंद्रित करते - वेब अभिलेखामध्ये प्रतिबिंबित केलेल्या अलीकडील काळाबद्दल लिहितो - तसेच या रेपॉजिटरीज समजून घेण्यासाठी पद्धतीनुसार दृष्टिकोन असतो.

munotes.in

२) **शब्द भंडार**

जगभरात १०,००० ग्रंथालयांमधून पुस्तके, डीव्हीडी, सीडी आणि लेखांसह माहीती भेटते. आपणास वर्ल्डकेसच्या साधनांसह सर्वात जवळचे ग्रंथालय देखील सापडेल.

३) **गूगल बुक्स**

इतिहास ही शास्त्रीय पद्धतीने कार्य करणारी ज्ञानशाखा आहे. शास्त्रांप्रमाणे सत्याचा शोध हे इतिहासाचे अंतिम उद्दिष्ट आहे. आणि सत्याचा शोध घेण्यास प्रवृत्त करणारी जिज्ञासा मानवी जीवनात गतकाळात काय काय घडले ते शोधून काढण्याची इच्छा माणसात जागृत करते. मात्र ऐतिहासिक माहिती गोळा करून त्या आधारे पूर्वी काय घडले, कशा प्रकारे घडले एवढेच निवेदन करून चांगला इतिहास निर्माण होत नाही, तर जिज्ञासापूर्तीसाठी ते का घडले याचे स्पष्टीकरण आवश्यक असते आणि असे इतिहासलेखन अर्थपूर्ण ठरते. म्हणजेच इतिहासलेखकाला प्रत्येक कृतीमागील, घटनेमागील कारणांचा शोध घेणे अगत्याचे असते. यालाच घटनांची कारणमीमांसा किंवा स्पष्टीकरण म्हणावयाचे. यासाठी इंग्रजीत **Causation** किंवा **Explanation** असे शब्द वापरतात.

## ८.२ कारणमीमांसेचा अर्थ व स्पष्टीकरण

भौतिक पातळीवर विचार करता येत नाही आपल्याला प्रत्येक घटनेमागे काही ना काही तरी कारण असते. ते कारण लक्षात घेणे म्हणजे धरणा समजून घेणे होय. म्हणूनच इतिहासाचा अभ्यास म्हणजे कारणांचाच अभ्यास होय. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळात सुद्धा



munotes.in

इतिहासकार गतकालीन घटणांचे केवळ वर्णन करीत नाही तर त्या घटना कशा व का घडल्या? याचा ही शोध घेतो. या 'का' चा शोध घेणे म्हणजेच घटनेमागील कारण मीमांसा शोधून काढणे होय. इतिहासाचे जनक हेरोडोट्स् यांनी प्राचीन काळात केवळ ग्रीकांच्या युद्धाचे वर्णन केले नाही तर त्या युद्धामागील कारणांचा शोध घेऊन त्याचे विश्लेषण केले.

तत्त्वचिंतनाच्या पातळीवर जीवनानुभूतीचा अर्थ समजावून घेताना प्राचीन काळातील तत्त्वने त्यांनी कार्यकारण भावाचा यात विचार केला होता. उदा. 'माँटेस्क्यूने स्पिरिट ऑफ लॉज' या ग्रंथात कारणमिमांसा परंपरेचा मुद्दा स्पष्टपणे सांगितला. या जगात कारणाशिवाय काहीच घडत नाही.

प्रत्येक घटनेमागे निश्चित असे कारण असते. त्या कारणांचा शोध घटनेचे विश्लेषण करण्यासाठी द्यावाच लागतो, आणि तो शोध अगदी शास्त्रीय पद्धतीचाच असतो, असे इतिहासाकार ई.एच कार स्पष्टपणे सिद्ध करतात.

कारण मीमांसेचे स्पष्टीकरण:

कारणमीमांसा स्पष्ट अशी करता येईल या प्रश्नाचे उत्तर शोधतांना गतकाळातील घटनांचे केवळ वर्णन करून भूतकाळाचे आकलन होणे शक्य नसते तर भूतकाळ समजावून द्यायचा असेल तर घटना का घडली? गतकाळातील एखादा प्रसंग असाच त्या विशिष्ट वेळीच, त्या विशिष्ट ठिकाणीच का घडला? अशा प्रश्नांचा शोध घेणे आवश्यक ठरते. या कार्यकारण परंपरेचा शोध भूतकाळाचे आकलन करण्यास उपयुक्त ठरतो. या दृष्टीने प्रो. रेनीयर यांनी कार्यकारण भाव हे इतिहासकाराच्या हातातील महत्त्वाचे साधन आहे असे प्रतिपादन केले होते. साधनाच्या आधारे इतिहासकार गतकालीन संपूर्ण घडामोडीचा समग्र मागोवा घेवू शकतो. या घटनेमागील कार्यकारणभाव निरनिराळ्या शब्दांतून व्यक्त होत असतो. उदा. असे घडले कारण की, त्यामुळे त्यानंतर परिणाामत: दरम्यानच्या काळातील परिस्थितीमुळे अपरिहार्यपणे व परिणामवश हे शब्द समूह परिस्थितीतील कारण मीमांसा स्पष्ट करणारे असतात.

**आपली प्रगती तपासा**

कारणमिमांसेचा अर्थ व स्पष्टीकरण यावर चर्चा करा.

## ८.२ कारणमिमांसेचे महत्त्व

कारणमिमांसा हा इतिहासलेखनातील अतिशय महत्त्वाचा घटक आहे. यामुळे घटना अर्थपूर्ण बनतात आणि घटनांचे आकलन समर्पकपणे होते. कारणमीमांसेखेरीज झालेले इतिहासलेखन म्हणजे घटनांची जंत्री ठरते. अशा इतिहासलेखनाची तुलना सुप्रसिद्ध ब्रिटिश

इतिहासतज्ज्ञ आर.जी. कॉलिंगवूड रेल्वेच्या वेळापत्रकाशी करतात. त्यात उपयुक्त माहिती असते, ती भरगच्च व तपशिलात असते, मात्र ती सुटी असते, ती तर्कसंगत नसते. इतिहास ही अशा सुट्या घटनांची यादी नव्हे. इतिहासातील घटना कार्यकारण प्रक्रियेच्या धाग्याने बांधलेल्या असाव्या लागतात. शाळकरी मुलांना देखील घटनेमागील कारण स्पष्ट सांगितले, तर त्या घटनेचे आकलन यथार्थपणे होते. इतिहासकाराने असे का घडले? या प्रश्नाची उत्तरे शोधून ती उलगडून दाखविणे म्हणजे **"इतिहासातील कारणमीमांसा"** होय.

कारणमीमांसा ह्या शब्दाचा पर्यायी शब्द म्हणून काही ठिकाणी इतिहासाचे भाष्य अगर अन्वयार्थ (Interpretation) हा शब्द वापरलेला आढळतो. हे दोन शब्द परस्पर निगडीत असले तरी पर्यायी मात्र नाहीत. कारणमिमांसा ही केवळ करणांचा शोध घेण्याची प्रक्रिया आहे. कारणे शोधून काढल्यानंतर त्याची मांडणी ज्या दृष्टिकोणातून, ज्या परिप्रेक्ष्यातून संशोधक करतो, जी कारणे अधोरेखित करतो, ज्या काही कारणांना अग्रक्रम व इतरांना गौण स्थान करता अन्वयार्थ असतो. उदाहरणार्थ, अमेरिकेतील यादवी युद्धाची, दासप्रथा, आर्थिक हितविरोध अग्रक्रम देतो त्यावरून त्याने लावलेला घटनेचा अन्वयार्थ व्यक्त होतो. फॉकनर हा समिक्षक सांस्कृतिक संघर्ष अशा प्रकारची कारणे देतो, या कारणांतून इतिहासलेखक ह्या कारणाला दासप्रथेपेक्षा आर्थिक हितविरोध हे यादवीचे मूळ कारण होते असे केलेले विधान म्हणजे त्याने यादवीवरील आर्थिक दृष्टिकोणातून केलेले भाष्य किंवा कारणमिमांसा **हेरोडोट्स्** ह्या प्राचीन काळातील ग्रीक इतिहासकाराने कारणाना इतिहासलेखनात महत्व दिलेले आढळते. ग्रीक व बाहेरील आक्रमक टोळ्या यांच्यातील संघर्षाचे वर्णन करताना, त्या संघर्षाची माहिती पुढील पिढ्यांना व्हावी याबरोबरच ते एकमेकाविरुद्ध का लढले? हे वाचकांना कळावे हे आपल्या लेखनामागील हेतू असल्याचे तो स्पष्ट करतो. मध्ययुगातील प्रख्यात इतिहासलेखक इब्न खल्दून याने इतिहासाच्या स्वरूपाचा तात्त्विक ऊहापोह करताना, घटनेमागे दडलेल्या नानाविध कारणांचा शोध इतिहासलेखकाने घेणे अगत्याचे असल्याचे ठाम प्रतिपादन केलेले आढळते, आणि ती कारणे कोठे शोधता येतात याचाही निर्देश तो करता अठराव्या शतकात होऊन गेलेला ख्यातनाम फ्रेंच विचारवंत **मॉन्टेस्क्यू,** रोमन लोकांच्या महानतेची व उदयास्ताची कारणे स्पष्ट करताना, प्रत्येक राजवंशाच्या उदयामागे सर्वसामान्य नैतिक, भौतिक घटक असतात, केवळ देवाच्या अगर दैवाच्या लहरीनुसार ह्या पृथ्वीतलावर घटना घडतात असे मानणे मूर्खपणाचे द्योतक आहे असे निःसंदिग्ध विधान करताना दिसतो. मात्र एकोणिसाव्या शतकापर्यंत लिहिले गेलेले बरेचसे इतिहास निवेदनात्मक स्वरूपाचे होते.

**कारणमीमांसेला अधिक महत्त्व प्राप्त झालेले** १९ व्या शतकात प्राप्त कारणांचा शोध घेणे तसेच वस्तुनिष्ठ चित्र उभे करणे हेच केवळ इतिहासकाराचे कर्तव्य नसून, इतिहास लेखनाला कारणमीमांसा अत्यावश्यक आहे, तो चांगल्या इतिहासाचा आत्मा आहे, त्याखेरीज इतिहास निर्जीव ठरतो, कारणमीमांसा हे चांगल्या, उच्च दर्जाच्या इतिहासलेखनाचे व्यवच्छेदक लक्षण आहे अशी विधाने केली जाऊ लागली. प्रत्येक घटनेमागे कारण असते, त्या घटनेचे परिणाम म्हणजे पुढे घडणाऱ्या घटनेचे कारण असते, अशी कारण-परिणामांची कडी तयार होते आणि अशी एकेक कडी जुळवत गेले की ऐतिहासिक घडामोडींचा अन्वयार्थ लागतो. अन्यथा इतिहासलेखन हे घटनांची निष्प्राण, नीरस यादी बनते. उदाहरणार्थ, दुसऱ्या महायुद्धाच्या संदर्भात विचार करता हिटलरचे पोलंडवरील आक्रमण ही दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात होती. हिटलरला पश्चिम युरोपही



munotes.in

आपल्या वर्चस्वाखाली आणावयाचा होता. असे असता त्याने प्रथम पोलंडवरच का आक्रमण केले? या आक्रमणामागील त्याचे हेतू काय होते? कोणती कारणे होती? अशा अनेक प्रश्नांची म्हणजे त्या कृतीमागील कारणांचा शोध घेणे होय. काही मूलभूत गोष्टीची इतिहासलेखकाने उत्तरे शोधणे ऐतिहासिक घटनांमागील कारणांचा शोध घेताना ध्यानात ठेवाव्या लागतात. पहिला मुद्दा असा की, कोणतीही मानवी कृती कारणांशिवाय घडत नाही, प्रत्येक घटनेमागे, कृतीमागे मग ती कितीही मोठी अगर क्षुल्लक असो, जाणीव पूर्वक केलेली असो वा अजाणतेपणी केलेली असो, त्यामागे कारण असते. अजाणतेपणी केलेल्या कृतीमागील कारणे उघड दिसत नसली तरी मनात सुप्त रूपाने अस्तित्वात असतात, दुसरा मुद्दा असा की बहुधा घटनांच्या मागे एकच नव्हे तर अनेक व नानाविध कारणे असतात. उदाहरणार्थ, युरोपमध्ये सोळाव्या शतकात झालेल्या धर्मसुधारणा चळवळीचा अभ्यास करताना ती चळवळ मार्टिन ल्यूथर ह्या धर्मोपदेशकाने सुरू केली एवढे म्हणून त्या चळवळीचा अर्थ उलगडत नाही. तसेच त्याच्या मनात असलेले धर्मसंस्थेबद्दलचे असमाधान हे कारण होते एवढे प्रतिपादन करूनही त्या चळवळीमागील सर्व कारणांची उकल होत नाही, तर त्याकाळी धर्मसंस्था व धर्मसंस्थाप्रमुख सर्वसामान्यांवर अन्याय्य व अविहित मार्गांनी करीत असलेले शोषण, त्यांचे नाना प्रकारचे गैरव्यवहार, अनाचार, भ्रष्टाचार यांची नोंद करावी लागते; तसेच सामाजिक व राजकीय जीवनावरही अनिष्ट प्रभाव गाजविणारी ही सत्ताकेंद्रे कशी बनली होती तेही स्पष्ट करावे लागेल. रशियामध्ये १९१७ साली झालेल्या साम्यवादी क्रांतीचे कारण म्हणून केवळ लेनिनच्या नेतृत्वाचा उल्लेख करून भागणार नाही, तर त्या घटनेमागील सामाजिक, आर्थिक व राजकीय कारणांचा शोध घ्यावा लागेल. केवळ एका कारणाच्या, मग ते कितीही महत्त्वाचे असो, त्या घटनेमागील सर्वंकष कारणांचा बोध होत नाही.

## ८.४ पडताळणीचे महत्व

एकोणिसाव्या शतकापासून मानवी जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय अशा विविध अंगांच्या तसेच मानवाच्या मनोव्यापारांच्या अभ्यासाची शास्त्रे विकसित होत गेल्याने कोणत्याही घटनेमागील सर्व कारणांचा शोध घेणे व त्यासाठी गतकाळात खोल व सूक्ष्म दृष्टीने डोकावणे संशोधकाला शक्य झाले. जितक्या व्यापक क्षेत्रात तो खोलवर दृष्टी टाकेल तेवढी अधिकाधिक कारणे त्याला सापडत जातात.

**पडतळणीची प्रक्रिया**

कारणांचा शोध घेताना संशोधकाने तिसरा मुद्दा ध्यानात ठेवावयाचा तो असा की त्याच्या हाती पडणारी सर्वच कारणे सारखीच महत्त्वाची नसतात. त्यापैकी कोणते कारण सर्वात महत्त्वाचे व कोणती कारणे गौण आहेत हा निर्णय संशोधकाने करावयाचा असतो. सर्व कारणे हाती आली की कारणांची वर्गवारी ठरवावी लागते. कारणांची जुळवणूक करताना ती तर्कसंगत असतील तरच त्यातून तर्कशुद्ध निष्कर्ष निघू शकतात. अन्यथा ती सुट्या कारणांची जंत्री होते व त्यातून अर्थबोध होत नाही. उदाहरणार्थ, महात्मा गांधींनी १९३० साली राष्ट्रव्यापी लढ्याचा प्रारंभ मिठाच्या सत्याग्रहाने केला हे विधान करताना मिठाच्या सत्याग्रहामागील आर्थिक व सामाजिक कारण उलगडून दाखविले नाही तर त्या लढ्याच्या स्वरूपाचे यथार्थ आकलन होणार नाही. कारणांच्या क्रमवार मांडणीतून त्या विषयाबाबतचा

संशोधकाचा दृष्टिकोण व्यक्त होतो, त्या घटनेचा अन्वयार्थ लावण्यामागील त्याची वैचारिक भूमिका स्पष्ट होते, व त्यावरून अभ्यासविषयावरील संशोधकाचे भाष्य आकार घेते. कोणत्याही घटनेमागील कारणांचा शोध घेताना सर्वसाधारणतः कोणते मुद्दे संशोधकाने विचारात घ्यावे याचे विवेचन प्रा. कार्ल गुस्तावसन यांनी केले आहे. ते संशोधकाला निश्चितच मार्गदर्शक ठरण्याजोगे आहेत. ते मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

१) घटनेचे/कृतीमागील नजीकचे कारण (Immediate Cause) कोणते?

२) त्यामागे वैचारिक भूमिका आढळते का?

३) त्या वैचारिक भूमिकेचे प्रत्यंतर त्या पूर्वी कधी आढळते का?

४) त्या घटनेशी कोणकोणत्या व्यक्ती संबंधित आहेत?

५) त्यांची शक्तीस्थळे अगर दौर्बल्य कशात होते? त्याचा ऐतिहासिक घटनेशी संबंध दिसतो का?

६) त्या घटनेबाबत समाजातील भिन्न घटकांची काय प्रतिक्रिया होती?

७) त्या घटनेपूर्वी काही लक्षणीय असे राजकीय स्वरूपाचे अथवा तंत्रज्ञानात बदल झाले होते का?

८) त्या घटना स्थळाची भौगोलिक स्थिती काय होती?

९) तत्कालीन भिन्न क्षेत्रांतील संस्थांशी त्या घटनेचा संबंध होता का?

ह्या प्रश्नांची उत्तरे संशोधकाने शोधल्यास अभ्यासविषयामागील सर्वकारणांचा शोध घेतला जाईल याविषयी संदेह नाही.

कारणांची मांडणी कशी करावी? कारणांची संगतवार मांडणी व उतरंड तयार करताना संशोधकाला काही पथ्ये अवश्य पाळावी लागतात. अनेकदा कारणमीमांसा करताना घटनेच्या लगतच्या वरवरच्या कारणालाच महत्त्वाचे कारण मानले जाते किंवा एखाद्या घटनेचे श्रेय एखाद्या व्यक्तीला दिले जाते अथवा त्याचा दोष एखाद्या व्यक्तीच्या पदरी बांधला जातो. याला अतिसुलभीकरण (Over-Simplification) असे म्हणतात. १८५७ साली मंगल पांडेने इंग्रजांच्या सत्तेला प्रथम आव्हान दिल्यामुळे तोच राष्ट्रीय उठावाला कारणीभूत होता, असे विधान उथळ कारणमीमांसेचे उदाहरण ठरते. कोणत्याही घटनेमागे अनेक कारणे असतात, घटना बहुआयामी असते. त्यामुळे अशा वरवरच्या कारणांचा उल्लेख तोकडा ठरतो. अशा कारणात सत्य नसते असे नव्हे, मात्र तो सत्याचा एक अंश असतो. हिमनगाच्या वरवरच्या थराप्रमाणे असतो, त्याखाली दृष्टी टाकली तरच हिमनगाच्या मोठ्या आकाराची कल्पना येते. आणि अशा अंतर्भागात शिरून शोध घेणे हेच चांगल्या इतिहासकाराचे काम आहे.

तसेच एखाद्या घटनेचे श्रेय एखाद्या व्यक्तीला देणे हा देखील असाच उथळ कारणमीमांसेचा प्रकार आहे. अमेरिका १९२९ ते ३३ च्या दरम्यान महामंदीच्या प्रचंड हिमलाटेने गारठून गेलेली असताना 'न्यूडील' उपक्रमाद्वारे समाजजीवनाला ऊब देऊन गतिमान करण्याचे श्रेय एकट्या राष्ट्रपतीला पुन्कलिन रूझवेल्टला देऊन चालणार नाही, तर त्याच्या हाताशी जे विद्वानांचे मंडळ होते (Braintrust) त्याला, तसेच राजकीय पक्षाला व शासन यंत्रणेला द्यावे लागते. किंवा दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचे श्रेय एकट्या

विन्स्टन चर्चिलला देऊन चालणार नाही. त्यासाठी ब्रिटिश जनतेचे धैर्य व चिकाटी तसेच अमेरिकेचे सहाय्य व रशियाचा जर्मन विरोधी संग्राम ध्यानात घ्यावा लागेल. तसेच भारतात मराठा सत्तेचे पतन पेशवा दुसरा बाजीराव याच्या शासनकाळात झाले म्हणून त्यासाठी त्याला एकट्याला पूर्णतः दोषी व उत्तरदायी ठरविणे, हे देखील अतिसुलभीकरणाचे उदाहरण ठरेल. कोणत्याही, विशेषतः महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांमागे कारणांची दीर्घकालीन परंपरा असते. ती ध्यानात आली तर घटनांचा समर्पक अर्थ लावता येतो. म्हणून व्यापक क्षेत्रातील बहुविध कारणांचा शोध घेणे हे उच्च दर्जाच्या इतिहासकाराचे लक्षण मानले जाते.

**कारणमीमांसेतील योगायोगाचे स्थान :** ऐतिहासिक कारणपरंपरेत योगायोगाचे काय स्थान असावे हे कारणमीमांसेशी निगडित असलेला एक महत्त्वाचा मुद्दा आहे. यालाच 'क्लिओपात्राच्या नासिकेचा' सिद्धांत असे म्हणतात. ऐतिहासिक विवेचनात योगायोगाचा सिद्धांत प्रामुख्याने पहिल्या महायुद्धानंतर मांडला जाऊ लागला. मानवी जीवनात एखादी घटना अचानक, अनपेक्षित रीत्या घडते, तिची कारणे कळत नाहीत तो योगायोग वाटतो. उदाहरणार्थ, ॲक्टीयमच्या लढाईत कसलेला व अनुभवी रोमन सेनानी ॲन्थनी याचा पराभव झाला, ही घटना अनपेक्षित होती. इजिप्तची राणी क्लिओपात्रा ही अतिशय सुंदर, तिची नासिका विशेषच सुरेख. तिच्या प्रेमात ॲन्थनी आकंठ बुडलेला होता हा एक योगायोग खराच. यामुळे हा कसलेला सेनानी पराभूत झाला. म्हणून अशा योगायोगाच्या सिद्धांताला 'क्लिओपात्राच्या नासिकेचा सिद्धांत' म्हणतात. इतिहासात अनेक योगायोग आढळतात, त्यामागील कारणांचे स्पष्टीकरण मिळत नाही असा विचार पहिल्या महायुद्धानंतर काही विचारवंत व्यक्त करू लागले. प्रत्येक घटनेचे अगर कृतीचे तर्कशुद्ध स्पष्टीकरण करता येतेच असे नाही असा त्यांचा युक्तिवाद आहे. **प्रा. जे.बी.बरी** ह्या ब्रिटिश इतिहासकाराने इतिहासात अशा काही आकस्मिक घटना घडलेल्या आढळतात असे सूचित केले. **प्रा. एच्.ए.एल्.** फिशर यांनी तर आपल्या युरोपवरील इतिहासग्रंथाच्या प्रस्तावनेत घटनांच्या आकस्मिकतेवर, अनपेक्षितपणावर बराच भर दिला. दोन महायुद्धांच्या मधल्या कालावधीत लेखन करणाऱ्या माईनेक ह्या जर्मन तत्त्वज्ञाने हा मुद्दा अधोरेखित करून, **लिओपोल्ड** रांके ह्या सुप्रसिद्ध जर्मन इतिहासकाराने ह्या मुद्याचा विचार न केल्याबद्दल त्याच्यावर ठपकाही ठेवला. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात हा मुद्दा विचारवंतांनी मांडला. याची पार्श्वभूमी ध्यानात घेतल्यास तो मांडण्याची कारणे स्पष्ट होतात. पहिल्या महायुद्धाच्या संहारक स्वरूपामुळे विचारवंतांची मते निराशेने व्यापली होती. वैफल्यग्रस्त झाली होती. बुद्धिनिष्ठा, मानवी मूल्ये, मानवाची अखंड प्रगती अशा एकोणिसाव्या शतकातील सिद्धांतावरील त्यांचा विश्वास ढळला होता. अनेक गोष्टी अनाकलनीय वाटल्यामुळे ते योगायोग आहेत असे स्पष्टीकरण देणे हाच पर्याय दिसत होता आणि म्हणून इतिहासकाराने प्रत्येक घटनेचे कारण शोधण्याचा खटाटोप करू नये, अनेक घटना योगायोगाने घडतात हे मान्य करावे व तसा इतिहास लिहावा असे मत ते मांडू लागले. म्हणजेच कारणमीमांसेत योगायोगाला स्थान असावे असे प्रतिपादन करू लागले. ह्या योगायोगाच्या सिद्धांताचा अधिक खोलात जाऊन विचार केल्यास ऐतिहासिक कारणमीमांसेत योगायोगाला स्थान देण्याचे कारण नाही असे मत इतर काही इतिहासाच्या अभ्यासकांनी व्यक्त केलेले दिसते. एखादी घटना वरवर पाहाता योगायोगाने घडल्यासारखी वाटली, तरी खोलात शिरून शोध घेतल्यास त्यामागे कोणते ना कोणते कारण सापडते

अपघात घडण्याच्या वेळी एखाद्या व्यक्तीची उपस्थिती तेथे असणे हा योगायोग वाटला तरी त्यामागील परिस्थितीचे विश्लेषण केले की तो योगायोग नव्हता हे ध्यानात येते. . उदाहरणार्थ, एखाद्या स्थळी ती व्यक्ती नेमकी त्यावेळी तेथे का आली याची कारणे शोधता येतील. किंवा दोन वाहने अगदी समोरासमोर निकट येऊनही अपघात झाला नाही हा देखील योगायोग वाटू शकतो. परंतु असा की कारणे शोधण्याच्या असमर्थतेमुळे, अक्षमतेमुळे घटना आकस्मिक योगायोगाने घडलेल्या याचा सकृतदर्शनी वाटल्या तरी त्या तशा नसतात.

ऐतिहासिक कारणमीमांसेत योगायोगाचा विचार करण्याचे कारण नाही असे ठाम मत प्रा. एडवर्ड कार यांनी आपल्या What is History? नावाच्या मौलिक ग्रंथात प्रदर्शित केले आहे. त्यांचा युक्तिवाद असा की कारणमीमांसा करताना इतिहासकार कारणांची तर्कशुद्ध साखळी तयार करतो. ह्या साखळीत तर्कशुद्ध असतील अशाच कारणांचा अंतर्भाव केला जातो. ज्याप्रमाणे इतिहासकार हाती आलेले सर्वच पुरावे वापरत नाही. त्याला जे समर्पक वाटतील, तेच तो वापरतो व उर्वरीत बाजूला सारतो, त्याचप्रमाणे कारणमीमांसेच्या प्रक्रियेत तर्कशुद्धतेच्या चौकटीत बसतील त्याच कारणांचा निर्देश इतिहासकार करतो, कारण अशा कारणपरंपरेच्या साखळीतूनच त्याचे इतिहासविषयाचे भाष्य साकार होते. म्हणून ज्याची तार्किकदृष्ट्या संगती लागत नाही अशा घटनांचा समावेश तो कारणमीमांसेत करत नाही. याचाच अर्थ असा की कारणमीमांसेत योगायोगाला स्थान देण्याचे कारण नसते.

याशिवाय योगायोगाने घटना घडतात असे मान्य केले तरी, अशा घटनांचे उल्लेख सामान्य निष्कर्ष काढण्यासाठी इतिहासकाराला उपयुक्त नसतात. इतिहासात मूल्यनिर्णयाचा विचार (value judgement) जर महत्त्वाचा मानला, तर आकस्मिक घटनांचा उल्लेख निरर्थक ठरतो. गतकाळाच्या संदर्भात वर्तमानाचे आकलन अथवा वर्तमानाच्या संदर्भात गतकाळाचे ज्ञान हे इतिहासाचे उद्देश मानले तर त्यासाठी तर्कशुद्ध कारणांचाच वापर इतिहासकाराने करणे श्रेयस्कर ठरते. योगायोग हे तर्कापलीकडचे असल्याने ते कारणमीमांसेच्या कक्षेत येत नाहीत. योगायोगाला कारणमीमांसेत स्थान नाही या मुद्याचे स्पष्टीकरण प्रा. कार यानी पुढील वाक्यात अतिशय यथार्थपणे केले आहे ते म्हणतात "Just as from the infinite ocean of facts, the historian selects those which are significant for his purpose, so from the multiplicity of sequences of causes and effect, he extracts only those which are historically significant and the standard of historical significance is his ability to fit them into his pattern of rational explanation and interpretation."

**कारणमीमांसा व नियतवाद (Determinism) :**

कारणमीमांसेच्या संदर्भात उपस्थित केला जाणारा आणखी एक मुद्दा ऐतिहासिक नियतवाद हा होय. हेगेल व कार्ल मार्क्स यांच्या विवेचनात नियतवाद आढळून येतो. नियतवाद याचा अर्थ असा की विशिष्ट परिस्थितीमध्ये जर समान कारणे आढळून आली तर त्याची फलनिष्पत्तीही समान होते. चेंबरच्या शब्दकोषात ह्या शब्दाचा दिलेला अर्थ असा की प्रत्येक कृतीमागे कारण असते, आणि त्या कारणामुळे जे जसे घडले, ते तसेच घडायला पाहिजे; त्याहून वेगळे घडू शकत नाही. कार्ल मार्क्सने मानवी समाजाच्या विकासाची केलेली भौतिकवादी मीमांसा ह्याच स्वरूपाची आहे. विसाव्या शतकातील **कार्ल पॉवर व एडवर्ड कार** सारखे विचारवंत मात्र नियतवाद मानीत नाहीत. पॉपर म्हणतात की, 'मानवी



munotes.in

जीवनात निर्धारित असे काही नसते. मानव कोणत्या वेळी कसा वागेल याचा अंदाज बांधणे अशक्य असते व त्यामुळे ठराविक घटनांमागे ठराविकच कारणे राहू शकत नाहीत. व त्याचे ठराविक परिणाम होऊ शकत नाहीत.' पॉपर नियतवादाचे कट्टर विरोधक आहेत. एडवर्ड कार यांची भूमिकाही नियतवादाच्या विरोधकाची आहे. ते म्हणतात, की माणसाच्या प्रत्येक कृतीमागे कारणे असतात, ही बाब मान्य केली नाही तर दैनंदिन जीवन अगम्य ठरेल, परंतु एकसारख्या दिसणाऱ्या कृतींच्या मागची कारणे मात्र भिन्न असू शकतात आणि त्यांचे फलितही भिन्न स्वरूपाचे असते. आणि म्हणून इतिहासलेखनात कारणमीमांसेसाठी नियतवादाचा आधार घेणे अशास्त्रीय ठरेल.

**आपली प्रगती तपासा**

1. पडताळणीची मांडणी कशी करावी?
2. कारणमीमांसा व नियतवाद यावर टीप लिहा.

## ८.६ सारांश

थोडक्यात कारणमीमांसेचा विचार करायचा तर, संशोधकाने प्रत्येक घटनेमागील, प्रत्येक कृतीमागील विविध कारणांचा शोध घ्यावा, त्या कारणांची वर्गवारी करावी, क्रमवार तर्कसंग मांडणी करावी. आणि त्या मांडणीत योगायोगाला अगर नियतवादाला वाव नसावा. कारणांच अशा प्रकारे मांडणी केल्यास इतिहासविषयाला अर्थघनता प्राप्त होते. म्हणून अर्थपूर इतिहासलेखनासाठी कारणमीमांसा अत्यावश्यक ठरते.

कारणमीमांसा हि इतिहासलेखनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. विशिष्ट घटना का घडते किंवा विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट घटना कशा प्रकारे घडतात याचा शास्त्रीय विचार करणमीमांसेमध्ये अभिप्रेत करतो. कारणमीमांसा हि ढोबळ अंदाजावर आधारित नसते. शास्त्रीय कसोटी, परिस्थितीजन्य पुरावा व त्या घटनेला विस्तृतपणे नोंदवणारे ऐतिहासिक पुरावे यावर कारणमीमांसा अवलंबुन असते. कारणमीमांसा आणि पडताळणी मांडणी हे दोन्ही संशोधनात उपयुक्त आहेत.

## ८.७ प्रश्न

1. इतिहासातील उदाहरणांसह कारणमिमांसेचे महत्त्व स्पष्ट करा.
2. इतिहास संशोधनातील कारणमिमांसेवर भाष्य करा.

## ८.८ अतिरिक्त वाचन

1. गाढाळ एस. एस., इतिहासलेखनशास्त्र, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद २०१५

2. काठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर पाचवी सुधारीत आवृत्ती, २०१६.

3. लेले वि. गो. लेले (अनु.) इतिहास म्हणजे काय? मुळ लेखक ई.एस.कार, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २०१२

4. गरीधन, जी.जे., ए गाईड टू हिस्टोरिकल मेथड, फोरधाम, युनिव्हरसिटी प्रेस, न्युयॉर्क, १९४६

5. Carr E.H., What is History? (Penguin Modern Classics), Penguin Classic, २०१८

❊❊❊❊❊❊❊

munotes.in

munotes.in

# ९

# स्त्रोतांचे/तथ्यांचे विश्लेषण व सामान्यीकरण

**घटक रचना**

९.० उद्दिष्टे
९.१ प्रस्तावना
९.२ सामान्यीकरणाची तर्कसंगती
९.३ सामान्यीकरणांवर परिणाम करणा-या ऐतिहासिक दृष्टिकोनाचे महत्त्व
९.४ सामान्यीकरणाचे महत्त्व
९.५ सामान्यीकरणातील समस्या
९.६ ऐतिहासिक घटनांचे स्पष्टीकरण
९.७ सारांश
९.८ प्रश्न
९.९ अतिरिक्त वाचन

## ९.० उद्दीष्टे

**प्रकरण वाचल्यानंतर**

- विद्यार्थ्यांना सामान्यीकरण आणि त्यातील विविध पैलू समजून घेता येतील आणि त्यातील अपरिहार्यता स्पष्ट होईल
- माहिती स्त्रोत आणि त्यांच्यापासून मिळालेल्या माहितीचे सामान्यीकरण याची माहिती मिळेल
- इतिहासातील स्पष्टीकरणासाठी किंवा विश्लेषणासाठी जबाबदार घटक समजतील

## ९.१ प्रस्तावना

ऐतिहासिक सामान्यीकरण म्हणजे तथ्यांमधील संबंध होय. ही सरलीकरणाची एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. संशोधक सर्व घटनांमधील एकमेकांशी संबंधीत अशी सामान्य वैशिष्ट्ये शोधून काढतो. सामान्यीकरण या कल्पनेत ऐतिहासिक बाबी एकमेकांना सदृश असतात. या साधनांद्वारे इतिहासकारांना त्यांची संशोधन सामग्री समजते आणि इतरांना त्यांची तथ्ये समजून देण्याचा प्रयत्न ते करतात. घटना इत्यादींचे विश्लेषण आणि स्पष्टीकरण नेहमीच सामान्यीकरणाद्वारे केले जाते.

## ९.२ सामान्यीकरणाची तर्कसंगती

सामान्यीकरण म्हणजे घटनेच्या वर्णनातील सर्व तपशील लक्षात घेऊन, अतिशय परिणामकारकरित्या मांडणी करणे. सामान्यीकरण संपूर्ण इतिहासाची माहिती काही

मोजक्या शब्दात देतो. सामान्यीकरण हा एक असा भाग आहे कि जो संपूर्ण कार्याचे अंतिम मूल्यांकन किंवा अंदाज घेतो. स्वाभाविकच ते संपूर्ण संशोधनाचे सार असते.

सामान्यीकरण करणे ही खूप गुंतागुंतीची प्रक्रिया आहे, ज्यात इतिहास लेखनातल्या सर्व महत्वाच्या ठिकाणांची स्पष्ट माहिती असते. ऐतिहासिक माहिती काळजीपूर्वक गोळा केली जाते, तपासली जाते आणि छाननी केली जाते, गटबद्ध केली जाते, नंतर विविध वेगळ्या प्रकारच्या प्रक्रियेतून ती माहिती जात असते. याकरिता भिन्न कौशल्य आवश्यक आहे, जिथे ऐतिहासिक संश्लेषण सादर करण्यासाठी बरेच निरीक्षण आवश्यक आहे. ही प्रक्रिया आपल्याला असंख्य तथ्यांमधील कोणत्या प्रकारचे नातेसंबंध अस्तित्त्वात आहे हे सांगते. हे विश्लेषणाचे उच्च स्वरूप आहे.

सामान्यीकरणातून तयार केलेल्या सूत्राने काही स्वीकारलेल्या मानकांची पुष्टी करता येते. ऐतिहासिक तथ्ये गोळा करताना नवीन नोंदी शोधण्यासाठी सखोल शोध घेऊन परिस्थितीला सामोरे जावे लागते ज्यायोगे माहितीतील कमतरता दूर करता येते. सामान्यीकरणामध्ये नावे व तारखा वगळता संपूर्ण कालावधीसाठी एकसमानता मिळवून तयार केलेली सूत्रे वापरली जातात. सूत्रात वापरलेली भाषा फक्त वर्णनात्मक शब्दांचा वापर करून सोपी, अचूक आणि स्पष्ट असणे आवश्यक आहे. सामान्य तथ्ये आणि अद्वितीय तथ्यांमधील फरक असणे आवश्यक आहे. सामान्य तथ्ये अशा घटना असतात ज्यांची वारंवार पुनरावृत्ती होते. आपल्याला व्याप्ती आणि कालावधी निश्चित करावा लागतो. समान सूत्रानुसार सर्व वैयक्तिक प्रकरणे एकत्रित करून समावेशक तथ्ये एकत्र केली जातात व अखेर जुळणारे निष्कर्ष काढले जातात.

एखादी विशिष्ट प्रथा किंवा सवय कशी विकसित झाली आहे, याबद्दल आपण एखादे सूत्र तयार करणार असल्यास, त्यातून पुढे गेलेल्या विविध गोष्टी आपण लक्षात घेतल्या पाहिजेत. सवयीतील सर्व बदलांची तुलना केल्यास, उत्क्रांतीचा सामान्य मार्ग निश्चित करणे शक्य होईल. सर्व निष्कर्ष एका ठराविक साच्याच्या घटनेच्या पुनरावर्तीची पुष्टी करतात आणि त्या घटनेतील सामान्य वैशिष्ट्ये दर्शवितात. बी. शेख अली यांच्या मते, जेव्हा ठरविक कृतींचे इतर अनुकरण करतात तेव्हा तो पहिला टप्पा आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये अनुकरण व मान्यता यानंतर नविन विचार रुजतो. वापर परंपरा बनते आणि त्याचे रुपांतर अनिवार्य रीती किंवा नियमात होते, ही परंपरा आणि अधिकाराची शेवटची अवस्था आहे. शेवटी काही समाजामध्ये या नियमावर टीका केली जाते आणि तर्कसंगत बदलावर परिणाम होतो. एखाद्या इतिहासास टप्प्याटप्प्याने अभ्यास करण्यास, निसर्गाचा शोध घेण्यास आणि योग्य शब्दांत वर्णन करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. हे वेळ आणि रिक्त स्थानांमध्ये अस्तित्त्वात असलेल्या सामान्य तथ्यांचा संदर्भ देते. येथे नक्की काय केले जाते ते म्हणजे प्रत्येक टप्प्यावर सवयीतील बदलाची पद्धत काळजीपूर्वक पाळणे आणि इतर भागातल्या सवयीच्या संदर्भात हे तपासून पहाणे आणि त्या पद्धतीमध्ये समानता अस्तित्त्वात असल्याचे शोधून काढणे. जर उत्तर सकारात्मक असेल तर असा निष्कर्ष काढू शकतो की बहुतेक प्रत्येक बाबतीत वर्तणुकीची पद्धत समान आहे. जर आपल्याला युद्धासाठी जबाबदार घटक जाणून घ्यायचे असतील तर आपल्याला खोल मानवी हेतू, महत्त्वाकांक्षा, लोभ याची चौकशी करणे गरजेचे आहे.

जर आपल्याला एखाद्या वर्णनाचे आकलन करण्यासाठी सूत्राची आवश्यकता असेल तर दोन नैसर्गिक प्रलोभन आहेत ज्याचा आपण काळजीपूर्वक अभ्यास केला पाहिजे. जेव्हा एखादी व्यक्ती स्वत:ची स्तुती करते तेव्हा आपण त्याच्या सर्व दाव्यांवर विश्वास ठेवण्यापूर्वी आपण सावधगिरी बाळगली पाहिजे. दुसरे म्हणजे काल्पनिक बाबींचा वापर करण्याचा धोका टाळला पाहिजे.

**आपली प्रगती तपासा:**

सामान्यीकरणाच्या तर्कसंगतीवर भाष्य करा.

## ९.३ सामान्यीकरणांवर परिणाम करणा-या ऐतिहासिक दृष्टिकोनाचे महत्त्व

सामान्यीकरण हाती घेतलेल्या काही इतिहासकार आणि समाजशास्त्रज्ञ म्हणजे- कार्ल मार्क्स, मॅक्स वेबर, मार्क ब्लॉच, फर्नांड ब्रूडेल, एरिक हॉब्सबॉम, इमॅन्युएल वालरस्टाईन, कॉम्त यांनी घटनांचे वर्गीकरण, विश्लेषण व सामान्यीकरण केले आहे. त्यानंतर ज्ञानामध्ये प्रगती झाली. टप्प्याटप्प्याने सर्व संकल्पना आणि ज्ञान प्रकट होते त्यासाठी मुलभूत अभ्यासाची गरज आहे. या ऐतिहासिक ज्ञानाचे काही प्रकार आहेत. सत्य किंवा काल्पनिक; मूर्त किंवा अमूर्त; आणि वैज्ञानिक किंवा सकारात्मक. अखेरचा टप्पा अर्थात पॉझिटिव्ह स्टेज म्हणजेच प्रत्यक्षवादी दृष्टिकोनाचा आहे. कॉम्त यांनी मापन केले की या टप्प्यात विज्ञान आणि उद्योग यांचे वर्चस्व आहे. म्हणूनच मध्यकालीन काळाच्या इतिहासावरील ईश्वरी संकल्पनेचा धार्मिक प्रभाव त्याच्याद्वारे नाकारला गेला. कॉम्तने हा वैज्ञानिक आगमनात्मक मार्ग, ज्यायोगे तथ्यांचे निरीक्षण, प्रयोग आणि नंतर सामान्य कायद्यांची निर्मिती यांचा समावेश होता, त्यास इतिहासाच्या लेखनातही लागू केला.

अनुभववाद्यांच्या मते परंपरा, अनुमान, सैद्धांतिक तर्क किंवा कल्पनाशक्तीद्वारे मिळविलेले ज्ञान हे ज्ञानाचे योग्य रूप नाही. तसेच धार्मिक प्रणाली, तार्किक अनुमान, नैतिक उपदेश आणि साहित्य यांच्याद्वारे मिळविलेले ज्ञानाचे शरीर सत्यापित आणि विश्वसनीय नाहीत. त्यांच्या मते, अनुभवाने मिळालेले किंवा अनुभवजन्य ज्ञान अधिक उपयुक्त व विश्वसनीय असते. सकारात्मकवादी किंवा प्रत्यक्षवादी इतिहासकार असे मानतात की, ज्ञानाचे एकमात्र वैध स्वरुप म्हणजे ज्याचे सत्य प्रस्थापित केले जाऊ शकते. सकारात्मकवादी आणि अनुभववादी इतिहासकार दोघेही ज्ञानाचे अव्यवहार्य आणि सत्य न समजणारे असे अनुमान नाकारतात. जॉन लॉक, जॉर्ज बर्कले, डेव्हिड ह्यूम आणि जॉन स्टुअर्ट मिल हे महत्त्वाचे अनुभवजन्य इतिहासकार आहेत. त्यांच्या तत्वज्ञानाचा मुख्य गाभा असा आहे की सर्व ज्ञानात केवळ अनुभव आणि अनुभवांच्या माध्यमाने प्राप्त झालेल्या

munotes.in

तथ्यांचा समावेश असतो. तर, अतींद्रिय शक्तीने जगाविषयी कोणतेही केलेला दावा अथवा तार्किक अनुमानांना वास्तविकतेचा पाया नसतो. इतिहासतज्ञांनी अनुभववादी तत्वानुसार भूतकाळातील संबंधात असलेल्या पुराव्यांवर भरवसा ठेवला पाहिजे. समकालीनांनी भावनांच्या आधारे अभ्यास न करता वस्तुस्थितीदर्शक दृष्टीकोणातून जर इतिहासकारांनी या स्त्रोतांकडे बारकाईने पाहिले तर ते भूतकाळाचे खरे चित्र सादर करू शकतात. रांकेच्या मते, भूतकाळाचे विश्लेषण वर्तमानकाळातील परीस्थीतीनुसार न करता भूतकाळातील प्रचलित समाजव्यवस्थेच्या मापदंडानुसार व्हायला हवी. मागील काळातील लोकांची मनोवृत्ती व वागणूक त्या युगाच्या मानसिक व प्रचलित मापदंडाद्वारे समजली पाहिजे. इतिहासकारांच्या समकालीन मापदंडाने याकडे पाहिले जाऊ नये. रांके ऐतिहासिक स्त्रोतांच्या उपयुक्तेतेबाबत बाबतीत गंभीर असला तरी त्यांच्यावर त्याचा आंधळा विश्वास नाही. ऐतिहासिक स्त्रोत हे विश्वसनीय असले पाहिजे हे त्याला मान्य होते.

भांडवलशाही सामाजिक निर्मितीच्या विरोधाभासाचे स्पष्टीकरण करणे ही मार्क्सची प्राथमिकता होती. भांडवल निर्मितीची आर्थिक व्याख्या आणि त्याचे मानवी जीवनातील करी हा मार्क्सने त्यांचे जीवनकार्य असल्याचे मानले. एखाद्या वस्तूचे मूल्य हे उत्पादन करण्यासाठी आवश्यक असलेल्या सामाजिकरित्या आवश्यक श्रम वेळेद्वारे निश्चित केले जाते. कामगार शक्ती ही एक वस्तू आहे व त्याचबरोबर वेतनाचीही देवाणघेवाण होते. कामगार शक्तीचे मूल्य कामगार आणि त्याच्या कुटुंबाचे अस्तित्व आणि देखभाल करण्यासाठी आवश्यक असलेल्या मूल्याच्या समान असते. शेतीवर काम करणाऱ्या शेतमजुराला दिल्या जाणाऱ्या वेतनापेक्षा त्याची क्रयाशक्तीचे मूल्य अधिक असते.

सबाल्टर्न हा इतिहास लेखनप्रवाह अलीकडे विकसित झाला आहे. सबाल्टर्न अभ्यासानुसार, समाजातील निम्न वर्गातील लोकांना प्रकाशात आणणे. सबाल्टर्न हा शब्द निम्न वर्ग आणि दुर्लक्षित असणाऱ्या सामाजिक गटांचे वर्णन करतो आणि त्यांचा इतिहास जाणून घेण्यात रुची दर्शवतो. गायत्री स्पिवाक यांनी इतिहासलेखनाच्या मर्यादा दाखवताना हे स्पष्ट केले कि, वंचित घटकाबद्दल इतिहास लेखन करणाऱ्या इतिहासलेखकांना प्रस्थापित ऐतिहासिक परीभाषेतच बोलावे लागते. त्यांना स्वताची वेगळी परिभाषा तयार करता येत नाही. त्यामुळे नवीन अनुभव किंवा नव निर्मिती जुन्याच भाषेत मांडल्यामुळे त्यांच्या लेखनाला मर्यादा येतात. शोषित किंवा वंचित प्रवर्गाच्या समस्या आणि त्या विषयी भारतीय महिलांच्या परिस्थितीकडे लक्ष वेधून घेत आहे, कारण वसाहतवादी व प्रस्थापित इतिहासलेखनाच्या पुरुषवाचक सज्ञांचा वापर असल्यामुळे महिलांच्या समस्यांना वस्तुस्थितीदर्शक लेखन करणे अवघड जाते. अशा प्रकारच्या इतिहास लेखनात दुर्लक्षित अशा घटकांचा कोणताही इतिहास नसतो आणि त्यांना बोलताही येत नाही म्हणून महिलावाचक इतिहास लेखनाला खरे प्रतिनिधित्व मिळू शकत नाही. डेव्हिड अर्नोल्ड यांनी आदिवासींच्या बंडखोरी आणि मद्रास दुष्काळ (१८७६-७८) यासारख्या आदिवासी बंडखोरांसारख्या आत्तापर्यंत दुर्लक्षित विषयांची निवड केली आहे. ते समकालीन सामाजिक-राजकीय परिस्थितीत शेतकऱ्यांच्या चेतना आणि कृती यावर देखील लिहित आहेत. ग्यान पांडे यांनी १९१९-१९२२ मध्ये अयोध्या येथील शेतक-यांच्या बंडखोरीचा आणि भारतीय राष्ट्रवादावर होणाऱ्या

परिणामांची माहिती दिली आहे. स्टीफन हेमिंगहॅमने १९४२ च्या भारत छोडो चळवळीत बंडखोरीचे द्वैत स्वरूप दर्शविले.

मिशेल फुको (१९२७-८४) उत्तर आधुनिकवादी इतिहासाचा एक वेगळा दृष्टीकोन देतो. ऑर्डर ऑफ थिंग्ज, द आर्किऑलॉजी ऑफ नॉलेज, त्यांच्या लेखनात सामाजिक जीवनातील अर्थ, सामर्थ्य आणि सामाजिक वर्तन यांच्यातील संबंध स्पष्ट करण्यासाठी त्यांनी 'डिसचर्व्हिव्ह रेजिव्हम', 'एपिसटिम' आणि 'वंशावळी' या संकल्पना मांडल्या.

**आपली प्रगती तपासा:**

सामान्यीकरणावर परिणाम करणाऱ्या ऐतिहासिक दृष्टिकोनाचे महत्त्व विशद करा.

## ९.४ सामान्यीकरणाचे महत्त्व

ऐतिहासिक तथ्ये सादर करण्याच्या संपूर्ण व्यवस्थेमध्ये सामान्यीकरण मूळ आहे. इतिहासकार भूतकाळाची माहिती गोळा करतात आणि कालक्रमानुसार क्रमबद्ध करतात. त्यानंतर त्याचा अर्थ प्रकट होईल किंवा स्वतः प्रकट होईल असे त्यांचे मत आहे. इतिहासकारांचे कार्य माहितीच्या वैधतेची चाचणी करणे किंवा त्यांची सत्यता प्रमाणित करणे आणि त्याचे स्पष्टीकरण देणे म्हणजेच त्यासंदर्भात सामान्यीकरण करणे आहे. एखाद्या विशिष्ट विषयाची निवड करणे किंवा एखाद्या विशिष्ट विषयावर जोर देणे हे संशोधनाच्या ऐतिहासिक स्वरूपाच्या अनुसार स्वयंचलितपणे किंवा हेतुपुरस्सर अनुसरण केले जाते. ऐतिहासिक शोध घेण्याच्या प्रक्रियेमध्ये इतिहासकार काही वेळेस परिस्थितीनुसार तर कधी आपल्या आवडीनुसार विषयाची निवड करतात. त्यानुसार इतिहासकार कधी आपल्याला साध्य करायच्या उद्दिष्टानुसार सामग्रीची निवड करतो तर कधी मिळालेल्या ऐतिहासिक सामग्रीनुसार नवीन विषयाची मांडणी करतो. काही वेळेस काही गृहीतके मनाशी बांधूनच त्यानुसार अपेक्षित परिणाम साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. काही वेळेस मिळालेल्या माहितीस सत्य समजून तिचे सामान्यीकरण केले जाते तर काही वेळेस मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून मगच सामान्यीकरण केले जाते. एकत्रित तथ्ये व्यवस्थित करणे आणि गटबद्ध करणे आवश्यक आहे. स्पष्टीकरण आणि कार्यकारण, प्रेरणा आणि प्रभाव या दोन्ही गोष्टींचा समावेश आहे. इतर भाषांमध्ये, विश्लेषण इतिहासासाठी एक शिस्त म्हणून महत्त्वपूर्ण आहे. जमीनदार, शेतकरी, गुलाम किंवा भांडवलदार एखाद्या माहितीपटाप्रमाणे यांचे वर्णन इतिहासलेखनात येते पण प्रत्यक्षात तो सामान्यीकरणाचा परिणाम आहे.

ब्रिटिशांनी मध्ययुगीन काळाला मुस्लीम राजवटीचा काळ तर प्राचीन भारत हा हिंदू राजवटीचा काळ म्हणून संबोधित केले. परंतु त्यांनी आपल्या राजवटीचे वर्णन मात्र ख्रिश्चन राजवट असे वर्णन केले नाही. कारण हा संदेश त्यांच्या लिहिलेल्या आधारे अप्रत्यक्षपणे इतिहासाच्या धर्माच्या आधारे विभागल्या गेलेल्या सामान्यीकरणाद्वारे थेट पसरतो. संसदीय भाषणावरील व संसदेच्या कार्यालयीन पुराव्यांवर आधारीत इतिहास म्हणजे राजकारण आणि सरकारच्या धोरणांचे मुख्य निर्देशक असते. सरकारच्या कार्याचे सामान्यीकरण त्यातून दिसून येते. आजही वृत्तपत्रांद्वारे प्रसूत गेलेले तथ्य किंवा बातम्या अथवा लेख हे पत्रकार, संपादक आणि वर्तमानपत्रांचे मालक यांच्या सामान्य विचारांचे परिणाम आहेत. त्यांच्या आधीच्या धारणेच्या प्रभावानेच हे सर्व घडत असते किंबहुना त्यांनी दिलेल्या लेखातून त्यांच्या विचारांचा प्रभावाने विशिष्ट घटकाबद्दल अथवा समूहाबद्दल सामान्यीकरण दिसून येते.

१) सामान्यीकरणामुळे इतिहासकारांना अनुमान काढण्यास मदत होते आणि कारण आणि परिणाम किंवा परिणामांची साखळी तयार करतात. ते त्याला तारखेचे विश्लेषण, अर्थ लावणे आणि स्पष्टीकरण करण्यास सक्षम करते.

२) सामान्यीकरण इतिहासकारांना नवीन तथ्ये आणि स्त्रोत शोधण्यासाठी उद्युक्त करते. बऱ्याचदा नवीन स्त्रोतांना फक्त नवीन सामान्यीकरणांद्वारे योग्यप्रकारे आकलन केले जाऊ शकते.

३) सामान्यीकरण इतिहासाच्या विद्यार्थ्याला निबंध, अध्यायन, संशोधन पेपर याबाबतीत मदत करते. सामान्यीकरण देखील त्याने गोळा केलेली तथ्ये त्याच्या संशोधनाच्या विषयाशी संबंधित आहे कि नाही हे शोधण्यात सक्षम करते.

४) सामान्यीकरण इतिहासकारांना चर्चेसाठी आणि त्यातून फलदायी निष्कर्षाची प्रक्रिया सुरू करण्यास प्रवृत्त करते. दुसऱ्या इतिहासकाराने केलेल्या कामात सादर केलेल्या सामान्यीकरणाशी काहीजण सहमत असतील आणि त्यामध्ये संशोधन आणि विचार करण्यासाठी नवीन मार्गदर्शक शोधतील.

**आपली प्रगती तपासा:**

सामान्यीकरणाचे इतिहास लेखनातील महत्त्व अधोरेखित करा.

## ९.५ सामान्यीकरणातील समस्या

१) इतिहासात प्रत्येक घटना एकपरीने अनोखी असते. परंतु काहीवेळेस असे दिसून येते कि त्यांच्यात काही समानता असूनही वेगळे वैशिष्ट्य असते. त्यामुळे त्यांची एकमेकासोबत तुलना होते. जोपर्यंत अज्ञात गोष्टीची आपल्याला माहिती

munotes.in

असलेल्या गोष्टीशी तुलना केली जात नाही तोपर्यंत आपण आकलन करू शकत नाही. एखादी घटना अद्वितीय किंवा विशिष्ट आहे कि नाही हे दुसऱ्या घटनासोबत तुलना केल्याशिवाय आपल्याला समजत नाही.  आहे. अशा परिस्थितीत इतिहासकार अद्वितीय आणि सामान्य यांच्यातील संबंधांचा अभ्यास करतो. उदाहरणार्थ, भारतीय राष्ट्रीय क्रांती ही अद्वितीय आहे परंतु त्याची विशिष्टता इतर क्रांतींशी तुलना करूनच समजली जाऊ शकते.

२) पुष्कळ विचारवंतांचे असे मत आहे की, अनेक सामान्यीकरणांची अपुरी चाचणी केली जाते. इतर राष्ट्रवादी क्रांतींनी हिंसाचार केला म्हणून भारतीय राष्ट्रीय क्रांती हिंसकही झाली पाहिजे. हे एक चुकीचे  सामान्यीकरण होवू शकते. जागतिकीकरणामुळे काही देशांमध्ये प्रगती झाली त्यामुळे सर्व देशांमध्ये तशीच प्रगती होण्याची शक्यता आहे, हे एक सामान्यीकरणाचे उदाहरण आहे.

३) मोजमाप ही एक अचूक वैज्ञानिक प्रक्रिया आहे. परंतु केवळ ठोस गोष्टींसहच हे लागू केले जाऊ शकते. अमूर्त गोष्टी किंवा कल्पना कोणत्याही परिमाणामध्ये मोजल्या जाऊ शकत नाहीत. हे मनोवैज्ञानिक स्वरुपाच्या तथ्यांबद्दल देखील उपयुक्त नाही

**आपली प्रगती तपासा:**

सामान्यीकरणातील समस्या स्पष्ट करा.

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

## ९.६ ऐतिहासिक घटनांचे विश्लेषण

इतिहासातील प्रतिमांचे प्रतिबिंबित केलेल्या प्रतिमांची चलत रचना तयार करण्यासाठी इतिहासकारांना ऐतिहासिक सामग्रीचा अर्थ लावणे आवश्यक आहे. यामुळेच समान ऐतिहासिक दस्तऐवज अभ्यासूनही निष्कर्ष वेगवेगळे असतात. त्यांच्या धोरणांचा त्यांच्या इतिहासलेखानावर व सामन्यीकरण प्रक्रियेवर प्रभाव पडत असतो.

### ९.६.१ साम्राज्यवादी विचारसरणीतून भारताचे इतिहासलेखन

साम्राज्यवादी विचारसरणीतून भारताचे इतिहासलेखन हे भारतीय संस्कृतीवर हल्ला करते. हे जेम्स मिलच्या पुस्तकात स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी आपल्या इतिहासात आणि हिंदू सभ्यतेच्या अहवालात लिहिले आहे की, भारतीय गुणांमध्ये, उद्धट आणि कनिष्ठ आहेत. त्याचप्रमाणे, अलेक्झांडरने केलेले भारतावरील आक्रमणाचे समर्थन करताना दुसरे ब्रिटीश इतिहासकार व्हिसेट स्मिथ याने हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की, युरोपियन लोक भारतीयांपेक्षा युद्धामध्ये श्रेष्ठ होते. तो पुढे म्हणतो की, भारतातील कायम राजकीय अराजक, एकत्र येण्याची आणि स्वतःवर योग्यरित्या राज्य करण्याची

त्यांची असमर्थता यामुळे भारतीयांना नेहमीच परकीय आक्रमकांची पर्यायाने बाहेरील लोकांची शासक म्हणून गरज होती. याचमुळे ब्रिटीशांचे शासन भारतात प्रस्थापित झाले. माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन्स नमूद करतो की, भारतात परदेशी व्यापार हा प्रामुख्याने ग्रीक आणि अरब करत आले होते आणि अरबांनी भारतावर मात केली. ब्रिटिश इतिहासकारांनी अनेकदा भारतीय संस्कृतीला कमी लेखण्याचा प्रयत्न केला. भारतीय लोकांनी ग्रीक लोकांकडून आपली संस्कृती घेतली असावी असा त्यांनी अंदाज वर्तवला परंतु ते सिद्ध करणारा कोणताही पुरावा मात्र दिला नाही. भारतातील अंधश्रद्धा व वाईट चालीरीती यांच्यावर टीका करून त्यांनी आपल्या राजकीय वर्चस्वाचे समर्थन केले आहे.

भारतीय समाजातील अपराधी आणि सती प्रथेवर त्यांनी टीकास्त्र सोडले परंतु त्यासोबतच पद्धतशीरपणे युरोपमध्ये समाजातील गुलामी प्रथा व धार्मिक पगडा याकडे दुर्लक्ष केले. यामुळे भारतीय इतिहासकार आणि तत्वज्ञानी त्यांच्या संस्कृती आणि संस्कृतीवरील हल्ल्याचा बचाव करण्यासाठी स्वतःच तयार झाले ज्यामुळे जे ऐतिहासिक लेखन घडले, याला भारतीय इतिहासलेखनाचा राष्ट्रवादी प्रवाह म्हणून ओळखले जाऊ लागले. अशारितीने वेगवेगळ्या लोकांमध्ये ऐतिहासिक साहित्याचे स्वरूप, गुणवत्ता आणि प्रमाणात फरक आहेत.

## ९.६.२ भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांचा मतप्रवाह

ब्रिटिश साम्राज्यवादी इतिहासलेखनाच्या भारताविरूद्धच्या पूर्वग्रहांच्या प्रतिक्रियेत भारतीय इतिहासकारांचा मतप्रवाह अस्तित्वात आला. इतिहासाच्या शोधात राष्ट्रीय अस्मिता शोधणे आणि भारताला राष्ट्रवादी राज्य सिद्ध करणे या उद्देशाने भारतीय राष्ट्रवादी इतिहासलेखन केले गेले. भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांच्या नवीन पिढीने राष्ट्रीय अभिमानाने इतिहासलेखन केले आणि त्यांची राष्ट्रीय संस्कृती युरोपियन लोकांच्या विशेषत: ब्रिटीश इतिहासकारांच्या भारतीय राष्ट्र आणि राष्ट्रवादाविरोधात घडणाऱ्या बदलांच्या विरोधात उंचावण्याचा प्रयत्न केला. आर.सी.मजुमदार म्हणतात की युरोपियन इतिहासकारांनी भारतीय राष्ट्रीय समस्यातील अनेक मुद्द्यांचा गैरसमज केला आणि त्यांच्या लेखनात सर्वत्र त्यांची चुकीची माहिती दिली. ज्याची भारतीय इतिहासकारांनी त्यांची दुरुस्ती केली आणि प्रसंगी असे करताना भारतीय राष्ट्रवादी प्रेरणा रुजतील असे लेखन देखील केले त्यांना भारतीय राष्ट्रवादी इतिहासकार म्हणून ओळखले जाऊ लागले.

राजनारायण, बंकिमचंद्र चटर्जी यासारख्या भारतीय राष्ट्रवादी इतिहासकारांनी त्यांच्या लिखाणात भारतीय धर्म आणि समाजाचा बचाव केला. भारतीयांनी तसेच युरोपियन संशोधन विद्वानांनी केलेल्या पुरातत्व संशोधनाने भारतीय संस्कृतीवरील आघात परतवून लावले. प्राचीन भारतीय युरोपियन संस्कृतीपेक्षा कितीतरी पुढे असल्याचे दाखले त्यांच्या लेखनात येत असत, पर्यायाने आतादेखील भारतीय पुढे असल्याचे प्रतिबिंबित केले गेले. ब्रिटिश इतिहासकारांनी भारतातील राजकीय आणि प्रशासकीय व्यवस्थेला प्रत्येक टप्प्यावर कमी लेखण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले की, भारतात अनेक पंथ आणि पंथ आहेत. म्हणूनच, ते एक राष्ट्र होण्यासाठी पात्र होऊ शकले नाही.

munotes.in

परंतु इतिहासकार आर. के. मुखर्जी यांनी त्यांच्या 'भारतीय मूलभूत एकता' या अभ्यासपूर्ण प्रबंधात हिंदूंमध्ये धार्मिक एकता, अध्यात्मिक सहवास आणि अखिल भारतीय साम्राज्याचा त्यांचा आदर्श यापूर्वी भारतीय राष्ट्रवादाचा पाया निर्माण केल्याचा उल्लेख केला आहे.

### ९.६.३ १८५७ चे बंड

इ.स. १८५७ च्या बंडखोरीविषयी इतिहासकारांनी वेगळी मते दिलेली आहेत. उठाव पूर्वनियोजित आणि संघटित नियोजनाचा परिणाम, किंवा तो एक उत्स्फूर्त उदय होता, तर चरबीयुक्त काडतुसे जारी केल्याने संतप्त झालेल्या शिपाई यांचा उठाव होता इत्यादी मते व्यक्त केली. बऱ्याच लेखकांची उठावाच्या स्वरूपाविषयी भिन्न आणि विरोधाभासी मते देखील आहेत. हा विद्रोह होता की राष्ट्रीय स्वातंत्र्याचा युद्ध यावरून बरीच मते पुढे आली आहे. एस.बी. चौधरी यांनी, १८५७ च्या बंडाचा विचार केला की 'परकीय सत्तेला आव्हान देण्याचा अनेक वर्गातील लोकांचा पहिला संयुक्त प्रयत्न, असे वर्णन केले आहे. आर.सी. मुझुमदार सारख्या विद्वान इतिहासकाराने, सर्वसामान्यांनीही यात भाग घेतला असला तरी हे बंड मुख्यत्वे शिपायांचे काम असल्याचे मत व्यक्त केले आहे. पुढे आणखी एक मत होते की विदेशी सत्ताधीशांना देशाबाहेर घालवण्यासाठी आणि ते पूर्णपणे स्वतंत्र करण्यासाठी हा बंड हा स्वातंत्र्याचा राष्ट्रीय युद्ध आहे. ब्रिटिशांच्या भारतावरील हल्ल्याचा प्रतिकार करण्यासाठी, भारतीय इतिहासकारांनी त्यांच्या इतिहासाचा पुनर्वापर करायला सुरुवात केली आणि देशाबाहेर राष्ट्रवादाला ओढायला सुरुवात केली. विनायक दामोदर सावरकर यांनी १८५७ च्या उठावाच्या इतिहासाचे पुनर्लेखन करून त्याला भारताचे पहिले स्वातंत्र्य युद्ध म्हटले. एस.बी.चौधरी यांच्या 'भारतीय सैन्या मध्ये नागरी बंड' म्हणून हा उठाव हे राष्ट्रीय स्वातंत्र्य युद्ध म्हणून दर्शविले. ब्रिटीशांच्या विखारी प्रचाराला रोखण्यासाठी हिंदू-मुस्लिम यांच्यात एकी नसणे हा एक मोठा अडथळा होता. भारतीय इतिहासाच्या पुनर्व्याख्याणाची प्रक्रिया पुढे ताराचंद यांनी पुढे केली. त्यांच्या या पुस्तकात, "भारतीय संस्कृतीवरील इस्लामचा प्रभाव" या पुस्तकात, हिंदू-मुस्लिम संस्कृती एकत्रितपणे त्यांना भारतीय राष्ट्रात एकत्रित केल्याचा दावा आहे. अशाप्रकारे, भारतीय इतिहासाचे पुनर्लेखन हा भारतीय राष्ट्रवादी प्रवाहाचा प्रमुख विषय बनला.

### ९.६.४ मार्क्सवादी स्पष्टीकरण

भारतीय इतिहासलेखनाच्या मार्क्सवादी इतिहास लेखनप्रवाहात कथालेखन व वर्णनात्मक पासून स्पष्टीकरणात्मक व अर्थ लावणा-या या इतिहासाच्या लेखनात बदल घडवून आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले गेले. परिवर्तनाच्या या प्रक्रियेत या इतिहासकारांनी वस्तुस्थितीचे वर्णन करण्याकरता, इतिहास आहे हे सिद्ध करण्यासाठी घटनांवर नव्हे तर घटनेमागील आर्थिक व राजकीय हालचालींवर अधिक जोर दिला. त्यांनी फक्त घटनांचे वर्णनच केले नाही. त्या इतिहासकारांचे स्पष्टीकरण कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक तत्वज्ञानापासून म्हणजेच द्वंद्वात्मक भौतिकवादातून आले आहे. या नवीन दृष्टिकोनचे सार हे सामाजिक आणि आर्थिक संस्था यांच्यातील संबंध आणि ऐतिहासिक घटनांवरील परिणामाच्या अभ्यासामध्ये आहे. उदाहरणार्थ, मनातील वेगवेगळ्या प्रश्नांच्या

संचासह स्त्रोतांचे पुन्हा वाचन हे यात अपेक्षित आहे. डी. डी. कोसंबी यांनी मृत भूतकाळाचा अभ्यास करण्यासाठी तुलनात्मक पद्धत आणि अन्वेषणचे अंतःविषय तंत्र अवलंबिले. याच्या मदतीने भूतकाळाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला पुरातत्व स्त्रोतांचा तसेच त्यांनी संस्कृत आणि व्युत्पत्ती विषयक विश्लेषणाचा वापर आर्य व गैर-आर्य घटकांचा अभ्यास करण्यासाठी केला. .

बिपन चंद्रा यांनी आपल्या 'इंडिअन स्ट्रगल फॉर इंडीपेंडन्स' मध्ये केंब्रिज स्कूल आणि भारतीय राष्ट्रवादीच्या साम्राज्यवादी दृष्टिकोनापेक्षा भिन्न असल्याचे मत मांडले आणि असे मत मांडले की भारतीय राष्ट्रीय चळवळ ही ती काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. ते पुढे नमूद करतात की भारतीय राष्ट्रीय चळवळीस संरचित बुर्ज्वा चळवळ म्हणून संबोधतात. आपल्या 'आधुनिक भारतातील जातीयवाद' मध्ये, बिपन चंद्रा यांनी हे नाकारले, की जातीयवाद हा केवळ ऐतिहासिक अपघात किंवा द्वंद्वात्मक षड्‌यंत्रांचे उत्पादन आहे . ते वसाहतवादाच्या उपज उत्पादनांपैकी एक होते. जमातवाद हा बऱ्याचदा विकृत स्वरुपात पुढे येतो. त्याचे सामाजिक तणाव किंवा वर्ग संघर्ष म्हणून चुकीचे वर्णन केले जाते. जातीयवादाचे विश्लेषण करताना ते म्हणतात की, ते "१८५७ ते १९३७ या काळात जातीयवादाचे स्वरूप काहीसे मवाळ होते. पुढे १९३७ नंतर जमातवाद द्वेष, भीती मानसशास्त्राचे आणि असमंजसपणाच्या राजकारणावर आधारित फासीवादी बनले, ब्रिटीशांनी जातीय रंगवला आणि मुस्लिम लीगला मुस्लिमांचा एकमेव अधिवक्ता म्हणून मान्यता दिली."

### ९.६.५ अहिंसेच्या तत्त्वाचे आर्थिक विश्लेषण

भारतीय मार्क्सवादी इतिहासशास्त्रज्ञांनी, इ. स. पुर्व सहाव्या शतकामध्ये बौद्ध आणि जैन धर्माच्या अहिंसेच्या तत्वाचा पुरस्कार केला, त्यामागे एक आर्थिक कारण असल्याचे स्पष्टीकरण दिले. डी.डी.कोसंबी म्हणतात की, "पाली कथांच्या आधारे हे स्पष्ट होते कि प्राणी आहुती दिल्या जाणारी यज्ञांमध्ये वैदिक विधी नुसार मोठ्या प्रमाणात जनावरांची कत्तल केली गेली, ज्यामुळे गंगा खो-यातील नवीन कृषीसंस्कृतीला शेतीवर गुरेढोरांची अविश्वसनीय टंचाई निर्माण झाली. वस्तुतः या कृषीसंस्कृतीला लोकसंख्या पोसण्यासाठी शेतीतून शेती मिळण्यासाठी पशुधन संपत्तीची जपणूक व वृद्धिंगत करणे आवश्यक होते". कोसंबी पुढे म्हणतात की, "यज्ञ, जैन आणि बौद्ध धर्मासाठी विनामुल्य प्राण्यांची संख्या वाढवून नियमित शेतीवर येणारा ताण टाळण्यासाठी, इसवीसनपूर्व सहाव्या शतकामध्ये पशुपालन, गोवंश हत्याबंदीची व मधमाश्या पाळण्याची प्रथा तयार केली गेली."

### ९.६.६ जातीचा अर्थ

इरफान हबीब यांनी आपल्या 'इंटरप्रिटींग ऑफ इंडिअन हिस्टरी' मध्ये इतिहासाच्या वर्णनावर नव्हे तर अर्थ लावण्यावर भर दिला. ते म्हणतात की भूतकाळाचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे कारण इतिहासकार ज्या गोष्टींना भूतकाळाचा पुरावा मानतात त्या गोष्टी त्या घटना पुन्हा घडवून आणू शकत नाहीत.इतिहासात काही संदर्भ रिक्त असतात. समाज कसा चालतो,एखादी गोष्ट करण्यासाठी लोक कशा प्रकारे प्रवृत्त होतात आणि विविध परिस्थितीत विविध गोष्टी करण्यास ते कसे सक्षम आहेत हे समजून या रिक्त जागा भरल्या जाऊ शकतात. अशा प्रकारे इतिहासकारांच्या वैयक्तिक निर्णयामुळे आणि

चुकांच्या मदतीने केलेले स्पष्टीकरण इतिहास अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत करते. त्याच कार्यात ते म्हणतात की मध्ययुगीन भारतीय अर्थव्यवस्था ही सरंजामी अर्थव्यवस्थेपेक्षा वेगळी सामाजिक रचना होती. कामगार प्रक्रियेच्या आधारे, अतिरिक्त मूल्याचे निष्कर्ष काढून आणि अतिरिक्त उत्पादन वितरणाच्या आधारावर ते असे सांगतात. इरफान हबीब यांनी 'भारतीय इतिहासातील जात आणि पैसा' या दुसऱ्या कामात असे म्हटले आहे की, "श्रम विभागून जात हा सर्वात कठोर प्रकार होता, तो भाग आणि उत्पादनाशी संबंधित होता. या कठोर प्रकारच्या वर्गाच्या शोषणाचे मुख्य लाभार्थी वैद्यकीय समाजातील कुलीन आणि जमीनदार यांचे शासक वर्ग होते."

### ९.६.७ अकबराच्या धोरणांचे विश्लेषण

१५८९-९० मध्ये अकबराने अबुल फजलला त्याच्या कारकिर्दीचा इतिहास तयार करण्याचे आदेश दिले. अबुल फजलला मदत करण्यासाठी सक्षम लोक नियुक्त करण्यात आले होते. अबूल फझल अकबराला वैश्विक मनुष्य म्हणून सादर करतो. अकबराचे ध्येय असे होते की तो लोकांना रूढीवादी बाबींपासून मुक्ती देइल आणि त्यांना सत्याकडे घेऊन जाईल आणि समरसतेचे वातावरण तयार करेल, जेणेकरून भिन्न पंथांचे लोक शांतता व सौहार्दाने जगू शकतील.

अकबर याने बदायुनीला महाभारतचे संस्कृत भाषांतर पर्शियन भाषेत करण्यासाठी नियुक्त केले. बदायुनी हा इतिहासाचा आणि साहित्याचाही विद्यार्थी होता. अकबराच्या कारकिर्दीची योग्य जाणीव होण्यासाठी हे अबुल फजलच्या अकबरनामाबरोबरच बदायुनींचे दुसरे खंड अभ्यासणे गरजेचे आहे. अबुल फजल अकबराची स्तुती करण्यास उदार आहे तर बदायुनी अकबरच्या धार्मिक धोरणावर कडक टीका करतो.

### ९.६.८ छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा अर्थ

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याविषयी विविध सांस्कृतिक अर्थ आहेत. हिंदवी स्वराज ही सामाजिक-राजकीय चळवळींकरिता, देशाभिमान वाढवण्यासही आणि इतर संदर्भात वापरली जाणारी संज्ञा आहे. सतराव्या शतकापासून महाराष्ट्राची राजकीय क्रियाशीलता, छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श आणि आधुनिक शिक्षणाचा प्रभाव महाराष्ट्रातील विशिष्ट राष्ट्रवादी भावनेच्या दृष्टीने अनुकूल होता. जोतिराव फुले, बाळ गंगाधर टिळक, वि. दा. सावरकर, वि. का. राजवाडे आणि इतर अनेक विचारवंतांनी आणि इतिहासकारांनी राजा छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापलेल्या स्वराज्याविषयीचे आपले भाषांतर सादर केले. जोतिराव फुले यांनी यांचे कुळवाडिभूषण असे वर्णन केले, म्हणजे शेती करणारे आणि सामान्य लोकांसाठी काम करणारा राजा. जोतिरावांनी जून १८६९ मध्ये छत्रपती शिवाजीराजांवर पोवाडा प्रकाशित केला. गायी आणि ब्राह्मणांचे रक्षक म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांची विद्यमान प्रतिमा जोतिरावांनी नाकारली. ते जनतेचा राजे होते. फुले यांच्या म्हणण्यानुसार छत्रपती शिवाजी बहुजनांचे राजा होते.

प्रख्यात इतिहासकार जदुनाथ सरकार यांनी आपल्या 'शिवाजी अंड हिज टाईम्स' मध्ये म्हटले आहे, छत्रपती राजा शिवाजी यांचे धार्मिक धोरण अतिशय उदारमतवादी होते. नरहर कुरूंदकर यांनी श्रीमान योगी या कादंबरीच्या प्रस्तावनेत छत्रपती शिवाजी महाराज

यांना धार्मिक म्हणून संबोधले आहे,पण ते धर्मांध नव्हते असे देखील म्हटले आहे. वि. दा. सावरकर यांचे लेखन छत्रपती शिवाजी राजांना "हिंदूंचा राष्ट्रीय नायक" म्हणून प्रक्षेपित करणारे होते. हे त्यांच्या हिंदुत्वाच्या तत्वज्ञानाशी अनुरूप होते. त्यांच्या लिखाणांनी आणि वक्तृत्वातून त्यांनी हिंदूंच्या ध्रुवीकरणासाठी हिंदूंच्या विचारसरणीला प्राधान्य देणारी हिंदू प्रतिमा निर्माण केली. समकालीन पाश्चात्य लेखकांनी आणि प्रवाशांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा सजगपणा, धाडस, सर्व धर्मांचा आदर करण्याचे धोरण याविषयी संदर्भ नमूद केले आहेत.

**आपली प्रगती तपासा:**

ऐतिहासिक धरणांच्या विश्लेषणात सामान्यीकरणाची भूमिकेचा आढावा घ्या

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ९.७ सारांश

ऐतिहासिक स्त्रोतांचे सामान्यीकरण आणि अर्थ लावणे हे ऐतिहासिक लिखाणातील प्रमुख घटक आहेत. सामान्यीकरण त्यांच्यासंदर्भात नवीन समर्थन देण्यास किंवा प्रतिवाद करणाऱ्या पुराव्यांच्या शोधास प्रोत्साहित करते. इतिहासकारांच्या शब्दात भूतकाळाचा अर्थ लावणे, हे पूर्वी काय घडले याचे अभ्यासपूर्ण विवेचन असते. इतिहासकारांचे मुख्य काम म्हणजे भूतकाळाच्या वर्णनांवर आधारित माहिती आणि तथ्ये नोंदवणे आणि पक्षपातीपणा न घेता घटनांचा संपूर्ण क्रम लावणे हे आहे.

## ९.८ प्रश्न

१) इतिहास लेखनात सामान्यीकरणाचे महत्त्व सांगा.

२) इतिहासातील स्पष्टीकरण आणि सामान्यीकरणाची भूमिका सांगा.

३) इतिहासाच्या स्त्रोतांच्या स्पष्टीकरणासाठी जबाबदार असलेल्या घटकांची थोडक्यात माहिती द्या.

## ९.९ अतिरिक्त वाचन

१) बी. शेक अली, इतिहास: इट्स थियरी आणि मेथड्स, मॅकमिलन पब. दिल्ली, १९८८.

२) आर. जी. कोलिंगवुड, इतिहास आणि तत्त्वज्ञानातील इतिहासातील इतर लेखांची तत्त्वे (संपादन. विल्यम एच. ड्रे आणि डब्ल्यू. जे. व्हॅन डर ड्यूसेन), २००१.

३) ए. आर. कुलकर्णी, शिवाजीच्या युगातील महाराष्ट्र, डायमंड प्रकाशन.

४) जे. एन. सरकार, शिवाजी अँड हिज टाईम्स

❄❄❄❄❄❄❄❄



munotes.in

munotes.in

# १०

# उद्धरण पद्धती, ग्रंथसूची व तांत्रिक सहाय्य

**घटक रचना**

१०.० उद्दिष्टे
१०.१ प्रस्तावना
१०.२ उद्धरण व संदर्भ महत्त्व
१०.३ उद्धरणाची योग्य पद्धत
१०.४ तळटीपा वापरण्याचे फायदे
१०.५ संदर्भग्रंथसूची
१०.६ संदर्भग्रंथसूची देताना घ्यावयाची काळजी
१०.७ तांत्रिक सहाय्य
१०.८ सारांश
१०.९ प्रश्न
१०.१० अतिरिक्त वाचन

## १०.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास झाल्यानंतर विद्यार्थी-

- संदर्भातील तर्कसंगती आणि विविध पद्धती समजून घेण्यास सक्षम असेल
- संदर्भ आणि त्यातील विविध प्रकारांचे महत्त्व समजावून घेतील
- ग्रंथसंग्रहात घ्यावयाचे महत्त्व आणि काळजी व यांचे योगदान समजून घेण्यास सक्षम होतील.
- इतिहासातील तांत्रिक सहाय्य समजून घेतील.
- शोध ...... प्रबंध लेखनामध्ये उद्धरण पद्धतीचा तसेच तांत्रिक सहाय्याचा वापर कशा पद्धतीने करावा याचे योग्य आकलन होण्यास मदत होईल.

## १०.१ प्रस्तावना

एखादी माहितीस्त्रोताचे उद्धरण म्हणजे एखाद्या व्यक्तीला त्याच्या सर्जनशील आणि बौद्धिक कार्यांसाठी श्रेय देण्याचा एक मार्ग आहे. असा संदर्भ आपल्या संशोधनास मजबुती देण्यासाठी वापरला जातो. उद्धरणात लेखकाचे नाव, तारीख आणि प्रकाशन कंपनीचे स्थान, संशोधन पत्रिकेचे शीर्षक समाविष्ट असू शकते. विशिष्ट उद्धरण शैलीनुसार आवश्यक माहिती आणि विरामचिन्हे नमूद केली जातात. शैक्षणिक संस्था आणि वैज्ञानिक प्रकाशने यांच्यासाठी लेखनाच्या काळात वापरल्या जाणाऱ्या सर्व स्त्रोतांसाठी संदर्भांची आवश्यकता असते. विद्यार्थी आणि संशोधक बऱ्याचदा यास एक जटिल प्रक्रिया म्हणून पाहतात ज्यासाठी खूप वेळ आणि प्रयत्न आवश्यक असतात. अशा संशोधन लेखांना उद्धरित किंवा संदर्भित केल्या जाणाऱ्या माहिती सामग्रीमध्ये पुस्तके, संशोधन पत्रिका,

munotes.in

